जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार १८ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

दादांवर ७० हजार कोटींचा आरोप करून जगणे मुश्किल केले होते

अजित पवारांच्या पुतळ्यासमोर शहांनी माफी मागायला हवी होती:उद्धव ठाकरेंचा घणाघात



मुंबई/प्रतिनिधी- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणात सुरुवातीपासून आक्रमक भूमिका घेणारे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी नुकतीच पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी चर्चेत असलेल्या 'मफलर मॅन'बाबत खुलासा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो दाखवून गंभीर आरोप केले. त्यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अशातच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही या प्रकरणावर भाष्य केले आहे. दिवंगत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी रोहित पवारांच्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे म्हणाले, 'एकूण घटनाक्रम पाहिला तर व्हीएसआर कंपनीवर कारवाई झालेली दिसत नाही. रोहित पवार जे म्हणतायत त्यात वावगं आहे, असं म्हणण्याचं कारण नाही. त्यांच्याकडे पुरावे असतील तर अमित शाह यांनी त्यांचे फोन उचलावेत.' या वक्तव्यातून उद्धव ठाकरे यांनी रोहित पवारांच्या भूमिकेला अप्रत्यक्ष पाठिंबा दर्शवला. तसेच या प्रकरणातील आरोपांची दखल घेऊन संबंधितांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी भूमिका मांडली. उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्यावर टीका करत अजित पवार यांच्यावरील जुन्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, 'अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. मात्र, त्याच अजित पवार यांच्या पुतळ्याचे अनावरण अमित शाह यांच्या हस्ते होणे ही दुर्दैवाची बाब आहे.' तसेच अजित पवार यांच्या पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर अमित शाह यांनी पुतळ्यासमोर नाक घासून माफी मागायला हवी होती, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी अमित शाह यांच्यावर घणाघाती टीका केली.



'दैनिक श्रेष्ठ न्यूज'च्या नावाखाली खंडणी

पत्रकारितेच्या नावाखाली रॅकेट!

भोपाळमधून गुलाबी गँग जेरबंद

नागपूर/प्रतिनिधी- पत्रकारितेचा गैरवापर चालवत देशातील आठ राज्यांतील सरपंचांना टार्गेट करून त्यांच्याकडून लाखोंची खंडणी उकळणाऱ्या गुलाबी गँगचा नागपूर ग्रामीण पोलिसांनी छडा लावला. या गँगच्या चार प्रमुख महिलांसह ३९ जणींना पोलिसांनी अटक केली. पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी या घटनेची माहिती मंगळवारी, १७ नोव्हेंबर रोजी पत्रकारांना दिली. यावेळी अपर पोलिस अधीक्षक अनिल मस्के उपस्थित होते.

'दैनिक श्रेष्ठ न्यूज'च्या नावाखाली भोपाळमधून खंडणीचे हे रॅकेट चालविले जात होते. मोनिका लालसिंग सूर्यवंशी (२८, रा. बगची, छतरी चौराहा, नरसिंहगढ, जि. राजगढ मध्यप्रदेश), नेहा लालसिंग सूर्यवंशी (२३, रा. नरसिंहगढ, जि. राजगढ), अक्षरा मिलिंद अरक (२१, रा. हुजूर, भोपाळ)

४ महिलांसह ३९ जण ताब्यात

आणि कोमल मोहन मोरे (२३, रा. अन्नानगर, भोपाळ) अशी या रॅकेटमधील प्रमुख महिलांची नावे आहेत. त्यातील मोनिका आणि नेहा या दोघी या गुलाबी गँगच्या म्होरक्या असल्याची प्राथमिक माहिती आहे. देशभरातील विविध राज्यात ग्रामपंचायतीत विकासकामासाठी चालविल्या जाणाऱ्या



सरकारी योजनांची माहिती 'महापंचायत पोर्टल' च्या माध्यमातून मिळवायची. कोणत्या ग्रामपंचायतीला कोण सरपंच आहे, त्याचा नंबर काय, ते मिळवून या गँगमधील ३५ महिला उपरोक्त कर्मचारी प्रत्येक सरपंचांना फोन करून जाहिरातीच्या नावाने पैशांची मागणी करायच्या. पैसे न दिल्यास ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहार प्रसिद्ध करून बदनामी करण्याची धमकी द्यायच्या. त्यांनी अशा प्रकारे नागपूर जिल्ह्यातील सरपंच मीना सुरेशसिंग सूर्यवंशी यांना ११ ऑगस्ट ते ६ नोव्हेंबर या कालावधीत एका महिलेने 'दैनिक श्रेष्ठ न्यूज'ची प्रतिनिधी असल्याचे सांगून जाहिरातीसाठी तीन हजार रुपयांची मागणी केली. ऑनलाइन पैसे पाठविण्यासाठी क्यूआर कोडही दिला. ➪(पान २ वर)

इतिहास चाळताना १९५७-१९७५
किशोर देशपांडे

साठ वर्षांपूर्वीचे अमरावती शहर आजच्यापेक्षा खूप वेगळे होते. पैशाची चणचण होती, पण मनाची श्रीमंती होती. चुलीवरच्या भाकरीला चव होती, रोजार हाच परिवार होता. त्या साध्या, सुंदर आणि आठवणींनी भरलेल्या काळात डोकावण्याची ही एक छोटीशी सफर आम्ही किशोर देशपांडे यांच्या 'साठ वर्षांपूर्वीच्या आठवणी'या दर बुधवारी प्रकाशित होणा-या लेखमालेतून आपल्या समोर मांडत आहोत.चला, तर त्या आठवणींना पुन्हा उजाळा देऊया...



अजित पवार प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज देण्यास मुंबई पोलीस आणि डीजीसीएचा नकार

मुंबई/बारामती/प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे देवगिरी बंगला निवासस्थान ते मुंबई विमानतळ येथील सीसीटीव्ही फुटेज देण्यास नागरी विमान सुरक्षा ब्युरो विभागानंतर मुंबई पोलिसांनी देखील नकार दिल्याची माहिती बारामतीमधील वकिल नितीन यादव यांनी दिली आहे. राज्याचे दिवंगत लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे जे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले होते. त्या अनुषंगाने राज्यभरातील जनतेत व आदरणीय दादाप्रेमीमध्ये एक शंका व जनभावना होती की, आदरणीय दादांचा अपघात झाला त्या दिवसाचे मुंबई विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज मिळावे. याच अनुषंगाने मी केंद्र सरकारच्या नागरी विमान वाहतुकालय विभागास दि.२८जानेवारी २०२६ रोजीचे मुंबई विमानतळावरील पहाटे ६ ते सकाळी ९ दरम्यानचे सिसिटीव्ही फुटेजची मागणी केली होती परंतु त्यांनी ती माझी मागणी नाकारत मला सीसीटीव्ही फुटेज दिले



नाही,असं नितीन यादव यांनी म्हटलं आहे. अजितदादा पवार यांचे २८ जानेवारीचे मुंबईतील शासकीय देवगिरी निवासस्थान ते मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील देखील सीसीटीव्ही फुटेज मी माहिती अधिकारात मागवले होते.ते फुटेज जे की महाराष्ट्र राज्य सरकारच्या गृह विभागाच्या अखत्यारीत येते तेही देण्यास मुंबई पोलीसांनी सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी ती माहिती संबंधित नाही असे धक्कादायक उत्तर देत नाकारले आहे. सोबतच त्यांनी यात व्यक्तीची खाजगी माहिती आगंतुक हस्तक्षेप करेल असे चुकीचे उत्तर देत माहिती नाकारली आहे, असं नितीन यादव म्हणाले. नितीन यादव यांनी नागरी विमान सुरक्षा ब्युरो विभागाकडे प्रथम अपील करीत मुंबई विमानतळावरील आदरणीय अजितदादांचे सीसीटीव्ही फुटेज मागविले होते यावरही सदरील CCTV फुटेज सर्वसामान्य नागरिकांना देता येत नाही, फुटेज पोलिसांना दिले आहे असे मोघमपणे सांगितले आहे. म्हणजेच एकीकडे ण्णऊ फुटेज अस्तित्वात असल्याचे आणि ते तपास यंत्रणांना दिल्याचे ते मान्य करत आहेत परंतु दुसरीकडे ते सार्वजनिक करत नाहीत, असं यादव यांनी म्हटलं आहे. ➪(पान २ वर)

राज्यात भूजल पातळीत झपाट्याने घट

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील भूजलसाठ्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या निरीक्षणानुसार, राज्यातील ३ हजार ८१६ निरीक्षण विहिरींपैकी ३ हजार ३२१ विहिरींमध्ये भूजलपातळीत घट नोंदविण्यात आली आहे. म्हणजेच सुमारे ८७ टक्के विहिरींची पाणीपातळी खालावली आहे. विशेष म्हणजे ९६४ विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक घट झाली आहे. मराठवाड्यातील विहिरींना सर्वाधिक फटका बसत असून विदर्भात व उत्तर महाराष्ट्र पण भूजल पातळी झपाट्याने खाली जात असल्याचे सर्वेक्षणात पुढे आले.विभागनिहाय आकडेवारीनुसार, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक ८६२ निरीक्षण




विहिरींमध्ये भूजलपातळीत घट झाली आहे. त्यापैकी ५९४ विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक घसरण नोंदविण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र नाशिक विभागात ६५० विहिरींची पातळी खालावली असून, त्यापैकी १६० विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक घट झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे विभागात ५५८ विहिरींमध्ये घट झाली असून, ११७ विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक घसरण आहे. अमरावती विभागातील ५३१ विहिरींमध्ये (६६ विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक), नागपूर विभागातील ५३० विहिरींमध्ये (१८ विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक) आणि कोकण विभागातील १९० विहिरींमध्ये (नऊ विहिरींमध्ये तीन मीटरपेक्षा अधिक) घट नोंदविण्यात आली आहे.

रोहित पवारांच्या कारखान्यातील धुरामुळे अपघात-नवनाथ बन



पुणे/प्रतिनिधी- आमदार रोहित पवार यांनी व्हीएसआर कंपनीच्या मालकांवर गंभीर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे, याप्रकरणी अद्यापही एफआयआर दाखल न झाल्याने, व्हीएसआर कंपनीच्या रोहित सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून होत आहे. देवेंद्र फडणवीस हेच मफलर मॅन आहेत, असेही रोहित पवार यांनी म्हटले. रोहित पवारांच्या या आरोपानंतर भाजपकडून त्यांच्यावर पलटवार केला जात आहे. तर, भाजपा प्रवक्ते नवनाथ बन यांनी अजित पवारांच्या विमान दुर्घटनेला अजित पवारांचा इंदापूरमधील साखर कारखाना जबाबदार असल्याचे म्हटले. भाजपा प्रवक्ते नवनाथ बन यांनी रोहित पवारांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. नवनाथ बन यांनी अजितदादांच्या विमान अपघाताचा संबंध हा रोहित पवार यांच्या कारखान्याच्या धुराशी जोडण्याचा प्रयत्न केला. अजित पवार यांच्या घातपातामागे रोहित पवारच नाहीत ना, असा सवाल उपस्थित करत या प्रकरणात सखोल चौकशीची मागणी देखील नवनाथ बन यांनी केली. इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे येथे रोहित पवारांचा बारामती साखर कारखाना आहे. या कारखान्याचा धूर बारामती विमानतळावर गेला आणि त्याच्यामुळे व्हिजिबिलिटी कमी झाल्याने अजित पवारांच्या विमानाचा अपघात झाला असा आरोप भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी केलाय. बारामती अग्रो कारखाना ते बारामती एअरपोर्ट हे अंतर गुगल नेवीगेशननुसार १७ किलोमीटरचे आहे. तर एरियल डिस्टन्स हा ६.३ किमी आहे. अजितदादांच्या अपघाताच्या दिवशी बारामतीच्या विमानतळावर व्हिजिबिलिटी का कमी होती तर या विमानतळापासून सहा ते सात किलोमीटर अंतरावर शेटफळगढे येथे रोहित पवारांचा एक साखर कारखाना आहे. रोहित पवारांच्या साखर कारखान्याच्या माध्यमातून जो धूर निघतो, त्या धुरामुळे बारामती परिसरातील व्हिजिबिलिटी कमी झाली आहे. फेब्रुवारीत तापमान कमी असते, आपल्याला माहिती आहे, तापमान कमी असल्यावर धुराचा फॉग तयार होतो.



अकोला जिल्हा रुग्णालयात एक्सपायरी डेट संपलेलं सलाईन लावलं, नातेवाईकांचा आरोप

अकोला/प्रतिनिधी- अकोल्याच्या शासकीय रुग्णालयातील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ब्रेन स्ट्रोकच्या उपचारासाठी दाखल असलेल्या ५५ वर्षीय रुग्णाला चक्क वर्षभरापूर्वीच एक्सपायर झालेलं सलाईन लावल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. सलाईनची एक्सपायरी तारीख पाहताच नातेवाईकांनी संताप व्यक्त केला असून, संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचा जीव डॉक्टर आणि आरोग्य यंत्रणेच्या भरवशावर असतो. मात्र, अकोल्याच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात समोर आलेल्या या प्रकारामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातल्या विहीगाव येथील ५५ वर्षीय सुरेश वाकोडे यांना ब्रेन स्ट्रोकचा झटका आल्यानं उपचारासाठी अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आज दुपारी त्यांची प्रकृती स्थिर असताना त्यांना लावण्यात आलेल्या सलाईनच्या बाटलीवरील एक्सपायरी तारीख नातेवाईकांच्या निदर्शनास आली. विशेष म्हणजे, या सलाईनची मुदत तब्बल वर्षभरापूर्वीच संपल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. रुग्णाला एक्सपायर झालेलं सलाईन लावण्याचा हा प्रकार गंभीर असल्याचं सांगत नातेवाईकांनी संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करत रुग्णाचे नातेवाईक डीन यांना निवेदन देणार आहेत.

१ लाख रुपयांपर्यंत घसरणार सोन्याचा भाव

मुंबई/प्रतिनिधी- लग्नसराईपूर्वी सोन्या-चांदीच्या किंमतीत मोठी घसरण झाली आहे. लग्नसराईचा हंगामात सोने आणि चांदीच्या दागिन्यांना मोठी मागणी असते. मात्र, गेल्या काही दिवसांत दोन्ही मौल्यवान धातूंच्या किंमतीत मोठी घसरण बघायला मिळत आहे. सोमवारी वायदा बाजारात सोन्याच्या किंमतीत २१०० रुपयांहून अधिकची घट बघायला मिळाली. यानंतर, सोन्याचा भाव १.३५ लाख रुपये प्रति १० ग्रॅमच्या खाली आले आहेत.तसेच, एकाच दिवसात चांदी तब्बल ८४०० रुपयांहून अधिक स्वस्त झाली आहे. चांदीचा भाव १.७० लाख रुपये प्रति किलोच्याही खाली आला आहे.

बुधवार १८ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

सुचेता बनसोड यांना 'प्रभास सन्मान' जाहीर

स्व. प्रभा अरुण मराठे स्मृती सामाजिक सेवा पुरस्काराचे शुक्रवारी वितरण

जोशी हॉलमध्ये सोहळा, ज्ञानेश्वर मुळे प्रमुख अतिथी

अमरावती/प्रतिनिधीः- दैनिक 'हिंदुस्थान' पुरस्कृत स्व. प्रभा अरुण मराठे स्मृती सामाजिक सेवा पुरस्कार 'प्रभास सन्मान' यंदा अकोल्याच्या सुचेता श्रीकांत बनसोड यांना जाहीर झाला आहे. बनसोड या अकोला येथील एकविरा मल्टीपर्पज फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष आहेत. शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता अमरावतीतील श्याम चौक येथील जोशी हॉलमध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सोहळ्याला भारतीय परराष्ट्र सेवेतील माजी वरिष्ठ अधिकारी ज्ञानेश्वर मुळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. डॉ. मोहनाताई कुळकर्णी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. दैनिक 'हिंदुस्थान' परिवाराच्या वतीने या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



सुचेता बनसोड यांनी विज्ञान शाखेतील पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी.) आणि वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञानातील पदविका (डीएमएलटी) प्राप्त केली आहे. श्रवणदिव्यांग विद्यार्थ्यांच्या विशेष शिक्षणासाठी आवश्यक असलेली बी.एड.ची पदवीही त्यांनी घेतली आहे. विज्ञान, वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान आणि विशेष शिक्षण अशा तीन क्षेत्रांतील शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या बनसोड अकोल्यातील एकविरा मल्टीपर्पज फाउंडेशनचे नेतृत्व करतात.

स्व. प्रभा अरुण मराठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारातून सामाजिक सेवेत कार्यरत व्यक्तींच्या योगदानाचा गौरव केला जातो. यंदाच्या सोहळ्यात बनसोड यांच्या सामाजिक कार्याचा सन्मान होणार असून, त्या निमित्ताने विशेष शिक्षणाची पार्श्वभूमी असलेल्या एका संस्थापक कार्यकर्तीच्या वाटचालीला उजाळा मिळणार आहे. अमरावतीकरांनी या सन्मान सोहळ्यास सहपरिवार उपस्थित राहून सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन दैनिक 'हिंदुस्थान' परिवाराने केले आहे.

महामार्ग ओलांडताना कारची धडक; ८५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

अमरावती-नागपूर मार्गावरील घटना

अमरावती/प्रतिनिधीः- नातेवाइकांच्या घरी आनंदाच्या सोहळ्यासाठी आलेल्या ८५ वर्षीय वृद्धाचा महामार्गावरील अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. अमरावती-नागपूर महामार्ग ओलांडत असताना भरधाव कारने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून निघून गेला. रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी वृद्धाला मृत घोषित केले. रामकृष्ण गुलाबराव झगडे (वय ८५, रा. शेरुळ, ता. हिंगणा, जि. नागपूर) असे मृत वृद्धाचे नाव आहे. नातेवाइकांच्या



मुलीच्या नामकरण सोहळ्यासाठी ते अमरावती परिसरात आले होते. कुटुंबीयांसोबत आनंदाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर ते महामार्ग ओलांडत होते. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास ही घटना घडली. महामार्गावरून वाहने वेगाने ये-जा करीत असताना एमएच ४९ सीडी ७६०६ क्रमांकाच्या कारने झगडे यांना धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की ते रस्त्यावर कोसळून गंभीर जखमी झाले. अपघातानंतर संबंधित कारचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. जखमी वृद्धाला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. नामकरण सोहळ्यासाठी आलेल्या वृद्धाच्या मृत्यूने नातेवाइकांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर नांदगाव पेठ पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली. संबंधित कारच्या क्रमांकाच्या आधारे चालकाचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याप्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी मोर्शी येथे शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

अमरावती/प्रतिनिधीः- मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सूचना केंद्रांतर्गत मोर्शी येथील श्री गोविंदप्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यात आयटीआय उत्तीर्ण, तसेच दहावी, बारावी आणि पदवीधर झालेले सहभागी होऊ शकतील. मेळाव्यामध्ये पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि अमरावती जिल्ह्यातील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून युवकांसाठी नोकरी, शिकाऊ उमेदवारीची संधी मिळणार आहे.

मेळाव्याला उपस्थित राहणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थी, उमेदवारांनी सोबत आपला बायोडाटा आणि मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती आणणे आवश्यक आहे. पात्र प्रशिक्षणार्थींनी या भरती मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोर्शी, तसेच सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, अमरावती यांनी केले आहे.

दुचाकी झाडावर आदळल्याने तरुणाचा मृत्यू

खैरी-दोनोडा फाट्याजवळ अपघात

दर्यापूर/प्रतिनिधीः-

काम आटोपून दुचाकीने गावाकडे परतणाऱ्या ४० वर्षीय तरुणाचा रस्ता अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. दर्यापूर- आसेगाव मार्गावरील खैरी- दोनोडा फाट्याजवळील वळणावर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्यालगतच्या झाडावर आदळले. धडकेत तरुणाला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. रविवारी हा अपघात घडला. या घटनेने वडनेर भुजंग गावात शोककळा पसरली आहे.स्वप्निल किसनराव साळकर (वय ४०, रा. वडनेर भुजंग) अपघातात मृत तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार स्वप्निल किसनराव साळकर कामानिमित्त आसेगाव येथे गेले होते. काम आटोपल्यानंतर ते दुचाकी एमएच २७ ई ८२५२ ने आपल्या गावाकडे परत होते.



दर्यापूर-आसेगाव मार्गावरील खैरी-दोनोडा फाट्याजवळ पोहोचताच वळणावर त्यांच्या दुचाकीवरील ताबा सुटल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. नियंत्रण सुटलेली दुचाकी थेट रस्त्यालगतच्या मोठ्या झाडावर जाऊन आदळली. धडक इतकी जोरदार होती की दुचाकीच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात साळकर यांच्या डोक्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. त्यामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील शेतकरी आणि रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत साळकर यांचा मृत्यू झाला होता. नागरिकांनी तात्काळ आसेगाव पूर्णा पोलिसांना घटनेची माहिती दिली.माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला.मृत तरुणाच्या खिशातील आधारकार्डवरून त्यांची ओळख स्वप्निल किसनराव साळकर अशी पटली.या प्रकरणाची आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

कचरा गाडीच्या धडकेत वृद्ध महिलेच्या हाताला गंभीर दुखापत

जमील कॉलनी चौकात अपघात, चालक फरार



अमरावती/प्रतिनिधीः-

शहरातील बेस्ट हॉस्पिटलसमोर असलेल्या जमील कॉलनी चौकात भरधाव वेगाने कचरा उचलणाऱ्या गाडीने ऑटोला जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोमध्ये बसलेल्या ६० वर्षीय वृद्ध महिला गंभीर जखमी आहे. धडक दिल्यानंतर कचरा गाडीचा चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. जैबून बी शेख जलील (वय ६०, ताज नगर) असे अपघातात जखमी महिलेचे नाव आहे. माहितीनुसार जैबुन बी शेख जलील सोमवार १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ऑटोने इतवारा बाजारकडे जात होत्या. यावेळी बेस्ट हॉस्पिटल समोर जमील कॉलनी चौकात भरधाव वेगाने येणाऱ्या कचरा गाडीने ऑटोला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, महिलेच्या हाताचा पंजा गंभीररीत्या क्षतिग्रस्त झाला. त्यांच्या हाताची पाचही बोटे काम करणे बंद झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातानंतर जखमी महिलेला वलगाव रोडवरील डायनॅमिक हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या महिलेची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे, मात्र हाताला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे बोटांची कार्यक्षमता प्रभावित झाली आहे.डॉक्टरांकडून त्यांच्या हातावर शस्त्रक्रिया आणि दीर्घ उपचाराची गरज असल्याचे सांगितले जात आहे.

वयाच्या ६० व्या वर्षी झालेली ही दुखापत कुटुंबासाठी मोठा धक्का आहे.या प्रकरणी गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. फरार चालकाचा शोध सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

१ व १० वरिल उर्वरित

भोपाळमधून गुलाबी गँग

पैसे देण्यास नकार दिल्यानंतर विरोधात बातमी छापू, अशी धमकी दिली. याशिवाय जुनोना फुके येथील सरपंच प्रभा गोतमारे यांच्याकडून अशाच पद्धतीने ऑनलाइन ५०० रुपये स्वीकारले. दुसऱ्या अनेक महिला सरपंचांनाही बातमी छापण्याची धमकी देऊन खंडणी उकळली होती.

थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार अन् तत्काळ दखल -८ नोव्हेंबरला लोहारी सावंगा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनेक महिला सरपंचांनी या गँगची तक्रार केली होती. त्याची मुख्यमंत्र्यांनी तत्काळ देखल घेतली. पीडित सरपंचांना आश्वस्त करून त्यांनी तेथे असलेले पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना कारवाईचे निर्देश दिले. त्यानंतर नरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

भोपाळमध्ये थाटले कॉल सेंटर-या प्रकरणाचा नरखेड पोलिस, स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलिसांनी संयुक्त तपास केला असता भोपाळमधून खंडणीचे सर्व फोन आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेचे अंकुश माने आणि सहकाऱ्यांच्या पथकांनी हर्षवर्धन नगर, निशातपुरा आणि एमपी नगर परिसरात छापेमारी केली. तेथील कॉलसेंटरवर खंडणी उकळण्यासाठी वर्षभरापासून ३५ बहुभाषिक तरुणी काम करताना आढळल्या. त्यांना तसेच मोनिका सूर्यवंशी, नेहा सूर्यवंशी, अक्षरा अरक आणि कोमल मोरे या महिलांना पोलिसांनी अटक केली.

महिला सरपंच, आठ राज्य अन् ६१८ रजिस्टर-या गुलाबी गँगने महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि मध्य प्रदेश या आठ राज्यांतील सरपंच व ग्रामसेवकांचे नाव, मोबाइल नंबर अशी माहिती त्यांनी ६१८ रजिस्टरमध्ये नोंदवली होती. मराठी, हिंदी, इंग्रजी, राजस्थानी, बिहारी आदी भाषेचे ज्ञान असलेल्या तरुणींकडून संबंधित सरपंचांशी संपर्क साधून त्यांना पैशासाठी धमकावले जात होते. प्रामुख्याने महिला सरपंचांना या गँगने टार्गेट केले होते.

आठवडाभरातच पर्दाफाश -पोलिसांनी या गँगकडून ५४ मोबाइल फोन, २ लॅपटॉप, २ संगणक व १ प्रिंटर, ६१८ मोबाइल क्रमांकांचे रजिस्टर, छापील पाकिटे पत्रक, येस बँकेचे स्कॅनर, रिसीट स्लिप्स व चेकबुक असा एकूण ७ लाख २९ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'ऑन द स्पॉट' कारवाईचे निर्देश दिल्यानंतर केवळ आठ दिवसात ग्रामीण पोलिसांनी ही कामगिरी बजावल्याचे अधीक्षक पोद्दार यांनी सांगितले.

अजित पवार प्रकरणात सीसीटीव्ही

म्हणूनच वेळोवेळी आमचे असे ठाम मत आहे की, आदरणीय अजितदादा पवार हे राज्याच्या संविधानिक पदावर कार्य करणारे व राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून संबंध महाराष्ट्र राज्याचे कामकाज पाहणारे लोकप्रतिनिधी होते त्यामुळे त्यांची माहिती ही खासगी व्यक्तीची माहिती आहे हे कारण देणे अत्यंत चुकीचे आहे, असं नितीन यादव यांनी म्हटलं आहे. जर खरोखरच आदरणीय अजितदादांचा घातपात झाला नसेल तर आशा आहे की तात्काळ केंद्र व राज्य सरकार आदरणीय अजितदादांचे मुंबई येथील त्या दिवसांचे उपलब्ध असलेले संपूर्ण सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करेल व जनतेच्या तसेच आदरणीय दादाप्रेमींच्या मनातील शंका दूर करतील, असं नितीन यादव यांनी म्हटलं आहे.

मटण पार्टीचे ड्रोन शूटिंग करणा-यावर

कथित प्रकार ड्रोन चित्रीकरणातून समोर आला होता. या घटनेमुळे नगरपरिषद वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. या पार्टीचे चित्रीकरण करणारे व्हिडिओ शूटर रमाकांत गावंडे यांच्यावरच हल्ला झाल्याने या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, मोर्शीतील शिंगोरा रोड परिसरात खुल्या कारागृहासमोर ही घटना घडली. पाच ते सहा जणांनी गावंडे यांना गाठून धारदार शस्त्राने वार केल्याचे सांगण्यात येत आहे. हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने अमरावतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

चोरी गेलेला ७२ लाखांचा ऐवज

ज्या घरातून चोरी झाली होती, त्याचे तक्रारदार मुज्तबा जैदी आहेत.या प्रकरणात पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेटचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांच्या नेतृत्वाखाली डीबी पथक प्रमुख पीएसआय विकास मनपिया आणि क्राईम ब्रँच समांतर तपास करत होते. पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि तपासाच्या आधारे हैदराबादमधून एका अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आणि त्याच्याकडून ४७० ग्रॅम सोन्याचे आभूषण, ७८० ग्रॅम चांदी आणि १ लाख ७० हजार रुपये रोख असा एकूण ७२ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

जप्त माल घेऊन न्यायालयाकडून आवश्यक आदेश प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण मुद्देमाल आज मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते तक्रारदार मुज्तबा जैदी यांना सुपूर्द करण्यात आला.

यावेळी पोलीस उपायुक्त श्याम घुगे, प्रणाली सोनवणे, सहायक आयुक्त निलेश ब्राह्मणे, नागपुरी गेटचे ठाणेदार मनोहर कोटनाके, एपीआय महेंद्र इंगळे, डीबी दल प्रमुख पीएसआय विकास मनपिया यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.नागपुरी गेट डीबी आणि क्राईम ब्रँचच्या पथकाने समांतर तपास केला. सीसीटीव्ही, मोबाईल लोकेशन आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिस हैदराबादपर्यंत पोहोचले. तिथे अल्पवयीन आरोपीकडून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला. अल्पवयीन आरोपीने हा गुन्हा कसा केला, त्याला कोणी मदत केली का, याचाही तपास पोलीस करत आहे.मुद्देमाल परत मिळाल्याने फिर्यादी मुज्तबा जैदी यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसत होते. त्यांनी पोलीस आयुक्तांसह नागपुरी गेट पोलीस आणि क्राईम ब्रँचच्या टीमचे आभार मानले. आयुक्तांनीही टीमला शाबासकी दिली.

दर्यापूर बाजार समितीत १७ अनधिकृत

भीती व्यक्त होत आहे. वजनात फसवणूक, मालाची चोरी, भांडणे असे प्रकार घडल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पोलिसांनीही याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. बाजार समिती परिसरात पोलिसांचा गस्तीचा अभाव असल्याने अनेकांना मोकळे रान मिळाल्याची भावना आहे. बाहेरून येणाऱ्या व्यक्तींची पडताळणी करणे ही पोलिसांचीच जबाबदारी आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

दुसरीकडे, काही लोकांचा असा युक्तिवाद आहे की, कामासाठी बाहेरून मजूर येणे नविन नाही. पण त्यांची नोंदणी आणि ओळख पटविणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोणालाही कामावर ठेवणे धोकादायक ठरू शकते. याप्रकरणात नेमके काय षडयंत्र आहे, की केवळ मजुरांचा तुटवडा भरून काढण्यासाठी हे लोक आणले आहेत, हे चौकशीनंतरच स्पष्ट होईल. त्यामुळे बाजार समिती प्रशासन, पोलिस आणि कामगार विभागाने संयुक्तपणे चौकशी करून या १७ मजुरांची ओळख, मूळ गाव आणि कामाचे स्वरूप स्पष्ट करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. प्रशासन यावर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

रक्ताचा तुटवडा,रक्तदान कराः

लक्षणीयरीत्या घटले आहे. त्याचा थेट फटका रक्तपेढ्यांच्या साठ्यावर बसला आहे. दुसरीकडे, विविध रुग्णालयांमध्ये नियमित शस्त्रक्रिया, अपघातग्रस्त आणि गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी रक्ताची मागणी मात्र सातत्याने वाढत आहे. मागणी आणि पुरवठा यांतील हे व्यस्त प्रमाण आरोग्य यंत्रणेची चिंता वाढवणारे ठरत आहे. रक्तटंचाईची ही समस्या अमरावती जिल्ह्यातील मेळघाटसारख्या दुर्गम भागात अधिक गंभीर बनली आहे.

टोल चुकविण्याच्या नादात ट्रकची

अपघातानंतर टोलनाक्याजवळ नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी व टोल कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला करत वाहतूक सुरळीत केली.टोल वाचविण्याच्या नादात अशा प्रकारे भरधाव अवजड वाहने गावातून मार्गक्रमण करीत असल्याने ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण आणण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

कसा फेडायचा, या विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक चर्चा आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबात वृद्ध आई आणि एक मुलगा असा परिवार आहे. कमावत्या कर्त्या व्यक्तीच्या आकस्मिक जाण्याने देवळे कुटुंबावर मोठा आघात झाला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी पुढील तपास कुऱ्हा पोलीस करत आहेत.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह

असल्याचे मत आमदार प्रवीण तायडे यांनी बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या समक्ष मांडले.यासोबतच अचलपूर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामे व महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या प्रश्नांबाबतही मंत्री महोदयांशी चर्चा करून कामांना गती देण्याची मागणी सुद्धा केली.

यावेळी बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी तात्काळ संबंधित विभागाच्या सचिवांना आवश्यक सूचना देऊन प्रस्तावित कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका घेतली.

अचलपूर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी आमदार प्रवीण तायडे यांचे शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा शुक्रवारी

आहेत.

कॅम्पमध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या उद्योग क्षेत्रासाठी असलेल्या विविध एमएसएमई कर्ज योजना, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध अनुदानाधारीत व प्रोत्साहनपर योजनांची माहिती देण्यात येणार आहे. नवोदित उद्योजक, विद्यमान व्यावसायिक, लघु व मध्यम उद्योग तसेच स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना कर्ज सुविधांची माहिती व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कॅम्पमध्ये पात्र कर्ज अर्जदारांच्या कर्ज प्रस्तावांची छाननी करून आवश्यक पात्रता व कागदपत्रांची पूर्तता झाल्यास जागेवरच कर्ज मंजुरी देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्राला चालना मिळावी, नवीन उद्योजक निर्माण व्हावेत, तसेच विद्यमान उद्योगांना आर्थिक बळ मिळावे, या उद्देशाने या मेगा क्रेडिट आउटरीच कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, नवउद्योजक तसेच स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्यांनी यावेळी उपस्थित राहावे, तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या आकर्षक व्याजदराच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी जिल्हा प्रबंधक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.

समान काम, समान वेतनासाठी

वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. यासंदर्भातील प्रस्ताव उच्च न्यायालयाने मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठवला आहे. मात्र, तब्बल २१ महिने उलटूनही शासनाने या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे न्यायालयीन कर्मचारी संघटनांमध्ये नाराजी वाढली आहे. या मागणीसाठी यापूर्वीही कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. पण त्यांच्या मागणीकडे शासनाने लक्ष नाही दिले. यामुळे कर्मचाऱ्यांनी आता आरपारची लढाई छेडलेली आहे. कर्मचाऱ्यांनी आज सकाळपासून काम बंद करून न्यायालय परिसरासमोर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण नाही होणार तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.हजारो कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले.

मोर्शीत न्यायालयीन कर्मचारी

न्यायालयांमधील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, यासाठी ३१ जानेवारी २०२५ रोजी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र, तब्बल २२ महिन्यांचा कालावधी उलटूनही शासनाकडून या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आलेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या मागणीसाठी गट-क कर्मचारी, लघुलेखक, बेलीफ, वाहनचालक तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी एकजुटीने संपाचे हत्यार उपसले आहे. विशेष म्हणजे, सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणीचे थकीत आर्थिक लाभ मिळावेत, या मागणीसाठी आजी-माजी कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

राज्यातील विविध ठिकाणी कर्मचाऱ्यांकडून बेमुदत संप, आमरण उपोषण आणि साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. प्रलंबित वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लावून समान कामासाठी समान वेतनाचे तत्त्व लागू करावे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे.

शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार न्यायालयीन कर्मचारी संघटनांनी व्यक्त केला आहे.

दर्यापूर बाजार समितीत तुरीला

अनिस अँग्रो यांनी १३,०११ रुपये प्रतिक्विंटल दराने सदर तुरीची खरेदी केली.

या निमित्ताने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांनी शेतकरी दादाराव वाकोडे यांचा, तसेच चंचल ट्रेडिंगचे संचालक व खरेदीदार अनिस शेठ यांचा सत्कार केला. यावेळी बाजार समितीचे संचालक असिफ भाई खान, खरेदीदार संतोष खंडेलवाल, सतिश पाटील मानकर, राहाटे पाटील, प्रफुल भंडागे, वाळके यांच्यासह बाजार समितीतील इतर अडते, व्यापारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टातून पिकवलेल्या शेतमालाला योग्य मोबदला मिळावा, पारदर्शक लिलाव प्रक्रिया राबवली जावी आणि बाजार समितीवर शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ व्हावा, यासाठी बाजार समिती सातत्याने प्रयत्नशील आहे.

नांदगाव बाजार समितीत सोयाबीनला

क्विंटल भाव मिळाला असून आज पुन्हा मंगळवारी भावात सुधारणा होऊन चांगल्या प्रतीचे सोयाबीन ७६२५ रुपये प्रति क्विंटल ने व्यापाऱ्यांनी खरेदी केले. यावर्षी सोयाबीनच्या भावात तेजी येत असली तरी शेतकऱ्याकडे विक्रीकरिता पाहिजे त्या प्रमाणात सोयाबीनच नाही. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊन सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली. काही शेतकऱ्यांना एकरी २ ते ३ क्विंटल वरच समाधान मानावे लागले. शेतमालच विक्रीकरिता नसल्याने भावात कितीही वाढ झाली तरी त्या वाढीव भावाचा शेतकऱ्यांना फायदा नाही. उत्पादनात घट झाल्यामुळे बाजारातील सोयाबीनची आवकही सुद्धा मंदावली.

१२ नोव्हेंबर ७३०० रुपये, १३ नोव्हेंबर ७३२० रुपये , १४ नोव्हेंबर ७५००, १६ नोव्हेंबर ७५०० रुपये , १७ नोव्हेंबर ७६२५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला असल्याने सोयाबीनच्या भावात दररोज तेजीचे संकेत दिसून येत आहेत. या पुढेही भावात वाढ होण्याची शक्यता व्यापारी व अडत्यांकडून व्यक्त होत आहे.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

समान वेतनाच्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संप

वाशिममध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचेही साखळी उपोषण; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन, राज्यातील ३४ हजार कर्मचारी संपात सहभागी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान कामासाठी समान वेतन लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी राज्यातील दुय्यम न्यायालयांमधील कर्मचाऱ्यांनी पुकारलेले आंदोलन अखेर निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे. शासनाकडून वारंवार पाठपुरावा करूनही मागण्यांची पूर्तता होत नसल्याने महाराष्ट्र राज्य न्यायिक कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आज, १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाला सुरुवात केली आहे. या संपात वाशिम जिल्ह्यातील वाशिमसह सर्व तालुक्यांतील न्यायालयांमध्ये कार्यरत कर्मचारी सहभागी झाले आहेत.

गेल्या २६ सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने सुरू असलेल्या या आंदोलनाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्याने कर्मचाऱ्यांनी आता बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायिक कर्मचारी या संपात सहभागी झाल्याने न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. समान वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी न्यायिक कर्मचारी महासंघाच्या वतीने मागील



दोन वर्षांपासून शासनाकडे विविध मार्गांनी पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र, अद्यापही शासनाकडून ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचेही साखळी उपोषण

दरम्यान, या आंदोलनाला सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही पाठिंबा दर्शविला असून, ते देखील आंदोलनात सहभागी झाले आहेत. वाशिम येथील सेवानिवृत्त सहाय्यक अधीक्षक जगदीशप्रसाद मदनप्रसाद शुक्ला यांच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज १७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एक दिवसीय शांततामय साखळी उपोषण करण्यात येत आहे. यामध्ये स्वतः शुक्ला यांच्यासह २९ ते ३० सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी होणार असल्याचे निवेदनात नमूद आहे. समान कामासाठी समान वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी कार्यरत कर्मचाऱ्यांप्रमाणेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीही शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

यापूर्वी उच्च न्यायालयाने या प्रश्नाच्या अनुषंगाने दोन न्यायमूर्तींची विशेष समिती गठित केली होती. या समितीने ३१ जानेवारी २०२५ रोजी दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन देण्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठविला होता. मात्र, अहवाल सादर होऊनही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे न्यायिक कर्मचाऱ्यांमध्ये शासनाच्या भूमिकेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य न्यायिक अधिकारी संघ, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे विविध सदस्य, जिल्हा व तालुका वकील संघांसह राज्यातील विविध पक्षांचे मंत्री, आमदार व खासदार यांनीही पाठिंबा दिल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे. समान कामासाठी समान वेतनाची मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

कार्यरत कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण अशा दुहेरी आंदोलनामुळे शासनावर दबाव वाढत असून, या मागण्यांवर शासन काय निर्णय घेते, याकडे वाशिम जिल्ह्यासह राज्यातील न्यायिक कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

यूसीसीबाबत मुस्लिम समाजाच्या भावना जाणून घेणार; मुख्यमंत्र्यांचे आश्वासन!

आमदार साजिद खान पठाण यांच्या निवेदनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

समान नागरी कायद्याच्या (यूसीसी) मुद्द्यावर मुस्लिम समाजाच्या भावना, धार्मिक श्रद्धा आणि शरीयतशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या संदर्भात आमदार साजिद खान पठाण यांनी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली. यावेळी मुस्लिम समाजातील ज्येष्ठ समाजनेते आणि सन्माननीय उलमा यांच्या शिष्टमंडळासोबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

समान नागरी कायद्याचा विषय सध्या देशभरात चर्चेच्या केंद्रस्थानी असून, या कायद्याच्या संभाव्य परिणामांबाबत विविध समाजघटकांमध्ये चर्चा सुरू आहे. विशेषतः मुस्लिम समाजाच्या धार्मिक श्रद्धा, वैयक्तिक कायदे आणि शरीयतशी संबंधित बाबींच्या पार्श्वभूमीवर या विषयाकडे संवेदनशीलतेने पाहण्याची आवश्यकता असल्याची भूमिका आमदार साजिद खान पठाण यांनी मांडली आहे. याच अनुषंगाने त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करून समाजातील ज्येष्ठ व्यक्ती, धर्मगुरू आणि उलमा



ज्येष्ठ समाजनेते व उलमा यांच्या शिष्टमंडळासोबत लवकरच बैठक

यांच्याशी शासनाने थेट संवाद साधावा, अशी मागणी केली होती. या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार साजिद खान पठाण यांच्यात समान नागरी कायद्याच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली.

मुस्लिम समाजाच्या भावना, धार्मिक श्रद्धा तसेच शरीयतशी निगडित महत्त्वाच्या मुद्द्यांची माहिती शासनाने संबंधित समाजप्रतिनिधींकडून प्रत्यक्ष जाणून घ्यावी, अशी अपेक्षा आमदार पठाण यांनी व्यक्त केली.

केवळ निवेदनांपुरता किंवा राजकीय चर्चेपुरता हा विषय मर्यादित न ठेवता, संबंधित समाजघटकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या शंका, आक्षेप आणि अपेक्षा समजून घेणे महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. ज्येष्ठ समाजनेते आणि उलमा यांच्या शिष्टमंडळासोबत बैठक घेण्याची मागणी मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यात आली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका दर्शवित लवकरात लवकर बैठक आयोजित केली जाईल, असे आश्वासन आमदार साजिद खान पठाण यांना दिले.

या भेटीमुळे समान नागरी कायद्याच्या संवेदनशील विषयावर शासन आणि मुस्लिम समाजातील प्रतिनिधींमध्ये थेट संवादाची प्रक्रिया सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. समाजाच्या भावना जाणून घेऊन त्यावर सकारात्मक चर्चा घडवून आणणे आणि लोकशाहीतील संवादाच्या माध्यमातून शासनापर्यंत समाजाची भूमिका पोहोचविणे, हा या भेटीमागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार प्रस्तावित बैठक कधी आयोजित होते आणि त्यामध्ये कोणते मुद्दे चर्चेला येतात, याकडे आता मुस्लिम समाजातील विविध घटकांचे लक्ष लागले आहे.

अडोळ धरणातून रिसोडला अतिरिक्त पाणीपुरवठ्या विरोधात शेतकऱ्यांची उच्च न्यायालयात याचिका

१२ आठवड्यांत निर्णय घ्या; उच्च न्यायालयाचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड शहराला अडोळ धरणातून अतिरिक्त पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पाइपलाइन टाकण्याच्या प्रस्तावावर १२ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वाशिमच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश आर. व्यास यांच्या खंडपीठाने दामुअण्णा इंगोले व इतर शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश दिला.

रिसोड शहराला अडोळ धरणातून अतिरिक्त पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाइपलाइन टाकण्याला याचिकाकर्त्यांनी विरोध केला असून उपस्थित केला होता. रिसोड शहराला अतिरिक्त पाणीपुरवठा केल्यास या परिसरातील १४ गावाच्या पाणी पुरवठ्यावर आणि शेकडो एक्करवरील सिंचनावर परिणाम होणार असल्याची माहिती याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला दिली आहे. यावर न्यायालयाने संबंधित जनहित याचिकेला निवेदन म्हणून ग्राह्य धरून कायद्यानुसार निर्णय घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले. आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी संबंधित पक्षांचे म्हणणेही ऐकून घेऊ शकतात. निर्णय घेताना याचिकेसोबत सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचा विचार करण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांनी २० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकाऱ्यांसमोर उपस्थित राहण्याची तयारी दर्शवली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेतल्यानंतर एका आठवड्याच्या आत त्याची माहिती याचिकाकर्त्यांना कळवावी, असेही न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे.

आ. सई डहाके यांची कारंजा उपजिल्हा रुग्णालयाला आकस्मिक भेट



■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीमती सई प्रकाशदादा डहाके यांनी दि. १७ नोव्हेंबर रोजी कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयाला अचानक भेट देऊन रुग्णालयातील आरोग्य सुविधांची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालय परिसरासह विविध वॉर्डची प्रत्यक्ष पाहणी करून आरोग्य सेवा व उपलब्ध सोयी-सुविधांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी आमदार डहाके यांनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांची तसेच त्यांच्या नातेवाईकांची आस्थेने विचारपूस केली. रुग्णांना उपचारादरम्यान कोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, औषधोपचार, स्वच्छता आणि इतर आरोग्य सुविधांबाबत काही समस्या आहेत का, याची माहिती त्यांनी थेट रुग्णांकडून जाणून घेतली.

त्यानंतर वैद्यकीय अधीक्षक डॉ. भाऊराव लहाने यांच्याशी चर्चा करून रुग्णालयात भेडसावणाऱ्या विविध अडचणी व प्रशासकीय बाबींचा आढावा घेतला. रुग्णालयातील समस्या लवकरात लवकर दूर करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन आमदार डहाके यांनी यावेळी दिले.

रुग्णसेवेसाठी संतोष धोंगडे यांना विशेष सूचना

या भेटीदरम्यान आमदार सई प्रकाशदादा डहाके यांनी रुग्ण कल्याण समितीचे सदस्य संतोष धोंगडे यांनाही विशेष सूचना केल्या. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आरोग्य सेवेसंदर्भात कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तत्काळ लक्ष घालून संबंधित रुग्णांना आवश्यक ती मदत करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत आणि त्यांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये, यासाठी सतर्क राहण्याचेही त्यांनी सांगितले. शासकीय रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, त्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण व्हावे आणि आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम व्हावी, या दृष्टीने आमदार डहाके यांनी केलेल्या या अचानक भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

माता पिता व गोमाता सेवेला जीवनाचे लक्ष्य करा-हभप नारायण महाराज शिंदे

अकोला : आज दोन माता संकटात आहेत. त्यातील एक म्हणजे स्वतःची माता व दुसरी गोमाता होय! स्वतःच्या मातेसाठी समाजाने वृद्धाश्रम निर्माण केले आहेत तर गोमातेसाठी गोरक्षणची तजवीज केली आहे. या दोन्ही बाबी निंदनीय असून प्रत्येकाने आपल्या घरी गोमाता व आपल्या वृध्द मतापित्याचे योग्य रित्या संगोपन केले तर वृद्धाश्रम व गोरक्षण ची आवश्यकता राहणार नसून संत व भगवंतांना अपेक्षित ही संस्कृतीची पारंपारिक वहिवाट नव्या जोमाने पुन्हा सुरू होऊ शकते यासाठी सर्वांनी गोमातेचे संवर्धन करण्याचे आवाहन विहिप चे केंद्रीय मार्गदर्शक मंडळ सदस्य दिल्ली येथील हभप नारायण महाराज शिंदे यांनी केले. स्थानीय पातूर रोड वरील म्हैसपूर फाट्या जवळील आदर्श गोसेवा प्रकल्प व अनुसंधान प्रकल्पात मंगळवारी वार्षिक गोपाष्टमी उत्सव संपन्न झाला. यात हभप नारायण महाराज शिंदे मार्गदर्शन करीत होते.

कारंजाच्या शैक्षणिक क्षेत्रात गोविंद स्कूलची मानाची भरारी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत गोविंद स्कूल, कारंजा (लाड) यांना प्रतिष्ठेचा 'शैक्षणिक उत्कृष्टता व नाविन्यपूर्ण उपक्रम पुरस्कार – २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. या सन्मानामुळे कारंजा शहराच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या मध्य भारतातील भव्य 'शिक्षण प्रदर्शन २०२६ – शैक्षणिक उत्कृष्टता व नाविन्यपूर्ण उपक्रम पुरस्कार' (उंळ ईंध्द – २०२६) या विशेष सोहळ्याला छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सोमानी तसेच अकोला येथील प्रभात किड्सचे संचालक डॉ. गजानन नारे यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांच्या हस्ते गोविंद स्कूलचा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार किरण चौधरी व संतोष चौधरी यांना प्रदान करण्यात आला. शाळेने शिक्षण क्षेत्रात राबविलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी केलेले प्रयत्न, शैक्षणिक सुविधांचा विकास, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे उपक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली. शाळेचा गौरव म्हणजे केवळ एका संस्थेचा सन्मान नसून, त्यामागे असलेल्या अनेक वर्षांच्या परिश्रमांचा, जिद्दीचा आणि समर्पणाचा गौरव असतो. गोविंद स्कूलने शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव आणि सर्जनशीलता रुजविण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले आहेत.

कोंडोली येथे वरली मटका जुगारावर पोलिसांची धाड

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील कोंडोली येथे सार्वजनिक ठिकाणी वरली मटका जुगाराची खायवडी सुरू असल्याची माहिती मिळताच मानोरा पोलिसांनी १७ नोव्हेंबर रोजी धाड टाकून एका इसमाला ताब्यात घेतले. गणेश सुरेश चव्हाण (वय ३५, रा. कोंडोली) असे कारवाई करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, सहाय्यक फौजदार साहेबराव राऊत हे पोलीस कर्मचारी संदीप जाधव यांच्यासह पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून कोंडोली येथे वरली मटका जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी गणेश चव्हाण हा सार्वजनिक रस्त्यावर लोकांकडून पैसे घेऊन वरली मटक्याच्या आकड्यांवर खायवडी करीत असल्याचे आढळून आले. पोलिसांना पाहताच इतर जुगार खेळणारे इसम घटनास्थळावरून पसार झाले. पोलिसांनी गणेश चव्हाण याची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता वरली मटक्याचे आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या आणि रोख ६३० रुपये असा जुगाराचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

काटेपूर्णा जंगल सफारी आता किन्हीराजाच्या दारी!

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

पश्चिम विदर्भातील 'पाणी देणारं जंगल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात आता वाशिम जिल्ह्यातील पर्यटकांनाही जंगल सफारीचा आनंद घेता येणार आहे. मालेगाव तालुक्यातील चौफुला कॅम्प येथे नवीन सफारी प्रवेशद्वार सुरू करण्यात आले असून, पक्षी सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी किन्हीराजा गेटचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे वाशिम जिल्ह्यातील पर्यटकांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली आहे. आतापर्यंत अभयारण्यात सफारीसाठी अकोला जिल्ह्यातील कासमार आणि फेट्रा या प्रवेशद्वारांचा वापर करावा लागत होता. विशेष म्हणजे, अभयारण्याचा सुमारे ६५ ते ७० टक्के मुख्य सफारी परिसर वाशिम जिल्ह्याच्या हद्दीत येत असतानाही



चौफुला कॅम्प येथे नवीन प्रवेशद्वार सुरू

या जिल्ह्यातून प्रवेशद्वार उपलब्ध नव्हते. त्यामुळे वाशिम येथील पर्यटकांना सफारीसाठी सुमारे ६० किलोमीटरचा प्रवास करावा लागत होता. मात्र, चौफुला येथील नवीन प्रवेशद्वार सुरू झाल्याने हे अंतर आता केवळ २७ किलोमीटरवर आले आहे. नवीन प्रवेशद्वारामुळे जंगल पर्यटनाला चालना मिळण्यासोबतच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधीही उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. चौफुला गेटपासून किन्हीराजा गाव अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असल्याने स्थानिक युवकांना पर्यटकांसाठी गाईड, वाहनसेवा तसेच पर्यटनपूरक व्यवसायांच्या माध्यमातून रोजगार मिळू शकतो. त्यामुळे परिसरातील ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ मिळण्याची शक्यता आहे.

एस टी आरक्षणासाठी सखल गोर बंजारा समाज एकवटला- संभाजीनगर ते नागपूर रथयात्रा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

एस टी आरक्षण चळवळ अधिक तीव्र करीत सकल गोर बंजारा समाजबांधवांनी दोन हजार वाहनांचा ताफ्यासह एस टी आरक्षण रथयात्रा ही संभाजीनगर ते नागपूर काढण्याचा निर्णय घेतला आहे.

गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण, प्रा अनिल राठोड (खोली) यांनी याबाबत माहिती दिला असून या रथयात्रेच्या नियोजनासाठी सखल गोर बंजारा समाजबांधव जोमाने कामाला लागले असून याच विषयी महत्वाची मीटिंग मालेगाव तालुक्यातील अवलिया महाराज संस्थाण काळामाथा येथे पार पडली आहे. संभाजीनगर सीडको बसस्टॅन्ड जवळील येथील वसंतराव नाईक पुतळ्याला अभिवादन करून व वसंतराव नाईक यांनी ज्या दिवशी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती तो दिवस ५ डिसेंबर ला ही एस ची आरक्षण रथयात्रा निघणार असून संभाजीनगर, जालना, चिखली, मेहकर, मालेगाव, वाशीम, पुसद, यवतमाळ, वर्धा मार्गाने ही अस टी आरक्षण रथयात्रा हिवाळी अधिवेशना वर नागपूर येथे धडकणार असून जवळपास दोन हजार चारचाकी वाहनाचा ताफा हा सोबत राहणार असून या रथयात्रेचा पहिला मुक्काम हा दी ५ डिसेंबरला वाशीम ला राहणार आहे. याच रथयात्रेचे नियोजन बैठक अवलिया महाराज संस्थान येथे पार पडली. या बैठकीला गोर सेना गोर शीकवाडी बंजारा समाजातील नागरिक राजकीय मंडळी कवी प्रबोधनकार मंडळी समाजसेवक आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचारी आजपासून संपावर

■ प्रतिनिधी | रिसोड ■



राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या समान काम, समान वेतनाच्या मागणीने आता तीव्र स्वरूप धारण केले आहे. मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने सुरू असलेले आंदोलन आता निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे. शासनाकडून मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी आज, १७ नोव्हेंबर पासून बेमुदत संपावर गेले आहेत. या संपात वाशिम जिल्ह्यातील जिल्हा तसेच तालुकास्तरावरील सर्व न्यायालयीन कर्मचारी सहभागी असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. याचा अनुषगाने रिसोड न्यायालयासमोर कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप सुरू केला आहे.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने मागील दोन वर्षांपासून दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. यासंदर्भात शासनाकडे विविध मागण्यांची निवेदने व अहवाल पाठवूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप कर्मचारी संघटनेने केला आहे. या मागणीसाठी १६ सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने आंदोलन सुरू करण्यात आले होते. मात्र, शासनाकडून अपेक्षित निर्णय न झाल्याने आता आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकरणात यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने दोन न्यायमूर्तींची विशेष समिती गठित केली होती. या समितीने ३१ जानेवारी २०२५ रोजी दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन देण्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठविला आहे. मात्र, हा अहवाल सादर होऊनही शासनाने अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष समितीच्या अहवालानंतरही न्याय मिळत नसल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आता बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारला आहे.

शासनाच्या भूमिकेमुळे राज्यातील न्यायव्यवस्थेचे दैनंदिन कामकाज विस्कळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये मोठ्या संख्येने कर्मचारी कार्यरत आहेत. न्यायालयीन कामकाजात या कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे राज्यातील सुमारे ३४ हजार कर्मचारी बेमुदत संपावर गेल्याने न्यायालयीन कामकाजावर त्याचा मोठा परिणाम दिसुन आला आहे. वाशिम जिल्ह्यातील जिल्हा न्यायालयासह तालुकास्तरीय न्यायालयांतील कर्मचारीही संपात सहभागी झाले असल्याने जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाज प्रभावित झाले आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य न्यायिक अधिकारी संघ, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशन तसेच राज्यातील विविध जिल्हा व तालुका वकील संघटनांनी पाठिंबा दर्शविला आहे. याशिवाय सर्वपक्षीय मंत्री, आमदार आणि खासदार यांनाही या मागणीसाठी निवेदने देण्यात आले आहे. दुसरीकडे, महासंघाचे अध्यक्ष दिगंबर दादा निकम हे आमरण उपोषणाला बसणार असून, ज्येष्ठ सेवानिवृत्त कर्मचारी पुन्हा साखळी उपोषण सुरू करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३५० ■ बुधवार, १८ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

उमेदच्या दिवाळी फराळ महोत्सवातून १७ लाख ६० हजाराची उलाढाल

१२९ स्टॉल्सच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादनांना मोठा प्रतिसाद

वर्धा जनमाध्यम : महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासोबतच त्यांच्या उत्पादनांना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाच्यावतीने दिवाळी फराळ महोत्सवचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या एकूण १२९ स्टॉल्सच्या माध्यमातून १७ लाख ६० हजार ५५९ रुपयांची उलाढाल नोंदविण्यात आली.



उमेद अभियानांतर्गत ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या पारंपरिक दिवाळी फराळासह विविध खाद्यपदार्थ, शोभेच्या वस्तू, आकर्षक सजावटीचे साहित्य, लक्ष्मीमूर्ती तसेच हस्तकलेच्या वस्तूंना ग्राहकांकडून चांगली मागणी मिळाली. या महोत्सवामुळे महिलांना स्वतःच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली. त्यांच्या व्यवसायाला आर्थिक बळ मिळाले. उपक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक नीरज नखाते, विपणन जिल्हा व्यवस्थापक मनीष कावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

जिल्हास्तरावर आयोजित महोत्सवामध्ये एकूण २३ स्टॉल्स उभारण्यात आले होते. त्यामध्ये ३१ महिला सहभागी झाल्या होत्या. या स्टॉल्सच्या माध्यमातून ५ लाख ६५ हजार ३७८ रुपयांची विक्री झाली. तसेच तालुकास्तरावर समुद्रपूर, कारंजा, हिंगणघाट, सेलू, पुलगाव-देवळी आणि आर्वी येथे आयोजित महोत्सवामध्ये १०६ स्टॉल्स उभारण्यात आले होते. यामध्ये १४३ महिलांनी सहभाग घेतला असून ११ लाख ९५ हजार १८१ रुपयांची विक्री नोंदविण्यात आली.

या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांच्या पारंपरिक पाककला, कौशल्य आणि उद्योजकतेला व्यासपीठ मिळाले. महिलांनी केवळ उत्पादन निर्मितीपुरते मर्यादित न राहता स्वतः विक्री, ग्राहकांशी संवाद आणि आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचा अनुभव घेतला.

दिवाळीच्या सणाच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचा उमेद अभियानाचा हा प्रयत्न यशस्वी ठरला आहे. महिलांच्या कष्टाला बाजारपेठ आणि त्यांच्या उत्पादनांना ग्राहकांचा प्रतिसाद मिळाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दिशेने हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरला आहे, असे उमेदच्यावतीने कळविण्यात आले आहे.

जनमाध्यमच्या दणक्याने प्रशासन धावले; १५ वर्षांनंतर पिपरा मायनरच्या कामाला मुहूर्त

६५ लाखांचे अंदाजपत्रक कागदावरून प्रत्यक्षात; दोन सायफनमधील कामाला सुरुवात

सेलू / जनमाध्यम : शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न १५ वर्षे प्रलंबित ठेवणाऱ्या प्रशासनाला अखेर जनमाध्यमच्या वृत्ताचा दणका बसला आहे. बोर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पिपरा मायनरच्या दोन सायफनमधील रखडलेल्या कामाला अखेर प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. जनमाध्यमने सातत्याने केलेला आक्रमक पाठपुरावा आणि शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा इशारा यामुळे प्रशासकीय यंत्रणा हलली असून, वर्षानुवर्षे कागदावरच अडकलेले काम आता प्रत्यक्षात उतरू लागले आहे.

बोर धरणाच्या कालव्याला लागलेली गळती, पाइपलाइनमध्ये साचलेला गाळ आणि पिपरा मायनरच्या दुरुस्तीचा प्रश्न २०११ पासून प्रलंबित होता. परिणामी सेलू परिसरातील शेकडो शेतकऱ्यांना सिंचनाच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत होते. विशेषतः कालव्याच्या शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी मिळत नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले होते. शेतकऱ्यांनी वारंवार मागण्या करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांचीच खैरात सुरू होती.



काम सुरू झाले, आता पूर्णत्वाची प्रतीक्षा

कामाचा श्रीगणेशा झाला म्हणून शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला असे नाही. काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. अन्यथा पुन्हा कागदी आश्वासनांच्या गर्तेत हा प्रश्न अडकण्याची भीती आहे. शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचेपर्यंत हा लढा थांबणार नाही, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. आता प्रशासन काम पूर्ण करण्याची जबाबदारी किती गांभीर्याने पार पाडते, याकडे संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

या गंभीर प्रश्नावर जनमाध्यमने प्रशासनाच्या दिरंगाईचा पर्दाफाश करीत वृत्त प्रसिद्ध केले. विशेष म्हणजे, या कामासाठी ६५ लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मात्र, निधी आणि कामाच्या अंमलबजावणीचा प्रश्न अनुत्तरितच होता. कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रत्यक्ष कामाला मुहूर्त मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होती.

मौजे हिवरा परिसरातील पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष मुकिंदा खोंडे यांच्यासह शेतकऱ्यांनी सातत्याने निवेदने देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र, त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. अखेर जनमाध्यमच्या वृत्तानंतर पिपरा मायनरच्या दोन्ही सायफनमधील कामाला सुरुवात झाली आहे.

पोलीस क्राईम डायरी

विषारी औषध प्राशनाने विवाहितेचा मृत्यू; आमगावात हळहळ

सेलू : सेलू तालुक्यातील आमगाव (ज) येथील ३४ वर्षीय विवाहितेचा विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला. ज्योत्सना लोमेश्वर झामरे असे मृत महिलेचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योत्सना यांना मागील दोन ते तीन महिन्यांपासून टायफॉईडचा त्रास होता. तसेच दात बसविल्यामुळे त्यांना दातदुखीचाही त्रास जाणवत होता. या सततच्या शारीरिक त्रासामुळे त्या मानसिक तणावात होत्या. दरम्यान, ७ नोव्हेंबर रोजी त्यांनी जनावरांच्या गोठ्यात ठेवलेले शेतातील पिकांवर फवारणी करण्याचे विषारी औषध प्राशन केले. प्रकृती खालावल्याने त्यांना कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.४० वाजता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. पती लोमेश्वर झामरे यांच्या तक्रारीवरून सेलू पोलिसांनी मर्ग दाखल केला. विवाहाला सात वर्षांपेक्षा कमी कालावधी झाल्याने पोलिसांनी विशेष अहवाल सादर केला असून पुढील तपास सुरू आहे.

शेतात विषारी औषध प्राशन; ६५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू

सावंगी (मेघे) : सालोड हिरापूर येथील ६५ वर्षीय शेतकऱ्याचा विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला. दीपकराव भावरावजी भावकर असे मृतकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपकराव भावकर हे १५ नोव्हेंबर रोजी पालोटी रोडवरील विद्यासागर शाळेजवळ असलेल्या स्वतःच्या शेतात गेले होते. यावेळी त्यांनी शेतात विषारी औषध प्राशन केले. ही बाब लक्षात येताच त्यांना तातडीने उपचारासाठी सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी उपचार सुरू केले; मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर मुलगा राजू दीपकराव भावकर यांनी पोलिसांना तक्रार दिली. त्यावरून सावंगी (मेघे) पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

विषारी औषध प्राशन केलेल्या ३४ वर्षीय तरुणाचा मृत्यू

देवळी : पळसगाव परिसरात विषारी औषध प्राशन केलेल्या ३४ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अक्षय विनोदराव खरडे असे मृत तरुणाचे नाव असून तो पळसगाव येथील रहिवासी होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय खरडे याने ९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास विषारी औषध प्राशन केले होते. प्रकृती खालावल्याने त्याला उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे दाखल करण्यात आले. रुग्णालयात डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सेवाग्राम पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानंतर संबंधित मर्ग डायरी देवळी पोलीस ठाण्यात प्राप्त झाली. घटनास्थळ देवळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असल्याने देवळी पोलिसांनी १६ नोव्हेंबर रोजी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. अक्षयने विषारी औषध प्राशन करण्यामागील कारण अद्याप समजू शकलेले नाही.

रुग्णालयात उपचारादरम्यान ४२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू; कारण अस्पष्ट

देवळी : देवळी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असताना ४२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. रमेश यादवराव मेश्राम असे मृत व्यक्तीचे नाव असून ते देवळी येथील रहिवासी होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश मेश्राम यांची प्रकृती खालावल्याने त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पोलिसांना माहिती देण्यात आली. सुरुवातीला या घटनेची आकस्मिक मृत्यूची नोंद वर्धा पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानंतर संबंधित मर्ग डायरी देवळी पोलीस ठाण्यात प्राप्त झाली. घटनास्थळ देवळी हद्दीत येत असल्याने देवळी पोलिसांनी १६ नोव्हेंबर रोजी मर्ग क्रमांक ६३/२०२६ नुसार नोंद केली. मृत्यूचे कारण शोधण्यासाठी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

रेतीचोरी करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलिसांचा दणका

चालक मालकाविरुद्ध गुन्हा दाखल ६.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगणघाट जनमाध्यम : हिंगणघाट तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि रेती वाहतुकीचा प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. वालदूर नाल्यातून विनापरवाना रेतीची चोरी करून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत रेतीने भरलेला ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा एकूण ६ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चालकासह ट्रॅक्टर मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री हिंगणघाट पोलीस ठाण्याचे पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गस्तीवर होते. यावेळी गोपनीय माहिती मिळाली की, वालदूर नाल्यातून रेती भरलेला ट्रॅक्टर वालदूर मार्गे पिंपळगावकडे जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पिंपळगाव ते वालदूर गावादरम्यान असलेल्या कॅनलजवळील रस्त्यावर नाकाबंदी केली.



काही वेळातच संशयित ट्रॅक्टर येताना दिसताच पोलिसांनी त्याला थांबविले. चालकाची चौकशी केली असता त्याने चंद्रशेखर वसंतराव नेहारे (३३, रा. पिंपळगाव, ता. हिंगणघाट) असे नाव सांगितले. हा ट्रॅक्टर चेतन अशोक पिटेकर (२०, रा. पिंपळगाव) याच्या मालकीचा असून, त्याच्या सांगण्यावरून वालदूर नाल्यातून रेती भरून आणत असल्याची माहिती चालकाने पोलिसांना दिली. ट्रॅक्टरची तपासणी केली असता ट्रॉलीमध्ये एक ब्रास म्हणजेच १२० घनफूट रेती आढळून आली. या रेतीची अंदाजे किंमत पाच हजार रुपये आहे. तसेच महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टरचे इंजिन आणि ट्रॉलीची किंमत अनुक्रमे पाच लाख व एक लाख ५० हजार रुपये असल्याने एकूण ६ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

विशेष म्हणजे, रेती वाहतुकीचा कोणताही अधिकृत परवाना चालकाकडे नव्हता. तसेच ट्रॅक्टरची आवश्यक कागदपत्रे आणि वाहन चालविण्याचा परवानाही नसल्याचे तपासात समोर आले. त्यामुळे चंद्रशेखर नेहारे आणि ट्रॅक्टर मालक चेतन पिटेकर यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ३०३ (२), ३ (५) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डी. जी. पळनाटे करीत आहेत.

पिकांचे रक्षण करणारी 'झटका मशीन'च चोरट्यांनी पळवली

हिंगणी शिवारात शेतकऱ्याला दहा हजारांचा फटका

सेलू / जनमाध्यम रानडुकरांसह वन्यप्राण्यांपासून कपाशीच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतात लावलेली झटका मशीनच चोरट्यांनी लंपास केल्याची घटना हिंगणी शिवारात उघडकीस आली आहे.

१६ नोव्हेंबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी नदीम शेख यांच्या शेतातील ही मशीन चोरून नेली. या चोरीमुळे शेतकऱ्याचे सुमारे दहा हजार रुपयांचे नुकसान झाले असून, याप्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सध्या कपाशीचे पीक जोमात असताना रानडुकरांसह वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. यासाठी नदीम शेख यांनी शेतात झटका मशीन बसवली होती. मात्र, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी हीच मशीन पळविली. सकाळी शेतात गेल्यानंतर मशीन गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

पुस्तकांच्या भेटीतून वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन, नगराध्यक्षांकडून वाचनालयाचे कौतुक

स्व. नारायणसिंग मस्के सार्वजनिक वाचनालयाला ४० पुस्तकांची भेट

हिंगणघाट जनमाध्यम : वाचनसंस्कृती टिकविण्यासोबतच ती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. याच सामाजिक जाणिवेतून हिंगणघाट येथील आठवडी बाजार परिसरातील अभयंकर शाळेत असलेल्या स्व. नारायणसिंग मस्के सार्वजनिक वाचनालयाला नगराध्यक्षांसह नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देत ४० पुस्तके भेट दिली.



यावेळी नगराध्यक्ष सौ. नयना तुळसकर, शिक्षण सभापती सौ. पल्लवी बाराहाते, नगरपरिषदेचे अधिकारी प्रवीण काळे तसेच प्रभाग क्रमांक १० चे नगरसेवक युवनाथे उपस्थित होते. त्यांनी वाचनालयाची पाहणी करून तेथील पुस्तकसंग्रह व वाचनालयाच्या उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी मान्यवरांनी वाचनालयाच्या कार्याचे कौतुक केले. तसेच पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञान, विचार आणि संस्कारांची जोपासना करण्यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या ४० पुस्तकांच्या भेटीमुळे वाचनालयाच्या पुस्तकसंग्रहात भर पडली असून, वाचकांना विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमातून सार्वजनिक वाचनालयांना प्रोत्साहन देण्याचा आणि समाजात वाचनाची आवड निर्माण करण्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

१२ वर्षीय मुलीच्या नाकातील मोठी गाठ काढली

सावंगी मेघेतील एव्हीबीआरएचच्या डॉक्टरांची यशस्वी शस्त्रक्रिया; आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

वर्धा जनमाध्यम : नाकाने श्वास घेण्यास अडथळा आणि चेहऱ्याच्या उजव्या बाजूला जडपणा जाणवणाऱ्या १२ वर्षीय मुलीला सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील (एव्हीबीआरएच) डॉक्टरांनी मोठा दिलासा दिला आहे. मुलीच्या नाक आणि सायनसमध्ये पसरलेली मोठी गाठ अत्याधुनिक एंडोस्कोपिक तंत्रज्ञानाच्या मदतीने यशस्वीपणे काढण्यात आली. विशेष म्हणजे, या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी चेहऱ्यावर कोणताही बाहेरील कट देण्यात आला नाही.

मुलीच्या नाकातील उजव्या बाजूला असलेली गाठ मॅक्सिलरी आणि स्फेनॉइड सायनसपर्यंत पसरली होती. त्यामुळे नाकाचा मार्ग जवळपास पूर्णपणे बंद झाला होता. सीटी स्कॅनमध्ये गाठीचा दाब आजूबाजूच्या हाडांसह डोळ्याच्या आतील व खालच्या भागाजवळ असल्याचे स्पष्ट झाले. कमी वय आणि चेहऱ्याच्या हाडांची सुरू असलेली वाढ लक्षात घेता शस्त्रक्रिया आव्हानात्मक होती. पारंपरिक शस्त्रक्रियेत चेहऱ्यावर कट देण्याची आणि व्रण राहण्याची शक्यता होती. त्यामुळे डॉक्टरांनी नाकाच्या नैसर्गिक मार्गातूनच एंडोस्कोपच्या साहाय्याने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. अनेक तास चाललेल्या या शस्त्रक्रियेत डोळे आणि मेंदूच्या खालच्या भागातील महत्त्वाच्या संरचनांना इजा होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली.

शस्त्रक्रियेनंतर मुलीची प्रकृती स्थिर असून तिला श्वास घेण्यास मोठा दिलासा मिळाला आहे. काढलेली गाठ तपासणीसाठी पाठविण्यात आली आहे. ही शस्त्रक्रिया डॉ. चंद्रवीर सिंह, डॉ. सागर गौरकर, डॉ. प्रसाद देशमुख, डॉ. फरहत खान आणि डॉ. श्रद्धा जैन यांच्या पथकाने केली. भूलतज्ज्ञ डॉ. सेन यांचेही सहकार्य लाभले.

वर्धा जिल्ह्यातील सातही तालुक्यांत कर्मचारी बेमुदत संपावर

३५ हजार कर्मचाऱ्यांचा आंदोलनात सहभाग

वर्धा जनमाध्यम : सुधारित वेतनवाढीचा प्रस्ताव तब्बल २२ महिन्यांपासून शासनदरबारी प्रलंबित असल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संयम अखेर सुटला आहे. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी राज्यभरातील सुमारे ३५ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनाचे तीव्र पडसाद वर्धा जिल्ह्यातही उमटले असून जिल्ह्यातील सातही तालुक्यांमधील न्यायालयीन कर्मचारी संपात शंभर टक्के सहभागी झाले आहेत.

लघुलेखक, लिपिक आणि शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात सहभाग नोंदविल्याने न्यायालयीन



फोटो- राहुल तेलरांधे वर्धा

व्यवस्थेतील महत्त्वाचा घटकच कामापासून दूर झाला आहे. परिणामी न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. न्यायदानाच्या प्रक्रियेत न्यायाधीशांइतकीच महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे मात्र शासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. संप पुकारण्यापूर्वी कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालय आणि राज्य शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. निवेदने दिली, काळ्या फिती लावून निषेध नोंदविला; मात्र शासनाकडून ठोस निर्णय घेण्यात आला नाही.

दरम्यान, उच्च न्यायालयाने अभ्यासपूर्णरीत्या सुधारित वेतनवाढीचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर केला. मात्र, तब्बल २२ महिने उलटूनही या प्रस्तावावर शासनाने सकारात्मक भूमिका घेतलेली नाही. उच्च न्यायालयाने पाठविलेल्या प्रस्तावालाच शासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने हा न्यायालयाचा अवमान असल्याची भावनाही कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

शासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. वारंवार विनंत्या, निवेदने आणि शांततामय आंदोलन करूनही मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने अखेर बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला. न्यायव्यवस्थेचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांनाच आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली असून, शासन आता तरी या आंदोलनाची दखल घेऊन वेतनवाढीच्या प्रस्तावावर निर्णय घेणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

उद्या आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर वर्धा दौऱ्यावर

सेलू, हिंगणी, सेवाग्रामला भेटी; आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी साधणार संवाद

वर्धा जनमाध्यम : राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर गुरुवार, १९ नोव्हेंबर रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते ग्रामीण रुग्णालय सेलू, प्राथमिक आरोग्य केंद्र हिंगणी आणि सेवाग्राम येथे भेट देऊन आरोग्य सुविधांची पाहणी करणार आहेत.

दुपारी ३.३० वाजता ग्रामीण रुग्णालय सेलू येथे त्यांच्या दौऱ्याची सुरुवात होईल. सायंकाळी ४.३० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र हिंगणी येथे भेट व पाहणी केल्यानंतर ५.३० वाजता सेवाग्राम येथे भेट देतील.

सायंकाळी ६.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती तसेच जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत विविध आरोग्य समित्यांचे पदाधिकारी व अधिकाऱ्यांशी ते आरोग्य संवाद साधतील. त्यानंतर सायंकाळी ७.१५ वाजता वर्धा शहरातील खासगी डॉक्टरांशी संवाद साधणार आहेत.

मंत्र्यांच्या या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील शासकीय आरोग्य यंत्रणा आणि आरोग्य सुविधांच्या सद्यस्थितीकडे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

बाळासाहेबांचा वारसा आम्ही पुढे नेत आहोत

मुंबई / प्रतिनिधी- बाळासाहेबांनी दिलेला हिंदुत्वाचा विचार आणि ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हा मूलमंत्र शिवसेना आजही तितक्याच निष्ठेने आणि ताकदीने जपत आहे. बाळासाहेबांच्या विचारांवर चालणारे सरकार सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देत असून, समाजकारणाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडविण्याचे काम करीत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रिगल सिनेमासमोरील शिवसेनाप्रमुखांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना शिंदे यांनी बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे वरिष्ठ नेते, उपनेते, मंत्री, खासदार, आमदार तसेच प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्ता हा घरात बसण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या सेवेसाठी मैदानात उतरला पाहिजे, ही बाळासाहेबांची शिकवण होती.त्याच विचारातून दुष्काळग्रस्त भागांत शिवसैनिक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेत असून, संकटात त्यांना मदतीचा हात देत आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. जिथे संकट, तिथे शिवसेना आणि जिथे आपत्ती, तिथे शिवसेना हा बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांनी दिलेला सेवाभावाचा मंत्र प्रत्यक्षात उतरविण्याचे काम सुरू आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिवसेनेचे आमदार, खासदार, मंत्री, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे, अशा सूचना देण्यात आल्याचेही शिंदे यांनी सांगितले.



शेतक-यांची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, असा शब्द सरकारने दिला होता. त्यानुसार तातडीची पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असून, शिवसेनेच्या वतीनेही शेतक-यांना दिवाळी मदत पोहोचविण्यात आली आहे. शेतक-यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकार यापुढेही सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

विरोधकांनी मदतीच्या मुद्यावर राजकारण करू नये

राज्यात शेतक-यांच्या मागणीनुसार दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, मंत्रिमंडळातील सदस्यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. दुष्काळग्रस्तांना १२ प्रकारच्या सवलतींसह नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे अग्रिम मदतीच्या मुद्यावरून विरोधकांनी राजकारण करण्यापेक्षा शेतक-यांच्या मदतीसाठी पुढे यावे. हा आरोप-प्रत्यारोपांचा नव्हे, तर संकटग्रस्त शेतक-यांना आधार देण्याचा काळ आहे असे आवाहनही शिंदे यांनी केले.

गांजाची शेती उघड; २०० हून अधिक झाडे जप्त

श्रीक्षेत्र माहूर : माहूर तालुक्यात गांजाच्या अवैध लागवडीचे प्रकार उघडकीस येत असल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. देहेगाव येथे कालच ४४ लाख रुपये किमतीची गांजाची झाडे जप्त करण्यात आली होती. या घटनेपाठोपाठ आज, दि. १७ नोव्हेंबर रोजी मौजे दत्त मांजरी येथे काळा पाणी तलावालगत असलेल्या शेतात पोलिसांनी छापा टाकून २०० हून अधिक गांजाची झाडे जप्त केली. या मुद्देमालाची किंमत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.



मौजे दत्त मांजरी आणि श्री दत्त शिखर संस्थान यांच्या दरम्यान काळा पाणी तलाव असून तलावालगत घनदाट जंगलाच्या परिसरात सुनील पवार यांचे शेत आहे. या शेतात मोठ्या प्रमाणावर गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक देविदास चोपडे व सहाय्यक पोलिस निरीक्षक शरद घोडके यांच्या पथकाने रात्री शेतात धाड टाकली. या कारवाईदरम्यान शेतात गांजाची २०० हून अधिक झाडे आढळून आली. पंचांच्या उपस्थितीत ही झाडे उपटून जप्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. रात्री अकरा वाजेपर्यंत ही कारवाई सुरू होती. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, देहेगावपाठोपाठ दत्त मांजरी येथेही गांजाची शेती आढळून आल्याने माहूर तालुक्यात अवैध गांजा लागवडीचे जाळे किती विस्तारले आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तालुक्यातील संशयित शेतांची विशेष पथकाद्वारे तपासणी मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक शरद घोडके, आशिष कांबळे, ज्ञानोबा खंदाडे, पवन राऊत, पंच मनोज कीर्तने, मंडळ अधिकारी पाईकराव तसेच अन्य पंच व होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

शिर्डी विमानतळावर पंचतारांकित हॉटेल उभारणीसाठी ताज समूहासोबत सामंजस्य करार

मुंबई/प्रतिनिधी- शिर्डी विमानतळ परिसरातील पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीने पंचतारांकित हॉटेल विकसित करण्यात येणार आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि दी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड (ताज समूह) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रालयात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे शिर्डी विमानतळ परिसरात विमान प्रवाशांसह देश-विदेशातून येणाऱ्या साईभक्तांना दर्जेदार निवास आणि आदरातिथ्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या सामंजस्य करार प्रसंगी वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळ आहे.श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने



भाविक येथे येत असतात. शिर्डी विमानतळामुळे या भागाची हवाई कनेक्टिव्हिटी वाढली असून, विमानतळाच्या परिसरात जागतिक दर्जाच्या सुविधा विकसित होईल व पंचतारांकित हॉटेलच्या उभारणीमुळे शिर्डीच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी टाटा समूह आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला शुभेच्छा देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ताज समूहासारख्या नामांकित हॉटेल उद्योगसमूहाच्या सहभागामुळे शिर्डी विमानतळासह परिसराच्या विकासाला चालना मिळेल. या प्रकल्पांच्या माध्यमातून पर्यटनवाढीसोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि रोजगारनिर्मितीलाही हातभार लागेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच शिर्डी विमानतळाच्या विकासामुळे शिर्डीच्या धार्मिक पर्यटनाला आणि परिसराच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याने शिर्डी विमानतळाच्या कामालाही अधिक गती द्यावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

उत्तराखंड, झारखंडच्या संस्कृतीतून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन- राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई/ प्रतिनिधी - भारताची सांस्कृतिक विविधता हीच आपली शक्ती असून, विविध राज्यांच्या संस्कृतीचा आदर, परस्पर समन्वय आणि बंधुभावातून राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ झाली पाहिजे. 'एक भारत श्रेष्ठ भारत' या संकल्पनेचा उद्देश केवळ राज्यांचे स्थापना दिन साजरे करणे नसून, एकमेकांची संस्कृती समजून घेणे आणि परस्पर संबंध दृढ करणे हा आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. उत्तराखंड आणि झारखंड राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त लोकभवनातील दरबार हॉल येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. यावेळी उत्तराखंड आणि झारखंडमधील कलाकारांनी दोन्ही राज्यांची समृद्ध लोककला, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचे दर्शन घडविणारे विविध कार्यक्रम सादर केले. २००० मध्ये तत्कालीन पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली छत्तीसगड, उत्तराखंड आणि झारखंड या तीन नव्या राज्यांची निर्मिती झाली. उत्तराखंड ही देवभूमी असून बद्रीनाथ, केदारनाथ यांसारखी पवित्र तीर्थक्षेत्रे, आदि शंकराचार्यांची तपोभूमी आणि नैसर्गिक सौंदर्यामुळे या राज्याला आध्यात्मिक व सांस्कृतिक वारशात विशेष स्थान आहे. उत्तराखंडने देशाला अनेक शूर सैनिक आणि लष्करी अधिकारी दिले असून, जनरल बिपिन रावत यांचे देशसेवेतील योगदान उल्लेखनीय आहे, असे राज्यपालांनी सांगितले. उत्तराखंड आणि महाराष्ट्र यांच्यात विशेष आत्मीयतेचे नाते आहे. माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी दोन्ही राज्यांमध्ये जनसेवेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्रात स्थायिक झालेले उत्तराखंडचे नागरिक येथील संस्कृती आणि परंपरांमध्ये समरस झाले असून, अनेक जण मराठी भाषाही उत्तम बोलतात. हा सांस्कृतिक समन्वय राष्ट्रीय एकतेचे सुंदर उदाहरण असल्याचे राज्यपाल म्हणाले.

झारखंड भगवान बिरसा मुंडा यांची वीरभूमी असून, त्यांचे जीवन स्वाभिमान, साहस आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा देते. खनिज संपत्ती, नैसर्गिक सौंदर्य, जनजातीय संस्कृती आणि कष्टाळू लोक ही झारखंडची खरी ताकद आहे. कृषी, फलोत्पादन, पशुपालन, मत्स्यपालन, सेंद्रिय शेती तसेच उद्योजकता आणि स्टार्टअप क्षेत्रात या राज्याला मोठ्या संधी आहेत. तरुणांनी उद्योजकतेकडे वळून रोजगारनिर्मिती आणि आपल्या प्रदेशाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.महाराष्ट्र ही संतांची आणि समाजसुधारकांची भूमी, उत्तराखंड ही देवभूमी, तर झारखंड ही जनजातीय गौरव आणि नैसर्गिक संपत्तीची भूमी आहे. या तिन्ही राज्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक वारशातून देशाची विविधता अधोरेखित होते. महाराष्ट्रातील नागरिकांनी उत्तराखंड आणि झारखंडला भेट देऊन तेथील नैसर्गिक सौंदर्य व सांस्कृतिक वारसा जाणून घ्यावा, तसेच या राज्यांतील नागरिकांनीही महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची ओळख करून घ्यावी, असे आवाहन राज्यपालांनी केले. याचेळी कार्यक्रमासाठी उपस्थित अभिनेत्री हिमानी शिवपुरी, बद्री केदार चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त केसर सिंह बिष्ट, जय फाउंडेशन व रुद्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय सिंह, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेत्या 'ढोली' या गढवाली चित्रपटाचे निर्माते शिशिर कृष्ण शर्मा, दिग्दर्शक दिनेश भोसले, यांना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सन्मानित केले.

गडचिरोलीत वैद्यकीय महाविद्यालयासह अन्य विकासकामांनाही गती द्यावी- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वनविभागाला निर्देश

मुंबई/प्रतिनिधी- गडचिरोलीसारख्या दुर्गम व आदिवासीबहुल जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय, राष्ट्रीय महामार्ग आणि अन्य विकासकामे अनावश्यक वन्यजीव परवानग्यांच्या अटींमुळे प्रलंबित राहू नयेत. प्रत्यक्ष व्याघ्र भ्रमणमार्ग नसलेल्या क्षेत्रात परवानग्यांचा आग्रह धरून विकासकामांना अडथळा न करता रखडलेल्या प्रकल्पांना तातडीने गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाच्या विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (वने) संजय खंदारे यांच्यासह प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय



संचालक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गडचिरोलीतील वैद्यकीय महाविद्यालय व रस्ते प्रकल्पांना गती

गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव प्रत्यक्ष व्याघ्र भ्रमणमार्गात येत नसल्याने या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कामकाज तात्काळ मार्गी लावावे. त्याचबरोबर, २८ किलोमीटरच्या महामार्गापैकी केवळ २ ते ३ किलोमीटरचा भाग व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यास संपूर्ण महामार्गाचे काम थांबविणे योग्य नाही. त्यामुळे उर्वरित भागातील काम तातडीने सुरू करावे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या ३२ अधिकृत व्याघ्र भ्रमणमार्गाचेच निकष 'परिवेश' (Parivesh) पोर्टलवर लागू करावेत. तसेच जुन्या रस्त्यांचे डांबरीकरण आणि रुंदीकरण करताना अनावश्यक अडथळे निर्माण करू नयेत, असेही निर्देश त्यांनी दिले.

बांबू लागवडीतून इथेनॉल निर्मितीला चालना- मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासोबतच वनालगतच्या शेतकऱ्यांना शाश्वत रोजगार आणि उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र वन विकास महामंडळ आणि एमआयडीसी यांच्या समन्वयातून बांबू लागवड व त्यापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. संरक्षित क्षेत्रालगत मोठ्या वृक्षांची तोड थांबवून बांबू लागवडीला प्राधान्य द्यावे. उसाच्या तुलनेत बांबूला निम्मे पाणी लागते आणि त्यापासून इथेनॉल निर्मितीची मोठी क्षमता आहे. एमआयडीसीने बांबू लागवडीसाठी जागा भाडेतत्त्वावर घेऊन शेतकऱ्यांना वार्षिक भाडे द्यावे आणि त्या माध्यमातून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प उभारावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सामूहिक वनहक्क समित्यांचा कार्यकाळ ग्रामपंचायतीशी सुसंगत ठेवा

राज्यातील १८ लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे साडेपाच लाख हेक्टर क्षेत्र सामूहिक वनहक्कांतर्गत येते. या क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी स्थापन होणाऱ्या समित्यांचा कार्यकाळ निश्चित करावा. ग्रामसभेने स्थापन केलेल्या सामूहिक वनहक्क समित्यांचा कार्यकाळ संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाशी सुसंगत असावा. तसेच तेंदूपत्ता आणि अन्य गौण वनोपजाच्या लिलावासाठी पारदर्शक, शास्त्रीय व निश्चित कार्यपद्धती तयार करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

कामगार विभागाच्या सेवा व योजनांची प्रक्रिया अधिक सुलभ होणार-कामगार मंत्री

मुंबई/प्रतिनिधी- कामगार विभागाच्या २९ सेवा आणि १८ योजनांच्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचनेस (जीपीआर) मान्यता देण्यात आली आहे. या माध्यमातून कार्यालयीन फेऱ्या, अर्जातील रकाने, आवश्यक कागदपत्रे, मंजुरीचे स्तर आणि सेवा मंजुरीचा कालावधी कमी होणार आहे. या सेवा व योजनांसाठी तयार करण्यात येणारे पोर्टल नजीकच्या काळात कार्यान्वित केले जाईल. त्यामुळे नागरिक आणि व्यावसायिकांना लाभ होईल, असे कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी सांगितले. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली २७ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शासकीय प्रक्रिया पुनर्रचना समितीच्या बैठकीत कामगार विभागाच्या २९ जी-टू-बी व जी-टू-सी सेवा आणि १८ योजनांची प्रक्रिया पुनर्रचना अंतिम करण्यास सहमती देण्यात आली. त्यानुसार कामगार विभागाने १७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे या प्रक्रियेला मान्यता दिली आहे. या पुनर्रचनेनुसार आवश्यक अर्ज, कागदपत्रे, मंजुरीचे स्तर तसेच अंतिम सेवा मान्यतेसाठीचे दाखले व प्रमाणपत्रांमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत. या सर्व सेवा व योजनांचा लाभ अधिक सुलभपणे देण्यासाठी स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात येत आहे.



शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या आवश्यक अटी शिथिल करणार-कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश

मुंबई/प्रतिनिधी- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात कृषीविषयक योजना राबविताना शेतकरी उत्पादक कंपन्या आणि संघटनांना येणाऱ्या अडचणींचा विचार करून शेतकरी हितासाठी या कंपन्यांच्या आवश्यक अटी शिथिल करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

कृषीमंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोनची आढावा बैठक झाली. या बैठकीत शेतकरी उत्पादक कंपन्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी, पात्रतेचे निकष, अनुदान प्रक्रिया आणि कृषी व्यवसाय घटकांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार देवराव भोंगळे, सचिव परिमल सिंह, स्मार्ट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक प्रदीप चंद्रन,नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक मीनल करणवाल यांच्यासह विभागातील अधिकारी उपस्थित होते.प्रकल्पांतर्गत कृषी मूल्यसाखळी बळकटीकरण, कृषी व्यवसाय विकास केंद्र आणि वैयक्तिक कृषी उद्योजकता या घटकांवर भर देण्यात आला आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना गोदामे, शीतगृहे, कांदा चाळ, बीज प्रक्रिया केंद्रे, अन्नधान्य प्रक्रिया उद्योग, कृषी अवजारे, पशुखाद्य निर्मिती आणि जैविक निविष्ठा निर्मितीसारखे व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असल्याचे कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले. शेडनेट व पॉलीहाऊससाठी अनुदान, शेती सिंचनासाठी इलेक्ट्रॉनिक बिलाची अट, शेळीपालनासाठी खरेदी प्रक्रिया, कृषी अवजारे बँक योजनेत शेतकरी उत्पादक कंपन्या व संघटनांचा समावेश तसेच गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाशी संबंधित अटी तपासून आवश्यक सुधारणा कराव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. शेतकरी उत्पादक संघटनांना केवळ आर्थिक सहाय्य देण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांना सक्षम कृषी उद्योजक म्हणून विकसित करण्याची आवश्यकता आहे. योजनांच्या अंमलबजावणीतील अनावश्यक अडथळे दूर करून शेतकऱ्यांना अधिक सुलभतेने लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी सकारात्मक भूमिका घ्यावी. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतीमालाचे मूल्यवर्धन करणे आणि ग्रामीण भागातील कृषी आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश कृषीमंत्री भरणे यांनी दिले.

संरक्षित सिंचन शेती क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यावर भर– कृषिमंत्री

मुंबई : संरक्षित सिंचन शेती क्षेत्रातील शेतकरी, हरितगृह व शेडनेट उत्पादक, उद्योजक तसेच सेवा पुरवठादारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी कृषी विभाग सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. या क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासोबतच संबंधित घटकांना भेडसावणारे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.इंडियन ग्रीन हाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन' च्या वतीने संरक्षित शेती आणि सिंचन क्षेत्रातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली फलोत्पादन विभाग आणि कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या वतीने आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी सचिव परिमल सिंह,ऑनलाईन आयुक्त सूरज मांढरे, प्रकल्प संचालक मीनल करनवाल, 'इंडियन ग्रीन हाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन'चे मनोज मानगावे, चेतन दहीया यासह सदस्य बैठकीला उपस्थित होते.

जिल्ह्यांमधील दुष्काळी परिस्थितीचा पालक सचिव आढावा घेणार-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी पालक सचिवांनी अधिवेशनापूर्वी राज्यातील सर्व जिल्ह्यांना भेट देऊन दुष्काळाच्या सर्व निकषांनुसार परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल मुख्य सचिवांकडे सादर करावा, असे निर्देश महसूल मंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. चिपळूण, दिंडोरी, वाडा आणि विक्रमगड या चार तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली असून, दुष्काळाची मागणी होत असलेल्या हातकणंगले, गडहिंग्लज, कागल, करवीर यासह अन्य तालुक्यांचे निकषांनुसार संपूर्ण सर्वेक्षण करून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या दुष्काळ उपसमितीची बैठक मंत्रालयात झाली. या बैठकीस कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंघल आदि उपस्थित होते.

पाणीटंचाईच्या उपाययोजनांना प्राधान्य

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या दहा उपाययोजनांबाबत येत्या एक-दोन दिवसांत शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे. जलजीवन मिशनअंतर्गत योजना पूर्ण झाल्यास ज्या गावांमध्ये टँकरची आवश्यकता भासणार नाही, अशा १३ तालुक्यांतील २१२ योजनांच्या कामांसाठी वित्त विभागाने ८३.१८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच रेट्रोफिटिंगसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या कामांसाठी यापूर्वीची ३४९ कोटी रुपयांची थकबाकी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणार असून हा निधी डिसेंबरअखेरपर्यंत मिळेल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. रिचार्ज शाफ्टच्या कामांसाठी एजन्सीची संख्या वाढविण्याची आवश्यकता असून, या कामांची दर्जात्मक मानके निश्चित करावीत. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक अधिकार द्यावेत, अशा सूचना मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केल्या.धाराशिव या आकांक्षित जिल्ह्यात केवळ ५.३४ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने तेथे विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. यासाठी विशेष बैठक घेऊन पुढील आठ ते दहा महिन्यांचे पाणी नियोजन करण्याची सूचना त्यांनी केली.दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन मृद व जलसंधारण विभागाचा यापूर्वी मंजूर करण्यात आलेला पाच हजार कोटी रुपयांचा नियोजन आराखडा रद्द करून नव्याने आराखडा तयार करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या नवीन आराखड्यात विदर्भ आणि मराठवाड्यासह भीषण दुष्काळी परिस्थिती असलेल्या तालुक्यांना प्राधान्य देण्यात यावे. यासाठी पुढील एक-दोन महिन्यांत कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करावी, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले. शिरपूर पॅटर्नप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत. यामुळे भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. जलसंधारण आणि जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागातील यंत्रसामग्री कार्यान्वित करून तलावांमधील गाळ काढण्याची कामे सुरू करावीत. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक अधिकार द्यावेत. गाव तलाव आणि साठवण तलावांच्या कामांना ग्रामविकास विभागाने प्राधान्य द्यावे, अशा सूचनाही देण्यात आल्या.पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी व्ही.बी.-जी. राम जी योजनेंतर्गत मका आणि ज्वारी या चारा पिकांची लागवड करण्याबाबत जिल्हास्तरीय यंत्रणांना कळविण्यात आले आहे. तलावांच्या बाजूला चारा लागवड करण्याबाबतही आदेश जारी करण्यात आले आहेत. पाणीटंचाई निवारणासाठी स्वयंसेवी संस्था कार्यरत असल्यास त्यांच्यासोबत जिल्हास्तरावर करार करून कामे करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. जिल्हा नियोजन समितीकडे (डीपीसी) निधी उपलब्ध असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक गरजेनुसार पाणीटंचाई निवारणाच्या कामांबाबत निर्णय घ्यावेत. नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत कृषीमंत्री भरणे यांनी विचार करण्याची मागणी केली. यावर १ एप्रिल २०२७ नंतर प्रोत्साहन निधी दिला जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

नैतिकता आणि कार्पोरेट संस्कृती

ज्या कंपनीच्या मुख्य कार्यकारी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पायाभूत सुविधांशी, चार हजार अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचलेल्या बाजारमूल्याशी आणि अमेरिका-चीनमधील तंत्रज्ञान स्पर्धेशी निगडित असते, तेव्हा ती रिकामी होणे ही केवळ कंपनीअंतर्गत घटना रहात नाही. त्या रिकाम्या खुर्चीमागे सत्ता, पैसा, नैतिकता आणि राष्ट्रीय सुरक्षा असे गुंतागुंतीचे अनेक प्रश्न उभे असतात. एनव्हीडियाच्या बाबतीत नेमके हेच घडले आहे. कंपनीचे सहसंस्थापक जेन्सन हुआंग यांनी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक म्हणून तत्काळ राजीनामा दिल्याची घोषणा एनव्हीडियाच्या संचालक मंडळाने करताच एकच गहजब उडाला. ३३ वर्षे तिचे नेतृत्व करणाऱ्या जेन्सन हुआंग यांच्याजागी मुख्य वित्तीय अधिकारी कोलेट क्रेस यांची अंतरिम मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. हार्डी जोन्स यांची मंडळाचे पहिलेच अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. दुसरीकडे संचालक मंडळाने कायमस्वरूपी उत्तराधिकाऱ्याचा शोध सुरू केला. मात्र, घटनाक्रम पाहता राजीनामा घेण्याचा निर्णय केवळ स्वेच्छेने घेतला गेला, असे म्हणणे कठीण आहे. गेल्याच महिन्यात उघडकीस आलेल्या एका अहवालानुसार जेन्सन हुआंग यांचे सिंगापूरस्थित डेटा सेंटर कंपनी मेगास्पीडशी निगडित असलेल्या चिनी व्यावसायिक महिला ॲलिस हुआंग यांच्याशी घनिष्ठ मैत्री होती. ॲलिस हुआंग या चीनच्या मुख्य गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात असून बीजिंगला माहिती पुरवत होत्या, असा अमेरिकन अधिकाऱ्यांचा संशय आहे. तेथूनच या राजीनामानाट्याची नांदी सुरू झाली. ८ नोव्हेंबर रोजी हुआंग यांनी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या संदेशात विवाहबाह्य संबंध ठेवून पत्नीची फसवणूक केल्याची कबुली दिली आणि लागलीच संचालक मंडळाने स्वतंत्र चौकशी सुरू केली. ११ नोव्हेंबर रोजी कंपनीतीलच दुसऱ्या विवाहबाह्य संबंधाचे वृत्त आले. त्याच रात्री मंडळाची बैठक होऊन दुसऱ्याच दिवशी राजीनामा जाहीर झाला. हुआंग यांनी स्वतः विवाहबाह्य संबंध असल्याचे मान्य केले आहे. ॲलिस हुआंग यांच्या मेगास्पीड कंपनीवर निर्बंधित चिप्स चौनपर्यंत पोहोचवण्यात मदत केल्याचा संशय असल्याने या प्रकरणाला हनी ट्रॅपचीही किनार आहे. चीनने हे आरोप बिनबुडाचे असल्याचे म्हटले आहे. दुसऱ्या संबंधाचे वृत्त अधिक थेटपणे कॉर्पोरेट नैतिकतेचा प्रश्न उपस्थित करते. हुआंग यांचा कंपनीतील त्यांच्या अधीन काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याशीही संबंध होता. त्याचे परिणाम केवळ वैयक्तिक प्रतिमेपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. हुआंग यांची 'कामासाठी समर्पित आणि शिस्तप्रिय' अशी प्रतिमा एका रात्रीत डळमळली. एनव्हीडियाच्या शेअरची किंमत घसरली. एका दिवसात ६०१ अब्ज डॉलर्सपर्यंत मूल्य उडाले. एनव्हीडिया ही जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींना लागणाऱ्या प्रगत चिप्सची रचना करणारी कंपनी आहे. तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर आणि भागीदारांचे जाळे हेच तिचे खरे सामर्थ्य आहे. आंग हे केवळ व्यवस्थापक नव्हते, तर कंपनीचे धोरण, तंत्रज्ञानाचा मार्ग आणि वॉशिंग्टनमधील धोरणनिर्मितीवर प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्त्व होते. २०२२ पासून अमेरिका प्रगत चिप्सच्या चीनमधील निर्यातीवर निर्बंध घालत आहे, कारण चीनच्या लष्करी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमतेला मर्यादा घालायची आहे. हुआंग मात्र चीनमध्ये अमेरिकन कंपन्यांचा सहभाग राहावा, यासाठी सातत्याने आवाज उठवत होते. चीनच्या बाजारपेठेत एनव्हीडियाचा वाटा पहिल्या सहामाहीत ३४ टक्क्यांवर आला आहे, तर त्यांच्या निर्यातीत ४४ टक्क्यांची घट झाली आहे. अशा परिस्थितीत मेगास्पीडसारख्या तिसऱ्या देशांतील मार्गावरून चिप्स जाण्याचा संशय अधिक संवेदनशील ठरतो. या प्रकरणामागे तंत्रज्ञान आणि भूराजकीय शीतयुद्ध आहे का, हेही स्पष्ट व्हायचे आहे. पुढील काही महिन्यांत तीन प्रश्न निर्णायक ठरतील. पहिला, स्वतंत्र चौकशीतून काय बाहेर येते. दुसरा, काँग्रेससमोरच्या साक्षीतून राष्ट्रीय सुरक्षेबाबत काय स्पष्ट होते. तिसरा, कायमस्वरूपी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची निवड कोणत्या निकषांवर होते. चौकशीत गुपिते बाहेर गेल्याचे सिद्ध झाले नाही, तरीही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तनाबाबतचे प्रश्न कायम राहतील. आरोप सिद्ध झाले तर त्याचे परिणाम आणखी गंभीर होतील. दोन्ही परिस्थितींमध्ये एनव्हीडियाला पारदर्शकता आणि अंतर्गत नियंत्रण अधिक बळकट करावे लागेल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या स्पर्धेत आघाडी टिकवायची असेल तर केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही, विश्वासार्ह नेतृत्वही लागेल. या घटनेतून मिळणारा धडा केवळ एका कंपनीपुरता मर्यादित नाही. सत्तेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीची वैयक्तिक जबाबदारीही तितकीच मोठी असते. भारतासह जगभरातील मोठे उद्योगसमूह आणि व्यावसायिक नेतृत्वासाठीही हा इशारा तितकाच लागू पडतो. राष्ट्रीय सुरक्षा आणि वैयक्तिक संबंध यांच्यात संघर्ष निर्माण झाला की त्याचे परिणाम केवळ कुटुंबापुरते मर्यादित राहत नाहीत, ते जागतिक स्तरावर पोहोचतात. तंत्रज्ञानाचे भविष्य घडवणाऱ्या व्यक्तींनाही नैतिकता आणि जबाबदारीच्या चौकटीत राहावे लागते, हेच या प्रकरणाचे सार आहे. एनव्हीडियाच्या चिप्स पुढेही विकल्या जातील, कृत्रिम बुद्धिमत्तेची स्पर्धा पुढेही सुरू राहील; पण नेतृत्वाची विश्वासार्हता एकदा डळमळली की ती पुन्हा मिळवणे सर्वांत कठीण जाते. राजीनामा हा एका अध्यायाचा शेवट आहे. मात्र, नैतिकता सांभाळत कार्पोरेट संस्कृती कशी जपता येईल, या प्रश्नाचे उत्तर संबंधितांना शोधावे लागेल.

भूजल पुनर्भरणाचे नवे तंत्र

अल निनोच्या संकटामुळे यंदा मान्सूनने ओढ दिल्याने रब्बी हंगामात सिंचनासाठी पुन्हा एकदा भूजलावरचा ताण वाढणार आहे. देशातील भूजल उपसा धोकादायक पातळीवर पोहोचला असताना जलशक्ती मंत्रालयाने भूजल पुनर्भरणासाठी नवे डिजिटल तंत्रज्ञान आणले आहे; मात्र ॲप आणि पोर्टलच्या मदतीने या जलसंकटातून सुटका होणार नसून, त्यासाठी पीक पद्धतीत बदल, सूक्ष्म सिंचन आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.



अल निनोच्या प्रभावामुळे वाढलेले तापमान, अनियमित पाऊस आणि खालावत चाललेले भूजल साठे यांनी पुन्हा एकदा जलसंकटाची तीव्रता वाढवली आहे. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, जून ते सप्टेंबर २०२६ या मान्सूनच्या काळात देशात ७५९.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली, जी दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत १२.६ टक्क्यांनी कमी आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, नोव्हेंबर महिन्यात देशाच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची आणि कमाल तापमान सामान्यपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबरपर्यंत अल निनोची स्थिती मजबूत राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आल्याने रब्बी हंगामातील पेरण्यांसाठी सिंचनाची मागणी आणि पाण्याची उपलब्धता याबाबत चिंता अधिकच गडद झाली आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा भूजलाचा उपसा करण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे.

केंद्रीय भूजल मंडळाच्या २०२५ मधील मूल्यांकनाने भूजलावरील या अतिअवलंबित्वामुळे निर्माण झालेल्या संरचनात्मक समस्यांवर नेमके बोट ठेवले आहे. या अहवालानुसार, भारतातील भूजलाचे वार्षिक पुनर्भरण ४४८.५२ अब्ज घनमीटर इतके मोजले गेले, तर प्रत्यक्ष उपसा करण्यायोग्य भूजल संसाधनांची मात्रा ४०७.७५ अब्ज घनमीटर होती; मात्र देशातील भूजलाचा वार्षिक उपसा २४७.२२ अब्ज घनमीटरपर्यंत पोहोचला असून, हे प्रमाण उपलब्ध संसाधनांच्या ६०.६३ टक्के इतके आहे. या सर्वेक्षणात देशातील ७३० घटकांचा अतिशोषित श्रेणीत समावेश करण्यात आला आहे, जिथे भूजलाचा उपसा त्याच्या पुनर्भरणापेक्षा जास्त होत आहे. देशातील एकूण भूजल वापरामध्ये शेतीचा वाटा तब्बल ८७ टक्के आहे. विशेष म्हणजे, ज्या भागांत आधीच पाण्याची तीव्र टंचाई आहे, तिथेही सिंचनासाठी भूजलाचाच अनिर्बंध वापर सुरू आहे. त्यामुळे भूजलाचे पुनर्भरण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्याचे काटेकोर संवर्धन करणेही अपरिहार्य ठरले आहे.

या पार्श्वभूमीवर जलशक्ती मंत्रालयाने सुरू केलेले पुनर्भरण मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेब पोर्टल हे दीर्घकालीन उपाययोजनांच्या दिशेने टाकलेले एक स्वागतार्ह पाऊल मानले जात आहे. हे ॲप्लिकेशन पाऊस, भूजल पातळी, जमिनीची जलधारण क्षमता, उतार आणि पाण्याचा निचरा यांसारख्या भूस्थानिक आकडेवारीचा वापर करून तीन किलोमीटरच्या परिघात भूजल पुनर्भरणासाठी संभाव्य ठिकाणांचा अचूक शोध घेते. तसेच स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार कोणत्या प्रकारच्या पुनर्भरण रचना उभाराव्यात, याची शिफारसही करते. यासोबत उपलब्ध करून देण्यात आलेल्या वेब पोर्टलवर गावपातळीवरील नकाशे आणि भौगोलिक माहिती प्रणालीशी संबंधित साधने दिली आहेत. या तंत्रज्ञानाच्या मदतीने स्थानिक प्रशासनाला पुनर्भरणासाठी योग्य जागा निवडणे आणि सरकारी निधी अधिक प्रभावी प्रकल्पांकडे वळवणे शक्य होणार आहे.

अर्थात, फक्त अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिल्याने भूजलाची पातळी वाढणार नाही, तर त्यासाठी प्रशिक्षित स्थानिक कर्मचारी, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम आणि गावपातळीवर जलअंदाजपत्रक तयार करण्यासारख्या कृती कार्यक्रमांची जोड द्यावी लागेल. रामगंगा खोऱ्यातील भूजल पुनर्भरण व्यवस्थापनावर २०२५ मध्ये झालेल्या एका अभ्यासातून या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. या अभ्यासानुसार, विद्यमान सरकारी कार्यक्रमांतर्गत २०२३ मध्ये भूजल साठ्यात अंदाजे २५.५ कोटी घनमीटर पाण्याची भर पडली, जी पावसामुळे होणाऱ्या नैसर्गिक पुनर्भरणाच्या केवळ २.५ ते ७.५ टक्के इतकीच होती. या सर्व प्रयत्नांनंतरही भूजलाची पातळी घसरतच राहिली. यावरून हेच अधोरेखित होते की, भूजल पुनर्भरणाच्या पायाभूत सुविधांना प्रगत सिंचन प्रणाली आणि पीक पद्धतीतील बदलांशी जोडणे अत्यंत गरजेचे आहे.

सूक्ष्म सिंचनाचा विस्तार, कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन आणि भूजलाच्या अनिर्बंध उपशावर नियंत्रण यांसारखे उपाय पुनर्भरणाच्या प्रयत्नांना पूरक ठरले पाहिजेत. शेवटी, भूजल पुनर्भरणावर केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीचा शाश्वत लाभ तेव्हाच मिळेल, जेव्हा ज्या जलस्रोतांवर शेतकऱ्यांची उपजीविका अवलंबून आहे, त्यांचे रक्षण करण्याची साधने आणि आर्थिक प्रोत्साहन स्वतः शेतकऱ्यांकडे असतील. कमी पाणी लागणाऱ्या पिकांची हमीभावाने सरकारी खरेदी, पीक विम्याचे भक्कम संरक्षण आणि बाजारपेठेची थेट उपलब्धता करून दिल्यास शेतकऱ्यांचा पीक बदलातील धोका कमी होऊ शकतो.

कृषी विस्तार सेवांनी शेतकऱ्यांना सिंचनाचे अचूक वेळापत्रक ठरवणे, पाणी वाचवणारे तंत्रज्ञान आणि स्थानिक हवामानाला अनुकूल पिकांची निवड याबाबत योग्य मार्गदर्शन केल्यास हे उपाय जमिनीवर यशस्वीपणे उतरू शकतात. अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी हे सहकार्य विशेष महत्त्वाचे ठरते. कारण, त्यांच्याकडे शेतीच्या पारंपरिक पद्धती बदलण्यासाठी पुरेसे आर्थिक पाठबळ आणि तांत्रिक ज्ञान नसते. जगातील सर्वाधिक भूजल वापरणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश होतो. त्यामुळे केवळ तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी दीर्घकालीन जलसंपत्ती आणि ग्रामीण उपजीविकेच्या सुरक्षेच्या व्यापक धोरणाचा एक अविभाज्य भाग म्हणून भूजल पुनर्भरण योजनेकडे पाहावे लागेल. निसर्गाच्या लहरीपणावर मात करायची असेल, तर तंत्रज्ञान, प्रशासकीय इच्छाशक्ती आणि लोकसहभाग यांचा त्रिवेणी संगम साधून भूजलाची ही तूट भरून काढावीच लागेल.

भूजल संवर्धनासाठी केवळ सरकारी योजनांवर अवलंबून न राहता ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि स्थानिक जलव्यवस्थापन समित्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. प्रत्येक गावाने उपलब्ध पाण्याचे स्रोत, वार्षिक वापर, पुनर्भरणाची क्षमता आणि भविष्यातील गरज यांचा विचार करून स्वतंत्र जलव्यवस्थापन आराखडा तयार करायला हवा. विहिरी, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन करताना त्यांच्या देखभालीची जबाबदारीही निश्चित करणे गरजेचे आहे. अन्यथा, दरवर्षी टंचाईच्या काळात उपाययोजना करण्याची वेळ येईल; मात्र भूजल संकटाचे मूळ कायम राहील. भूजल व्यवस्थापनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्वालाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. कोणत्या भागात किती पाणी उपसले जात आहे आणि पुनर्भरणासाठी किती कामे झाली, याची नियमित नोंद सार्वजनिकरीत्या उपलब्ध असावी. मोठ्या प्रमाणावर भूजल उपसा करणाऱ्या उद्योगांसाठी कठोर नियम लागू करतानाच पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. शहरी भागांतही छतावरील पावसाचे पाणी साठविणे आणि पुनर्भरणासाठी वापरणे बंधनकारक करण्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि ग्रामसभांच्या माध्यमातून जलसाक्षरता वाढविल्यास पुढील पिढीमध्ये पाण्याबाबत जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली संपत्ती नसून सामूहिक वारसा आहे, ही भावना समाजात रुजणे, हेच जलसुरक्षेचे खरे अधिष्ठान ठरेल.

नवनाथ वारे

कूष्माण्ड नवमी (अक्षय नवमी)

हिंदू धर्मात प्रत्येक सण आणि व्रताला विशेष धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व आहे. त्यांपैकी 'कूष्माण्ड नवमी' हा एक अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी दिवस मानला जातो. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला हा दिवस साजरा केला जातो. यालाच 'अक्षय नवमी किंवा आवळा नवमी' असेही म्हणतात. कूष्माण्ड नवमी बुधवार, १८ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाणार आहे.पौराणिक मान्यतेनुसार, या पवित्र तिथीपासून द्वापार युगाचा प्रारंभ झाला असे मानले जाते. तसेच या दिवशी भगवान श्रीविष्णूंनी कूष्माण्ड नावाच्या क्रूर दैत्याचा वध करून धर्माचे रक्षण केले, अशी कथा प्रचलित आहे. असे सांगितले जाते की, त्या दैत्याच्या शरीरावरील रोमांपासून कूष्माण्ड म्हणजेच कोहळ्याची वेल उत्पन्न झाली. त्यामुळे या तिथीला कूष्माण्ड नवमी असे नाव पडले.या दिवशी केलेले दान, जप, तप आणि सत्कर्म यांचे फळ अक्षय म्हणजेच कधीही न संपणारे मिळते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. त्यामुळे या दिवसाला अक्षय नवमी असेही म्हटले जाते.या दिवशी कोहळ्याचे दान करण्याची विशेष परंपरा आहे. पहाटेच्या समयी मंगलस्नान करून आवळा वृक्षाची पूजा करणे हेही श्रीविष्णूची कृपा प्राप्त करून देते.या दिवशी भगवान श्रीविष्णूंचे स्मरण, आवळा वृक्षाची पूजा आणि गरजूंना दानधर्म केल्याने अक्षय पुण्य प्राप्त होते, अशी हिंदू धर्मीयांची श्रद्धा आहे. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' किंवा 'श्री विष्णवे नमः' हा नामजप जास्तीत जास्त करून श्रीविष्णूची अखंड कृपा संपादन करूया!

आदिती देखणे

राजकारणाची घसरण

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या विकासात्मक मुद्द्यांवर चर्चा करण्यापेक्षा केवळ बिनबुडाचे आरोप करून आणि सनसनाटी निर्माण करून प्रसिद्धीझोतात राहण्याची चढाओढ लागली आहे. 'निंदाकाचे घर असावे शेजारी' पण माध्यमांमध्ये झळकण्यासाठी कोणत्याही ठोस पुराव्यांविना गंभीर आरोप करणे हा जणू काही सध्याचा नवा ट्रेंड बनला आहे. शिवसेना उबाठा नेते संजय राऊत, काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार यांच्यासारखे अनेक नेते सातत्याने वेगवेगळ्या मुद्द्यांवर पत्रकार परिषदा घेऊन खळबळजनक दावे करताना दिसतात.

राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी अलीकडेच घेतलेल्या पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अपघाती निधनाबद्दल होणाऱ्या चौकशीसंबंधी मुख्यमंत्र्यांवर केलेले आरोप असोत किंवा इतर विरोधी पक्षांच्या नेत्यांची विधानं असोत, यात जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यापेक्षा केवळ राजकीय बदनामीचा अजेंडा अधिक दिसतो. या राजकारणात नुकसान मात्र त्या संबंधित नेत्याची बदनामी करून होते, मग महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या ज्वलंत समस्या बाजूला पडतात आणि केवळ वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडतात.

आज खऱ्या अर्थाने याला माप प्रसिद्धी देणाऱ्या संबंधित माध्यमांची जबाबदारी मोठी आहे, कारण यामुळे या नेत्यांची हिम्मत वाढते. अशा सुस्पष्ट कारणांवर कारवाई होत नाही आणि माफी मागितली की प्रश्न मिटतो, असे प्रकार घडतात.राजकारण हे जनतेच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी असते, वैयक्तिक चिखलफेकीसाठी नाही. जोपर्यंत राजकारणी स्वतःहून या क्षुल्लक आरोप-प्रत्यारोपांच्या खेळापासून दूर जात नाहीत आणि मतदारही अशा दिशाभूल करणाऱ्या राजकारणाला थारा देत नाहीत, तोपर्यंत राज्याचा खरा विकास साधला जाणे अशक्य आहे. म्हणूनच, आता नेत्यांनी आणि प्रसारमाध्यमांनी सनसनाटी राजकारण बाजूला सारून खऱ्या अर्थाने जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याची खरी वेळ आली आहे.

अविनाश देशपांडे

मंदिरात शिस्त पाळूया!

आजकाल अनेक मंदिरांमध्ये दर्शनासाठी येणाऱ्या काही भाविकांकडून एकमेकांना मोठमोठ्याने हाका मारणे, मोबाईलवर मोठ्या आवाजात बोलणे, सेल्फी काढत राहणे, गर्दीत रांगा तोडून घुसणे, प्रसाद वाटपाच्या ठिकाणी गर्दी करणे, पुजारी किंवा मंदिर प्रशासनाशी वाद घालणे असे प्रकार सर्रास घडताना दिसतात. आपण देवाच्या दर्शनाला आलो आहोत की एखाद्या पर्यटनस्थळी सहलीसाठी, याचे भानही काहींना राहत नाही.

मंदिरात प्रत्येक भाविकाचा भगवंताशी एक भावनिक आणि आध्यात्मिक संवाद सुरू असतो. कुणी मनातल्या व्यथा सांगत असतो, कुणी कृतज्ञता व्यक्त करत असतो, तर कुणी निःशब्दपणे परमेश्वराशी एकरूप होण्याचा प्रयत्न करत असतो. मात्र, आपल्या बेशिस्त वर्तनामुळे दुसऱ्या भाविकांच्या या भक्तिमय संवादात बाधा येऊ शकते.

मंदिरे ही केवळ देवदर्शनाची ठिकाणे नाहीत, तर हिंदूंसाठी श्रद्धा, चैतन्य आणि सकारात्मक ऊर्जेची केंद्रे आहेत. मंदिरांच्या परिसरात पूजेचे साहित्य आणि इतर वस्तूंची दुकाने असणे स्वाभाविक असले, तरी त्यांची अनियोजित मांडणी, त्यामुळे होणारी गर्दी आणि प्रवेशद्वाराजवळ अस्ताव्यस्त पडलेल्या चपला यांमुळे मंदिर परिसराचे सौंदर्य, स्वच्छता आणि प्रसन्नता बाधित होते. मंदिराच्या परिसरात स्वच्छता आणि सुव्यवस्था राखली जाणे आवश्यक आहे.देवाच्या दर्शनासाठी मंदिरात जाताना आपला आवाज, वर्तन, स्वच्छता आणि शिस्त यांचे भान ठेवणे ही प्रत्येक भाविकाची जबाबदारी आहे.

अनिकेत शेटे

संवाद

पाकिस्तानी उत्पादने भारतात येतातच कशी?

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने पाकिस्तानशी सर्व प्रकारचा व्यापार बंद केला आहे. असे असताना पाकिस्तानमध्ये बनवण्यात आलेले सौंदर्य प्रसाधन राज्यातील नांदेड जिल्ह्यात बेकायदेशीरपणे विकले जात असल्याचे पोलिसांकडून नुकतेच उघड करण्यात आले आहे. नांदेड पोलिसांनी शहरातील 'अफराह कलेक्शन' या दुकानावर धाड घालून ३९ लाख ६९ सहस्र रुपये किमतीचा 'मेड इन पाकिस्तान' असा उल्लेख असलेला सौंदर्यप्रसाधनांचा मोठा साठा जप्त केला. या प्रकरणी महंमद जियाउद्दीन महंमद वाजीद याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जप्त केलेल्या क्रीमचे नमुने 'फॉरेन्सिक लॅब'मध्ये पडताळणीसाठी पाठवण्यात आले होते. त्याच्या अहवालात सौंदर्यप्रसाधनांमध्ये आरोग्याला अत्यंत घातक असलेला 'पारा' (मर्क्युरी) आणि 'आर्सेनिक' हे विषारी घटक ४८ सहस्र पटींनी अधिक प्रमाणात असल्याचे निष्पन्न झाले आहे. क्रीममधील पारा आणि आर्सेनिक हे विषारी घटक त्वचेद्वारे रक्तात शोषले जातात. यामुळे मानवी मूत्रपिंड निकामी होण्याचा, तसेच मज्जासंस्थेवर कायमस्वरूपी घातक परिणाम होण्याचा गंभीर धोका असतो. शासकीय नियमांनुसार सौंदर्यप्रसाधनात पाऱ्याचे प्रमाण अधिकाधिक १ पार्ट्स पर मिलियन इतकेच असणे अपेक्षित असते; मात्र पाकनिर्मित उत्पादनांमध्ये या मर्यादेचे उल्लंघन करण्यात आले आहे. गेल्या वर्षभरात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, धुळे आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्येही 'मेड इन पाकिस्तान' लेबल असलेल्या सौंदर्यप्रसाधनांची साठवणूक अन् विक्री उघडकीस आली आहे. अशा प्रकारची घातक उत्पादने भारतीयांना विकून त्यांच्या आरोग्याला गंभीर बाधा पोहोचवण्याचा मानस यातून स्पष्ट होत आहे. जून महिन्यात पिंपरी चिंचवड येथील श्री मोरया गोसावी या मंदिर परिसरात संकष्टी चतुर्थीनिमित्त भरलेल्या यात्रेत एका महिलेने खरेदी केलेल्या चादरीवर 'मेड इन पाकिस्तान' असे लेबल आढळल्याचे तिने एका व्हिडिओद्वारे उघड केले होते. त्याच दरम्यान संभाजीनगर जिल्ह्यात 'मेड इन पाकिस्तान' लेबल असलेली सौंदर्यप्रसाधने विकणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे स्थानिक बाजारात परदेशी वस्तूंच्या विक्रीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाकिस्तानी सीमेपासून हजारो किलोमीटर दूर असलेल्या महाराष्ट्रामध्ये शत्रूराष्ट्रात तयार केलेल्या वस्तूंची अशी खुलेआम विक्री केली जात असेल, तर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे.

जगन घाणेकर

कॉर्पोरेट हेरगिरीचा धोकादायक 'हनी ट्रॅप'!

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीचे युग म्हणून ओळखले जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), संगणक, इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे जग झपाट्याने बदलत आहे. या तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन अधिक गतिमान आणि सुविधाजनक झाले असले, तरी त्याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा, औद्योगिक गोपनीयता आणि आर्थिक हितसंबंधांसमोर नवी आव्हानेही उभी राहिली आहेत. विशेषतः कॉर्पोरेट हेरगिरीसाठी वापरले जाणारे 'हनी ट्रॅप' हे एक अत्यंत गंभीर आणि धोकादायक आव्हान बनले आहे.'हनी ट्रॅप' म्हणजे एखाद्या व्यक्तीला प्रेमाचे, मैत्रीचे किंवा जवळिकीचे आमिष दाखवून भावनिक जाळ्यात ओढणे आणि त्याच्याकडून गोपनीय माहिती मिळवणे. पूर्वी हेरगिरीसाठी प्रत्यक्ष भेटीगाठी, गुप्त संदेश आणि आर्थिक प्रलोभनांचा वापर केला जात असे. मात्र, आता सोशल मीडिया, व्हॉट्सॲप, फेसबुक, लिंक्डइन आणि इतर डिजिटल माध्यमांचा वापर करून हेरगिरीचे जाळे विणले जात आहे. आकर्षक व्यक्तिमत्त्व, बनावट ओळख आणि भावनिक संवाद यांच्या माध्यमातून महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या व्यक्तींना लक्ष्य केले जाते.

विशेष म्हणजे, 'हनी ट्रॅप'मध्ये अडकवण्यासाठी आता प्रत्यक्ष संपर्काचीही गरज राहिलेली नाही. बनावट सोशल मीडिया खाती, आकर्षक छायाचित्रे, खोटी ओळख आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार केलेले संदेश किंवा व्हिडिओ यांचा वापर करून विश्वास संपादन केला जाऊ शकतो. या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ सुरक्षा यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. सरकारी आणि खासगी कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सायबर सुरक्षा आणि माहितीच्या गोपनीयतेबाबत नियमित प्रशिक्षण आयोजित केले पाहिजे. संशयास्पद सोशल मीडिया संपर्क, अनोळखी व्यक्तींकडून होणारी जवळीक आणि गोपनीय माहितीची मागणी याबाबत प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे. तसेच कंपन्यांनी संवेदनशील माहितीपर्यंत पोहोचण्यावर कठोर नियंत्रण ठेवून नियमित सुरक्षा तपासणी केली पाहिजे.शेवटी,'हनी ट्रॅप' हा केवळ एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित प्रश्न नाही, तर तो देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि तंत्रज्ञानविषयक भवितव्याशी निगडित गंभीर प्रश्न आहे.

श्याम ठाणेदार

| बुधवार १८ नोव्हेंबर २०२६ |
E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित मराठी

शेतात गांजाची लागवड,४४ झाडे जप्त!

दारव्हा तालुक्यातील नायगाव शिवारात स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, शेतमालकाविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल

जनमाध्यम । प्रतिनिधी



यवतमाळ : शेतीच्या आडून अंमली पदार्थांची लागवड होत असल्याचा प्रकार दारव्हा तालुक्यातील नायगाव शिवारात उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून गांजाची ४४ झाडे जप्त केली असून, याप्रकरणी मिलचंद आत्माराम राठोड (रा. नायगाव, ता. दारव्हा) याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. जप्त केलेल्या गांजाच्या झाडांची किंमत १९ हजार ४५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक १६ नोव्हेंबर रोजी पुसद उपविभागात गस्तीवर असताना गुप्त माहितीदाराकडून नायगाव शिवारात गांजाची लागवड केल्याची माहिती मिळाली. या माहितीची वरिष्ठांना कल्पना देऊन पथकाने संबंधित शेतात छापा टाकला. सर्वे क्रमांक १६/०१ मधील शेतात गांजाची ४४ झाडे लावलेली आढळली. पंचांसमक्ष ही झाडे जप्त करण्यात आली.

या प्रकरणी दारव्हा पोलीस ठाण्यात अंमली औषधी व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम १९८५ च्या कलम ८(ब), २०(अ)(१) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शेतीच्या नावाखाली गांजासारख्या प्रतिबंधित अंमली पदार्थांची लागवड होत असल्याचा हा प्रकार ग्रामीण भागातील अवैध धंद्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणणारा आहे. अशा लागवडींचा शोध घेऊन त्यामागील संपूर्ण साखळी उघड करण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

मांगलीजवळ ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; एक गंभीर

मुकुटबन-पाटण मार्गावर भीषण अपघात; ट्रकचालक फरार, पोलिसांकडून शोध सुरू

जनमाध्यम । प्रतिनिधी

झरी: मुकुटबन-पाटण मार्गावरील मांगली गावाजवळ रविवारी सायंकाळी ट्रक आणि दुचाकीमध्ये झालेल्या भीषण अपघातात दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकीवर मागे बसलेला व्यक्ती गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या अपघातात पंडित छत्रपती भोयर (वय ५५, रा. येडशी) यांचा मृत्यू झाला असून बाबाराव शामराव पवार (वय ५५, रा. येडशी) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर वणी येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सायंकाळच्या सुमारास मांगली गावाजवळील स्मशानभूमी परिसरात हा अपघात घडला. मुकुटबनकडून पाटणच्या दिशेने जाणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच १६ सीए ०५३६ याची पाटणकडून मुकुटबनच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकी क्रमांक एमएच ३४ एटी २५६१ ला धडक बसली. ट्रकचा कट लागल्याने दुचाकीवरील दोघेही खाली पडले. यात दुचाकी चालक पंडित भोयर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर मागे बसलेले बाबाराव पवार यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली.

अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच मुकुटबन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तातडीने रुग्णवाहिका बोलावून जखमी पवार यांना उपचारासाठी वणी येथे पाठविण्यात आले. तसेच मृतकाच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली. पंडित भोयर यांच्या मृतदेहाचे वणी येथे शवविच्छेदन करण्यात आले.

या प्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २८१, १२५(ब), १०६(१) व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मुकुटबन पोलीस करीत असून फरार ट्रक चालकाचा शोध सुरू आहे.

- वेचक-



२२ वर्षांनंतर पुन्हा भरला आठवणींचा वर्ग प्रताप विद्यालयात बालमित्रांचा स्नेहसोहळा!

जनमाध्यम । प्रतिनिधी

बाभूळगाव : काळ बदलला, चेहरे बदलले, जबाबदाऱ्याही वाढल्या मात्र मैत्रीचा धागा कायम राहिला. तब्बल २२ वर्षांनंतर प्रताप विद्यालयाच्या २००४ बॅचमधील माजी विद्यार्थी रविवार, १५ नोव्हेंबर रोजी शाळेच्या जुन्या वास्तूत एकत्र आले. पाचवी ते दहावीपर्यंतच्या शालेय आठवणी, वर्गातील मस्ती, शिक्षकांचे संस्कार आणि बालपणीच्या गमतीजमतींना उजाळा देताना वातावरण भावूक झाले. तत्कालीन मुख्याध्यापक शेख सर अध्यक्षस्थानी होते. विद्यमान मुख्याध्यापिका घोडे मॅडम यांच्यासह माजी शिक्षक उपस्थित होते. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी जीवनप्रवासातील अनुभवही कथन केले. दोन दशकांहून अधिक काळानंतरही मैत्रीचा जिव्हाळा कायम असल्याचा प्रत्यय या स्नेहमिलनातून आला.



बिरसा मुंडांच्या संघर्षातून विद्यार्थ्यांनी घ्यावा स्वाभिमानाचा धडा!

जनमाध्यम । प्रतिनिधी

पांढरकवडा : आदिवासी समाजाचे हक्क, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष उभारणारे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव शिंदे, तर प्रमुख पाहुणे म्हणून राजू लोहकरे उपस्थित होते. प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी प्रास्ताविकातून बिरसा मुंडांच्या संघर्षमय जीवनकार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श जोपासावा, असे आवाहन अध्यक्षांनी केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जितेंद्र निमकर व अनिस सय्यद युसुफ यांनी सहकार्य केले.

रब्बी पिके आणि पशुधन तहानेने संकटात!

मुख्य कालव्यातून सिंचनासाठी, तर नदीपात्रातून जनावरांसाठी पाणी सोडण्याची ॲड. सचिन नाईक यांची मागणी

जिल्हाधिका-यांसह पाटबंधारे अधिका-यांना निवेदन

जनमाध्यम । प्रतिनिधी




यवतमाळ : महागाव तालुक्यातील अधरपूर (वेणी धरण) प्रकल्पाचे पाणी रब्बी हंगामातील पिकांसाठी मुख्य कालव्याद्वारे आणि पशुधनाच्या पिण्यासाठी नदीपात्रातून तातडीने सोडण्याची मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांच्या नेतृत्वात मंगळवारी (१७ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी तसेच यवतमाळ पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता आणि सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले.

यंदा खरीप हंगामात ट्रिगर-१ अंतर्गत दुष्काळी परिस्थिती जाहीर झाली आहे. त्यातच पावसाने ओढ दिल्याने विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी कमालीची खालावली आहे. परिणामी, महागाव तालुक्यातील खडका, लेवा, वाघनाथ, वसंतनगर, चिलगव्हाण, काऊरवाडी, कलगाव, सवना, आंबोडा, गुंज आणि पोहंडूळ परिसरातील शेतकरी सिंचनाच्या पाण्यासाठी हवालदिल झाले आहेत.

या भागात गहू, हरभरा, ज्वारीसह ऊस, हळद आणि केळीसारखी पिके घेतली जातात. मात्र, पाण्याअभावी उभी पिके वाळण्याच्या मार्गावर असून रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. अशा परिस्थितीत अधरपूर प्रकल्पाचे पाणी वेळेत उपलब्ध न झाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान अटळ ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

दुसरीकडे, नदीपात्रे आणि नाले कोरडे पडल्याने पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. दुधाळ जनावरांना पाणी आणि चारा उपलब्ध होत नसल्याने दूध व्यवसायावरही संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ शेतीसाठीच नव्हे, तर पशुधनाच्या अस्तित्वासाठीही नदीपात्रात पाणी सोडणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.अधरपूर प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे पाणी तातडीने सोडावे, रब्बी हंगामासाठी ठोस पाणी नियोजन जाहीर करावे आणि नदीपात्रातून पशुधनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याचा निर्णय घ्यावा, अशी भूमिका ॲड. सचिन नाईक यांनी मांडली.यावेळी जावेद निजाम चव्हाण, जयवंतराव जाधव, दत्तराव कदम, डॉ. संदीप शिंदे, हनतराव देशमुख, केशवराव सूर्यवंशी, नंदकिशोर राऊत, राजेंद्र राऊत यांच्यासह शेतकरी, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वीरेंद्र कराळे यांचा खड्ड्याने घेतला जीव, कुटुंबाला सहा लाखाची मदत!



जनमाध्यम । प्रतिनिधी

यवतमाळ : शहरातील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावरील खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या वाघापूर येथील वीरेंद्र शालिग्राम कराळे यांच्या कुटुंबीयांना नगर परिषदेच्या वतीने सहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या हस्ते मृतकाच्या पत्नी मयुरी कराळे यांना धनादेश प्रदान करण्यात आला. ११ सप्टेंबर २०२६ रोजी रुग्णालयाच्या प्रवेशद्वारा समोरील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वीरेंद्र कराळे यांचा अपघात झाला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले; मात्र २३ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेने एका कुटुंबाचा आधार हिरावला. मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक ७१/२०१३ मधील निर्देश तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शनानुसार नगरपरिषद प्रशासनाने वैद्यकीय कागदपत्रांची तपासणी करून मदतीची प्रक्रिया पूर्ण केली. नगराध्यक्षांच्या हस्ते आर्थिक मदत देण्यात आली असली तरी या घटनेतून नगरपरिषद प्रशासनाने धडा घेणे अधिक महत्त्वाचे आहे. शहरातील प्रमुख रस्ते, विशेषतः शासकीय रुग्णालये, शाळा आणि गर्दीच्या ठिकाणांकडे जाणाऱ्या मार्गांची नियमित तपासणी होणे गरजेचे आहे.

मटका जुगाराचा सुळसुळाट,पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष?

अवैध धंदे खुलेआम सुरू, तरुणाई जुगाराच्या विळख्यात,पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

जनमाध्यम । प्रतिनिधी



आर्णी : आर्णी तालुक्यात अवैध मटका जुगाराचा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचे चित्र असून, या अवैध धंद्यांवर नियंत्रण मिळवण्यात पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. तालुक्यातील लोणबेहळ, दहिसावळी, कवठा बाजार, दाबडी, बोरगाव आणि जवळा या गावांमध्ये मटक्याचे जाळे विस्तारल्याचा आरोप आहे. तर आर्णी शहरातील प्रेमनगर, मुर्गी मार्केट, शास्त्रीनगर, उर्दू शाळेजवळ, कब्रस्तान परिसर आणि पाण्याच्या टाकीजवळही मटका सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, काही ठिकाणी दिवसाढवळ्या मटका स्वीकारला जात असल्याची चर्चा आहे. या अवैध व्यवसायातून दररोज मोठ्या प्रमाणात पैशांची उलाढाल होत असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. जुगाराच्या आकर्षणामुळे तरुण पिढी आर्थिक संकटात सापडण्याची भीती व्यक्त होत आहे. अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडण्यास अशा अवैध धंद्यांचा हातभार लागत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. एकीकडे अवैध धंद्यांविरोधात कारवाईचे दावे केले जात असताना आर्णीतील मटका जुगाराचा विस्तार नेमका कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. पोलिसांना या प्रकाराची माहिती नाही की कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे? हा प्रश्नही चर्चेत आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित ठिकाणी तपासणी करावी, अवैध मटका जुगारावर कठोर कारवाई करावी आणि या व्यवसायामागील सूत्रधारांचा शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

बिरसाच्या विचारांचा जागर, शिबल्यात 'जय बिरसा, जय आदिवासी'चा गजर!

भव्य रॅलीतून आदिवासी अस्मितेचे दर्शन,शिक्षण, एकता आणि हक्कांच्या लढ्याचा संकल्प

जनमाध्यम । प्रतिनिधी



झरी : क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त झरी तालुक्यातील शिबला येथे उत्साहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिबला चौफुलीवरील बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर गावातून भव्य रॅली काढण्यात आली. 'जय बिरसा, जय आदिवासी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल आणि जमिनीच्या हक्कांसाठी दिलेल्या ऐतिहासिक लढ्याचे स्मरण करण्यात आले. शिबला आश्रमशाळेच्या शिक्षिका संगीता उईके यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनकार्यावर प्रकाश टाकत शिक्षण, सामाजिक एकता आणि प्रगतीचा संदेश दिला. कार्यक्रमाला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक राजू येल्टीवार, पांडुरंग पोयाम, वाणी तोडासे, सरपंच रजनी तोडसाम यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक मिलिंद चौधरी यांनी केले.

चारचाकीतून दारू तस्करीचा पर्दाफाश ५.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त!

जनमाध्यम । प्रतिनिधी



यवतमाळ : शहरात चारचाकी वाहनातून अवैधरित्या विदेशी दारूची वाहतूक करून विक्रीसाठी नेणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले. मदिना चौकात करण्यात आलेल्या या कारवाईत दारूसाठ्यासह महिंद्रा एक्सयूव्ही ५०० वाहन असा एकूण ५ लाख ५४ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १७ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्तीवर असताना मारवाडी चौकातून विदेशी दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने मदिना चौकात एमएच १५ ईएक्स ८८३८ क्रमांकाची संशयित कार अडवून झडती घेतली. यावेळी कारमध्ये विविध ब्रँडच्या विदेशी दारूच्या २६० शिश्या, तसेच बिअरचे १२४ टिन व बाटल्या आढळून आल्या. दारूसाठ्याची किंमत ५४ हजार २२० रुपये, तर वाहनाची किंमत पाच लाख रुपये आहे. या प्रकरणी अक्षय जयस्वाल (३३, पिंपरी भुट्टी) आणि प्रविण कुळसंगे (२७, कोळंबी) यांच्याविरुद्ध यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

हिवरा (संगम) येथे शॉर्टसर्किटमुळे ऊस जळून खाक!

कारखान्याकडून ऊसतोडीस टाळाटाळ,शेतक-याचे मोठे आर्थिक नुकसान

जनमाध्यम । प्रतिनिधी



महागाव : साखर कारखाना ऊसतोड करून ऊस नेण्यास टाळाटाळ करीत असल्याने आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत मोठा आर्थिक फटका बसला आहे. ही घटना महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथे घडली.

हिवरा (संगम) येथील शेतकरी रणजीत कृष्णराव कदम यांनी आपल्या शेतात ऊस लागवड केली होती. ऊस तोडणीसाठी तयार झाल्यानंतर त्यांनी नॅचरल शुगर कारखाना, गुंज (सवना) येथील प्रशासनाशी संपर्क साधून ऊसतोड करण्याची मागणी केली. यावेळी कारखाना प्रशासनाकडून लवकरच ऊसतोड करून ऊस नेण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, आश्वासन देऊनही प्रत्यक्षात ऊसतोड करण्यात आली नसल्याने कदम हे चिंतेत होते. दरम्यान, शुक्रवार (दि. १३ नोव्हेंबर) रोजी सकाळी त्यांच्या शेतातून गेलेल्या विद्युत तारांच्या घर्षणामुळे ठिणग्या पडून उसाच्या शेताला आग लागली. या आगीत मोठ्या प्रमाणात ऊस जळून खाक झाल्याने रणजीत कदम यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कारखाना प्रशासनाने वेळेत ऊसतोड केली असती, तर आज ही वेळ आली नसती. कारखाना प्रशासनाच्या टाळाटाळीमुळे आपले नुकसान झाल्याचा आरोप शेतकरी रणजीत कदम यांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत असून, संबंधित प्रशासनाने नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.

न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर!

पक्षकारांची गैरसोय टाळण्याची जबाबदारी शासनाची



जनमाध्यम । प्रतिनिधी

पुसद : उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी पुसद येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप सुरू केला आहे. २०२३ मध्ये उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू झाली; मात्र दुय्यम न्यायालयातील कर्मचारी अद्याप वंचित आहेत. न्यायमूर्तींच्या समितीने जानेवारी २०२५ मध्येच यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. सुमारे ३४ हजार कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुधारित वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. या संपामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, शासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

पतीच्या आत्महत्येला फायनान्स कंपन्यांचा तगादा कारणीभूत

पत्नीची रहिमापूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार | **दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर

कर्जाची परतफेड करूनही फायनान्स कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकडून फोनवरून शिवीगाळ, धमक्या व सततच्या तगाद्याला कंटाळून मानसिक तणावातून विष प्राशन केलेल्या सातेगाव येथील शेतकरी पुत्र अमोल मुरलीधर काळे (वय अंदाजे ३५) यांचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात मृताची पत्नी आरती अमोल काळे यांनी दोन्ही फायनान्स कंपन्यांच्या व्यवहाराची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची लेखी तक्रार रहिमापूर पोलीस ठाण्यात दिली आहे.

आरती काळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पती अमोल काळे यांनी वेगवेगळ्या दोन फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड नियमितपणे सुरू असतानाही दोन्ही संस्थांच्या कर्मचाऱ्यांनी कर्ज परतफेडीसाठी वारंवार तगादा लावला. फोन करून शाब्दिक शिवीगाळ केली, धाकधपट दाखवली व धमक्या दिल्या, असा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला



आहे.या सततच्या मानसिक त्रासामुळे अमोल काळे यांची मानसिकता पूर्णपणे खचली. त्यातूनच त्यांनी २ नोव्हेंबर रोजी विष प्राशन केले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना अखेर १३ नोव्हेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाला. पतीच्या मृत्यूला फायनान्स कर्मचाऱ्यांचा हाच जाच कारणीभूत असल्याचे पत्नीने तक्रारीत स्पष्टपणे म्हटले



आहे.आरती काळे यांच्या तक्रारीत अंजनगाव सुर्जी येथील खासगी फायनान्स कंपनीचे कर्मचारी सचिन दामोदर, गौरव वाणी, अविनाश आठवले, कल्पेश सावलकर, तर दुसऱ्या परतवाडा येथील फायनान्स कंपनीचे सुहास डायगव्हाणे, ज्ञानेश्वर चांभरे, राजेंद्र चालके व इतर कर्मचाऱ्यांची नावे नमूद करण्यात आली आहेत.या सर्वांनी धाकधपट देऊन, शिवीगाळ करून पतीची मानसिकता खराब केल्याचा आरोप पत्नीने केला आहे. संबंधित कंपन्यांच्या आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी करावी व दोषींवर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान, या प्रकरणात एक धक्कादायक बाब समोर आली आहे. आठ महिन्यांपूर्वी अमोल काळे यांनी स्वतः फायनान्स कंपनीच्या जाचाबाबत लेखी तक्रार पत्र दिले होते, ते आता समोर आले आहे. त्यावेळीच संबंधित यंत्रणेने दखल घेऊन कारवाई केली असती तर अमोल यांचा जीव वाचला असता, अशी संतप्त प्रतिक्रिया सातेगावातील ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

अमोल काळे यांच्या मृत्यूनंतर सातेगावात शोककळा पसरली असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शेतकरी कुटुंबातील तरुणाचा अशा पद्धतीने बळी जाणे ही अत्यंत दुर्दैवी घटना असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.फायनान्स कंपन्यांकडून होणाऱ्या बेकायदेशीर वसुलीला आळा घालावा, अशी मागणी आरती काळे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.या घटनेची माहिती मिळताच आमदार बच्चू कडू यांनी मयत अमोल काळे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. यावेळी शिवसेनेचे नेते सुधाकर पाटील भारसाकडे, बाबुराव पाटील उंबरकर, महेश पाटील खारोडे, सणी शेळके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.रहिमापूर पोलीस या तक्रारीच्या आधारे पुढील तपास करीत असून, दोषींवर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आपण मती गेल्यासारखे का वागतो?

अमरावती/ का.प्र.

अमरावती भूमीचे माझ्यावर खूप संस्कार झाले असून लेखक म्हणून मला घडविणारी ही लेखक भूमी आहे, कारण पहिले लिखाण मी याच भूमीत केले, अशी माहिती ६ व्या शब्दवेल साहित्य संमेलनाचे अध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली.

रुख्मिणी स्वयंवर या अजरामर कथेची ही भूमी आहे.ज्ञानेश्वरीच्या १२ वर्षे आधी महादंबेचे धवळे हे मराठीतील पहिले काव्य याच भूमीत लिहिले गेले.८०० वर्षापूर्वी मराठी माणूस कसा बोलत होता हे ज्ञानेश्वरीत नाही ते फक्त लीळाचरित्र आणि महादंबेचे धवळे मध्ये आहे. असेही भालेराव म्हणाले.विद्या असूनही मती गेल्या सारखे आपण का वागतो? असा सवालही त्यांनी केला. अमरावतीत होऊन गेलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांचा गौरवही त्यांनी आपल्या भाषणातून केला.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या महर्षी रमण सभागृहात(ज्ञानमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख नगरीत) सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल, यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या



❑संमेलनाध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांचा सवाल

❑सहाव्या शब्दवेल साहित्य संमेलनाला प्रारंभ

संयुक्त वतीने या दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव हे या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवित आहेत.संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याला यशवंतराव चव्हाण अमरावती सेंटरचे कार्याध्यक्ष डॉ.रमेश अंधारे, कोषाध्यक्ष प्रदीप देशमुख, प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख, साहित्यिक प्रतिभा सराफ, रामदास गायधने, पुष्पराज गावंडे, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे, संमेलन कार्याध्यक्ष डॉ. राजेश मिरगे प्रामुख्याने उपस्थित होते. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.रमेश अंधारे, पुष्पराज गावंडे, प्रतिभा सराफ, यांनीही या वेळी आपले मनोगत व्यक्त केले.

शब्दवेल साहित्य संघाचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी प्रास्ताविक प्राचार्य डॉ.महेंद्र मेटे यांनी स्वागतपर भाषण केले.शाहीर धम्मा इंगळे यांनी संमेलनाध्यक्ष इंद्रजीत भालेराव यांची कविता शाहिरी ढंगाने सादर केली.या सोहळ्यात शब्दवेल दिवाळी अंकाचे प्रकाशन सुद्धा करण्यात आले.या प्रसंगी शब्दवेल तर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.हास्यकवी दिवाकर देशमुख, अमरावती यांना शब्दवेल हास्यकवी गौरव पुरस्कार, अंकुशमाला चोरपगार यांना यशवंत साहित्य गौरव पुरस्कार,कृष्णाली घाटे यांना स्व.केशवराव पापडकर स्मृती बाल प्रतिभावंत पुरस्कार, प्रभास गवई यांना स्व.हरिदास तुळशीरामजी स्मृती बाल प्रतिभावंत पुरस्कार, नितीन वरणकार यांना शब्दवेल कार्यगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

संक्षिप्त

प्रतिक चौधरी यांना पीएचडी



अमरावती- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने प्राणिशास्त्र विषयात प्रतिक सुनील चौधरी यांना आचार्य पदवी (Ph.D.) प्रदान केली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.डॉ. प्रतिक चौधरी यांनी 'Status, Distribution and Breeding Ecology of River Lapwing Vanellus duvaucelii in Rivers of Melghat' (स्टेटस, डिस्ट्रीब्यूशन अँड ब्रीडिंग इकॉलॉजी ऑफ रिवर लॅप्विन इन रिवर्स ऑफ मेलघाट) या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. या संशोधनासाठी त्यांनी मेळघाट परिसरातील नद्यांमध्ये आढळणाऱ्या रिव्हर लॅप्विंग म्हणजेच नदी टिटवी या पक्ष्याच्या अधिवास, विस्तार व प्रजनन परिस्थितीचा अभ्यास केला. या संशोधनासाठी अमरावती येथील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाचे प्राध्यापक तथा ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. गजानन वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधनकार्य पूर्ण केले. या यशाचे श्रेय त्यांनी आई वनिता चौधरी, वडील सुनील चौधरी , चंद्रशेखर चौधरी, बहीण सानिका चौधरी व पत्नी जान्हवी तसेच श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जि.व्हि.कोरपे, मार्गदर्शक प्रा डॉ. गजानन वाघ, विभागप्रमुख प्रा. डॉ. जे डी.धोटे व तसेच कुटुंबीय, मार्गदर्शक, सहकारी, मित्रपरिवार ह्यांना दिले आहे.डॉ.प्रतिक चौधरी यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण ,सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रमोद पोकळे यांचा गुणगौरव



अमरावती- सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायक तथा संगीतकार पंडित अजित कडकडे यांच्या उपस्थितीत मुंबई येथे आयोजित 'सत्संग प्रेमाचा : २०२६' या कार्यक्रमात बडनेरा येथील दूरदर्शन व आकाशवाणी लोककलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी आपल्या सुमधुर भजन सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या प्रभावी गायनाने प्रभावित होऊन स्वतः पंडित अजित कडकडे यांनी पोकळे गुरुजी यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांचा विशेष गुणगौरव केला.पंडित अजित कडकडे फॅमिली ग्रुपच्या वतीने रॉयल हिल रिसॉर्ट, मुंबई येथील सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सन्मानामुळे बडनेरा तसेच अमरावती जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून पोकळे गुरुजी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

'भीमाची लेकरं ऑर्गनायझेशन'चा गौरव



मोर्शी- स्थानिक लखनऊ विद्यापीठाच्या वतीने आयोजित १४ व्या आंतरराष्ट्रीय ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावसायिक शिखर संमेलन २०२६ मध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या 'भीमाची लेकरं ऑर्गनायझेशन, नागपूर' या संघटनेच्या पदाधिकाऱ्याचा विशेष सन्मान करण्यात आला. संमेलनात देशभरातील ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रातील मान्यवर, संशोधक, प्राध्यापक आणि ग्रंथालय व्यावसायिक सहभागी झाले होते. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण शिखर संमेलनात भीमाची लेकरं ऑर्गनायझेशनच्या अनेक सदस्यांनी विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. भीमाची लेकरं ऑर्गनायझेश नद्वारा संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आणि सुयोग्य नियोजनाबद्दल आयोजक डॉ.सिंग व डॉ. प्रकाश यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिखर संमेलनात सहभागी झाल्याबद्दल संस्थेचे डॉ. पाटील, डॉ. रायबोले, डॉ. गजभिये, डॉ. पाझारे, डॉ. चवरे, डॉ. कांबळे, प्रा. वागदे, डॉ. कुऱ्हाडे, डॉ. मोटघरे, डॉ. महिंदकर, डॉ. डोंगरे, डॉ. चिकाटे, प्रा. पाचपोर व अन्य

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा आजपासून बेमुदत संप

❑ ३५ हजार कर्मचाऱ्यांचा सहभाग; न्यायालयीन कामकाजावर परिणाम

बेलोरा/ वार्ताहर

चांदूर बाजारातील वेतनवाढीचा प्रस्ताव रखडल्याने महाराष्ट्र राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार पासून(१७नोव्हेंबर)बेमुदत संप पुकारला आहे. या संपात राज्यातील ३५ हजार न्यायालयीन कर्मचारी तसेच चार हजार सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी होणार आहेत. संपामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

'वेतनवाढीचा प्रस्ताव २२ महिन्यांपासून रखडला आहे. यापूर्वी ०५ नोव्हेंबर रोजी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून सरकारचे लक्ष वेधले होते, तसेच सामूहिक रजा आंदोलन केले होते. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर विचार न झाल्याने महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट क) संघटनेने मंगळवारपासून बेमुदत संप



पुकारला आहे', अशी माहिती अमरावती जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना यांनी दिली. 'न्यायालयात अपुरे मनुष्यबळ आहे. न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या वाढती आहे. कामाचे स्वरुप विचार घेता वेतनात तफावत आहे. वेतनवाढीचा प्रस्ताव गेल्या २२ महिन्यांपासून प्रलंबित आहे. वेतनवाढीकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत संप सुरू ठेवणार आहोत', असे त्यांनी नमूद केले.

'दिवाळीच्या सुट्टीनंतर न्यायालयीन कामकाज सुरू झाले. न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने पक्षकारांसह वकिलांची गैरसोय होणार आहे. नवीन दावे दाखल करणे, अर्ज नोंदणी, आदेशांची प्रमाणित प्रत मिळविणे, जामीन आदेशांच्या अंमलबजावणीत अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे शासनाने त्वरीत दखल घ्यावी,' असे चांदूरबाजार येथील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांची मागणी आहे.

अचलपूर तालुक्यातील

७२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण शुक्रवारी

अचलपूर/ वार्ताहर

तालुक्यातील ७२ ग्रामपंचायतींच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरपंच पदाच्या आरक्षण निश्चितीची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. एप्रिल २०२६ ते मार्च २०३१ या कालावधीत होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्याकरिता शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता वाजता तह तहसील कार्यालय, अचलपूर येथे आरक्षण सोडत पार पडणार आहे.

अचलपूर उपविभागीय अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी बळवंत अरखराव यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच खुल्या प्रवर्गासाठी सरपंचपदाचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित केले जाणार आहे. त्यामुळे तालुक्यातील ७२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे राजकीय भवितव्य कोणत्या प्रवर्गाच्या वाट्याला जाणार, याबाबत गावा-गावांत चर्चांना उधाण आले आहे. ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अचलपूर चे तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी सुदर्शन शहारे यांच्यावतीने करण्यात आले आहे. आरक्षण सोडतीनंतर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकां च्या राजकीय हालचालींना वेग येण्याची चिन्हे आहेत.

आरक्षण सोडतीनंतर अनेक गावांतील इच्छुकांच्या राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून सरपंचपदासाठी तयारी करणाऱ्या इच्छुक उमेदवारांचे लक्ष आता २० नोव्हेंबरच्या आरक्षण सोडतीकडे लागले आहे. कोणत्या गावात कोणत्या प्रवर्गासाठी सरपंचपद आरक्षित होणार, यावर आगामी निवडणुकीतील उमेदवारीचे चित्र अवलंबून राहणार आहे.

न्यायाच्या मंदिरातच अन्याय?

❑अंजनगाव दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे बेमुदत आंदोलन

अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार, १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत आंदोलन पुकारले आहे. येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून शासनाच्या दिरंगाईचा निषेध केला.

काळ्या फिती लावून कर्मचाऱ्यांनी कामकाज करत आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनामुळे येत्या काळात न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, पक्षकारांना दिलासा मिळण्यास विलंब होण्याची भीती व्यक्त होत आहे.अमरावती जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे जिल्हा सचिव तथा अंजनगाव सुर्जी न्यायालयातील वरिष्ठ लिपिक जितेंद्र काशीकर यांनी यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या



वेतनश्रेणीप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतनश्रेणी व वेतनवाढीचा लाभ मिळावा, ही आमची वर्षानुवर्षांची प्रलंबित मागणी आहे. समान काम करूनही दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना कमी वेतनश्रेणी मिळत असल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे.यासंदर्भात कर्मचारी संघटनेने शासनाला वेळोवेळी निवेदने देऊन पूर्वसूचनाही दिली होती. मात्र, मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्याने अखेर कर्मचाऱ्यांना बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागला, असेही काशीकर यांनी स्पष्ट केले.

आंदोलनात जिल्हा सचिव जितेंद्र काशीकर, जिल्हा कोषाध्यक्ष प्रदीप चौबे, दिनेश वासनिक, स्टेनोग्राफर संघटनेचे स्वप्निल घोडे, किरण उमक, निलेश धुळे, शुद्धोधन सुखदेवे, हरिभाऊ पालखडे, दर्शन बानाईत, प्रणव खडसे, रोहित आधापुरे, अश्विन भुडेकर, वैभव धारस्कर, प्रियंका घाटे, अंबिका टेंभरे, स्वाती इचे, स्वाती अस्वार, सुचिता सुपासे, शिवदास थोरात आणि पवन गुल्हाने आदी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.न्यायदानाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाच आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करावे लागत असेल, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा तरी कोणाकडे, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

समान काम, समान वेतन ही मागणी पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन तोडगा काढावा, अशी अपेक्षा कर्मचारी वर्गातून व्यक्त होत आहे.

समान काम, समान वेतनाची एकमुखी मागणी

दर्यापूर/ वार्ताहर

न्यायालयातील कर्मचाऱ्यां प्रमाणे राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यात यावी, आणि समान काम समान वेतन या प्रमुख मागणीसाठी शासनाकडे सर्व प्रकारे रीतसर मार्ग अवलंबूनही तोडगा निघाला नसल्याने अखेर जिल्ह्यासह दर्यापूरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आज पासून बेमुदत संपाची हाक दिली आहे.

तसेच शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत माघार घेणार नसल्याची भूमिका घेण्यात आली आहे.

शासनाने दोन्ही कर्मचाऱ्यांमध्ये दुजाभाव करून दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीपासून आजवर वंचित ठेवले आहे. सध्या वाढलेली महागाई आणि त्या महागाईत हातात

येणारा तुटपुंजा पगार, त्या तुलनेत इतर शासकीय विभागातील समकक्ष कर्मचाऱ्यांचे वेतन आणि



❑ दर्यापूर न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर

सध्या मिळणारे वेतन यात तफावत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.उच्च न्यायालयातील कर्मचारी आणि राज्यातील दुय्यम न्यायालयात कार्यरत कर्मचारी हे एकाच नाण्याच्या दोन समान बाजू आहेत. २०२३ पर्यत दोन्ही कर्मचाऱ्यांचे वेतन समान होते. परंतु २०२३ मध्ये उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. याच धर्तीवर दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लाभ व्हावा अशी मागणी आहे.

आधी जीआर काढा मगच माघार असा ठाम निर्धार जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-क, लघुलेखक संघटना, न्यायालयीन बेलीफ कर्मचारी संघटना, तसेच न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-ड यांनी संयुक्तरीत्या घेतला आहे.या संपास महाराष्ट्र राज्य न्यायिक अधिकारी संघ, महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशन, जिल्हा आणि तालुका वकील संघ यांच्यासह राज्यातील बहुसंख्य सर्वपक्षीय आमदार-खासदार यांनी पाठिंबा दिला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

साठ वर्षांपूर्वीच्या आठवणी

साठ वर्षांपूर्वीचे अमरावती शहर आजच्यापेक्षा खूप वेगळे होते. पैशाची चणचण होती, पण मनाची श्रीमंती होती. चुलीवरच्या भाकरीला चव होती, शेजार हाच परिवार होता. त्या साध्या, सुंदर आणि आठवणींनी भरलेल्या काळात डोकावण्याची ही एक छोटीशी सफर आम्ही किशोर देशपांडे यांच्या 'साठ वर्षांपूर्वीच्या आठवणी'या लेखमालेतून आपल्या समोर मांडत आहोत.चला,तर त्या आठवणींना पुन्हा उजाळा देऊया...





इतिहास चाळताना १९५७-१९७५

किशोर देशपांडे

भाग १


माझा जन्म जरी १९५१ साली झाला असला तरी आजूबाजूच्या जगाची थोडी फार ओळख मात्र वयाच्या सहाव्या वर्षापासून सुरु झाली. १९५७ ते १९७२ हा काळ आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक दृष्ट्या सारखाच होता. त्यामुळे त्या काळातील समाजाच्या वेगवेगळ्या पैलूंची जी आठवण माझ्या मनात साठवली आहे, तीच मी इथे व्यक्त करणार आहे.

श्रीमंत नाही आणि गरीबही नाही अश्या मध्यमवर्गात जन्मल्यामुळे त्या वर्गाच्या आर्थिक, सांस्कृतिक आठवणी जास्त आहेत. पहिली आठवण म्हणजे त्या काळात अन्न खूप सकस असायचे, तसेच फळे व भाज्या देखील. प्राथमिक शाळेत मधली सुटी झाली की धावतपळत घरी येऊन अर्धी भाकरी किंवा एक पोळी साध्या घट्ट वरणासोबत तिखट-मीठ कालवून खाताना मिष्टान्न खात असल्याचा अनुभव यायचा. डाळीला एक विशिष्ट छान चव असायची व त्यामुळे फोडणी वगैरे न दिली तरी काहीच बिघडत नसे. बटाटे आणि रताळे देखील नुसते चुलीवर भाजून आम्ही खायचो व त्यात गोडवा असायचा. रुपया, दीड रुपया शेकडा दराने पिकले आंबे दारावर विकत मिळायचे. पाढे मोजताना आंबे वाला १०० च्या ऐवजी १२० आंबे टाकायचा. सर्व आंबे गावरान असायचे आणि रस काढण्यापूर्वी, काढताना आम्ही त्यातले अनेक आंबे चोखून फस्त करायचो. सर्व आंब्यांचा रस काढल्यानंतर घरातील स्त्रिया कोयी व साली पाण्यात पिरगळून पाणरस तयार करून त्याला फोडणी द्यायच्या. आंब्याचा रस उरला असेल तर त्याला वाळवून पोळ्या करून ठेवायच्या.

उन्हाळ्याच्या दिवसांतली एक आठवण म्हणजे घरच्या व शेजारच्या सर्व स्त्रिया एकत्र बसून पापड, सांडया, कुर्डया, शेवया इत्यादी साठवणीचे पदार्थ दुपारची जेवणे आटोपल्यावर तासंतास बसून करायच्या. पापड लाटण्यापूर्वी त्याची जी बोटी करतात, ती आम्हा मुलांना नुसती खायला खूपच आवडायची. चिंचा, पेरू, बोरं, उंबरं हे विकत घेऊन नव्हे तर दुसऱ्यांच्या झाडावरून हिकमतीने मिळवून खाण्याचे जिन्नस होते. शहराचं मूळ नाव औदुंबरावती-उंबरावती-उमरावती अमरावती असे काळाच्या ओघात बदलत गेल्याचे अनुमान अमरावती शहराचा इतिहास लिहिणारे बापूसाहेब कारंजकर यांनी व्यक्त केले आहे. या शहरात उंबराची झाडे घरोघर असायची, हे मात्र मला आठवते.शाळेत असताना भर उन्हाळ्यात शेजारच्या मित्रांसोबत दुपारी १२-१ वाजता बर्फाच्या फॅक्टरीत जाऊन १० पैश्याचा बर्फ चाटत चाटत घरी परत येण्यात खूप गंमत होती. फ्रीज नावाचे प्रकरण तेव्हा घरोघर उगवायचे होते. माझ्या आठवणीप्रमाणे १९६० च्या दशकातही मध्यम वर्गीय लोकांजवळ पैसा शिल्लक राहत नसे. नोकरदार लोकांच्या घरी महिना अखेरीस पैश्याची चणचण जाणवायचीच. अगदी ब्राम्हण जातीतही बहुसंख्य परिवार हे भाड्याच्या घरात व आर्थिक अडचणीतच जगायचे. आमच्या नातेवाईकांमध्ये क्वचितच एखादे सधन कुटंब असेल. परंतु मध्यमवर्गीयांना खाण्यापिण्याची दरात नसायची. बाजारातून विकत घ्याव्या लागणाऱ्या कपडे लत्ते, दागदागिने, खुर्ची-पलंग, फर्निचर साठी मात्र पैश्याची अडचण नेहमीच भासायची. खाकी चड्डी पांढरा सदरा या शालेय गणवेशाचे दोन जोड आणि सणासुदीला अथवा कार्यप्रसंगी घालता यावे म्हणून दोन इतर जोड, इतकेच कपडे आम्हाला मिळायचे. १९७० पर्यंत टेरेलीन टेरीकॉट नव्हते. त्यामुळे कॉटन चे कपडे रोजच्या वापरात, तोच शाळेचा गणवेश आणि कार्यप्रसंगी सिल्क चा सदरा मिळायचा. असे असले तरी आमचे बालपण आनंदात गेले. आपल्या आर्थिक स्तरापेक्षा अधिक उंच स्तर गाठावा, अशी सर्व सामान्य मानसिकताही नव्हती. शिवाय बाजारात आज जी वस्तूंची रेलचेल आहे ती नसल्यामुळे खुणावत नव्हती. पोशाखावरून श्रीमंत की मध्यमवर्गीय हे ओळखता येत नसे. अगदी सधन घरातील स्त्री पुरुष व मुले मध्यमवर्गी यांसारखेच राहायचे. ज्याला स्वतःच्या मालकीचे घर आहे तो धनिक असे आम्ही समजायचो...

(क्रमशः)

मो.नं.९८८१५७४९५४



स्क्रीनवर गेम, वास्तवात गुन्हे.. अल्फा पिढीच्या मनात चालले तरी काय?



हातात मोबाइल, डोक्यात सोशल मीडिया, डोळ्यांसमोर आभासी जग आणि मनात वाढता एकटेपणा आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात घडणारी जेन झी पिढी नेमकी प्रगत होत आहे की मानसिकदृष्ट्या भरकटत आहे? आयुष्य कसे जगावे याबद्दल त्यांची मते स्पष्ट आहेत. यात अल्फा पिढी जेन झीच्या चार पावलं पुढे दिसते. ज्या वयात हातात पाटी-पेन्सिल असावी, डोळ्यांत भविष्याची स्वप्ने असावीत आणि मनात प्रेम, माया, आपुलकीचे भाव असावेत, त्याच वयात काही मुलांच्या मनात हिंसा, द्वेष, सूड, विकृत विचार आणि गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होत असेल, तर हा केवळ चिंतेचा विषय नाही, तर संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारा प्रश्न आहे.

कारण पंचकुलाच्या एका शाळेत तिसरीत शिकणाऱ्या अल्फा पिढीच्या मुलाने केजीमध्ये शिकणाऱ्या मुलीला अत्यंत निर्दयीपणे मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. मुलाच्या मारहाणीत मुलगी रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध झाली, पण तरीही मुलगा तिला मारहाण करत होता. हा व्हिडीओ बघितल्यावर तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या आठ वर्षांच्या मुलांमध्ये एवढे क्रौर्य कुठून आले? का आले? या प्रश्नाने त्याच्या पालकांचीच नाही तर सरकारचीही झोप उडवली आहे. मुलाला पब्जी आणि तस्सम हिंसक व्हिडीओ गेम्स खेळण्याचे व्यसन जडल्याचे प्राथमिक माहितीत समोर आले आहे. त्याचेच हे साईड इफेक्ट्स असल्याचा त्याच्या कुटुंबाचा दावा आहे. अशा अनेक घटना घडत आहेत.

अल्फा पिढीकडून घडलेले गुन्हे जरी गंभीर असले तरी त्यांना शिक्षा होणे शक्य नाही. त्यामुळे समुपदेशन करून त्यांना सोडून देण्यात येऊ शकते, पण मुळात गुन्हेगारीच्या वाटेवर पाऊल टाकलेल्या या मुलांचे समुपदेशन करून त्याची मानसिकता बदलता येईल का? त्याच्यात तयार होत असलेल्या सैतानाला आवरता येईल का? हाच प्रश्न आहे.

आपल्या देशात आजही अल्पवयीन गुन्हेगारांना कडक शिक्षा केली जात नाही. सुधारण्याची संधी दिली जाते. पण जेवढी मुलं पुढे जाऊन मोठे गुन्हे करतात, त्यांची पाळंमुळं लहानपणातच दडलेली असतात, हे मानसोपचारतज्ज्ञांनीही स्पष्ट केलं आहे. आज शहरात व ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांच्या हातून गंभीर गुन्हे घडतात. कुठे भरधाव गाडीखाली निष्पाप जीव तर कुठे मित्रच मित्राचा जीव घेतोय, तर कुठे किरकोळ वादातून हत्या केली जाते. कुठे टोळीयुद्धात अल्पवयीन मुलांचा वापर केला जातो. लहानपणी हिंसक असलेली मुलं पुढे जाऊन गुन्हेगार होण्याची शक्यता अधिक असते, हे अनेक घटनांमधून दिसून आलं आहे. यामुळे आपण नक्की कोणता समाज घडवत आहोत. मुलांना फक्त झेन जी, अल्फा, बिटा नाव देऊन आपण आपली जबाबदारी टाळू शकत नाही.

जेन झी व अल्फा पिढी पब्जी आणि इतर हिंसक व्हिडीओ खेळून मानवी संवेदना गमावून बसतात. रक्त येईपर्यंत मारणं, त्यांच्यासाठी सामान्य बाब झाली आहे. कारण ते रोज पब्जीमध्ये असेच खेळ खेळतात. त्यातूनच जीवघेणे हाल्ले होत आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, भारतात अल्पवयीन मुलांनी केलेल्या गुन्ह्यांमध्ये म्हणजेच बालगुन्हेगारीमध्ये ११.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. संपूर्ण देशाबद्दल बोलायचं झालं तर अल्पवयीन गुन्हेगारीशी संबंधित गुन्ह्यांचा आकडा गेल्या वर्षी ३९,३६४ होता तो आता वाढून ३४,८७८ वर पोहोचला आहे. म्हणजेच दर एक लाख लोकसंख्येमागे अल्पवयीन गुन्ह्याचे प्रमाण ७.९ वरून ८.९ पर्यंत वाढले आहे. मुख्य म्हणजे यातील अल्पवयीन मुलांमधील ७७.७ टक्के ते ८० टक्के मुलं ही १६ ते १८ वर्षे वयोगटातील आहेत. दरोडा, प्राणघातक हल्ला, विनयभंग, छेडछाड आणि लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यांत या मुलांचा आकडा वाढतोय.

हल्लीची मुलं सोशल मीडिया फ्रेंडली आहेत. त्यामुळे पैशाचे आमिष दाखवत अनेक भामटे या मुलांचा वापर सायबर गुन्ह्यांतही करत आहेत. काही ठिकाणी अमली पदार्थांच्या तस्करीबरोबरच शरीर विक्रीसाठीही या मुलांचा वापर केला जात आहे. दरम्यान, अल्पवयीनांकडून होणाऱ्या गुन्ह्यांत बिहार आणि महाराष्ट्र अव्वल आहेत. बिहारमध्ये १७७ टक्क्यांची वाढ झाली आहे तर दिल्लीत सर्वाधिक बालगुन्हे घडत आहेत. आतापर्यंत २,३०६ गुन्हे अल्पवयीन गुन्हेगारीचे आहेत. तर अल्पवयीन गुन्ह्यांत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. देशातील एकूण बालगुन्हेगारीच्या १२ टक्के गुन्हे फक्त महाराष्ट्रात घडतात. ही धक्कादायक माहिती या अहवालातून समोर आली आहे. सर्वात सुरक्षित राज्य असलेले महाराष्ट्र आज बिहारच्या बरोबरीने आहे.

तज्ज्ञांच्या मते यामागे अनेक कारणे जरी असली तरी मुलांवर सोशल मीडियाचा, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा सर्वाधिक प्रभाव आहे. इंटरनेट, ओटीटीवर सहज उपलब्ध होणाऱ्या हिंसक आणि अश्लील कंटेंटमुळे नकळत्या वयात उत्सुकतेपोटी काही मुलं गुन्हे करू लागली आहेत. आपण चुकीचे काही करतोय याची जाणीवदेखील त्यांना नसते. फक्त अनुभव, एक्साइटमेंटसाठीही काहीजण गुन्हे करत आहेत. तसेच शहरी भागात मुलं अमली पदार्थांच्या आहारी जाताना दिसतात. त्यातून पैशांसाठी चोरी, दरोडे घालणे असे गुन्हे त्यांच्याकडून घडू लागले आहेत. तर काही वेळा गुन्हेगारांच्या टोळ्या या मुलांचा वापर करत असल्याने मुलांना आपण गुन्हेगारीच्या विळख्यात कधी सापडलो तेदेखील कळत नाही. ही आजची परिस्थिती आहे.

साधारण २०१०नंतर जन्मलेली ही पिढी तंत्रज्ञानाच्या कुशीत वाढत आहे. मोबाइल, इंटरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनली आहेत. जगभरातील माहिती त्यांच्या बोटांच्या टोकावर आहे; पण या माहितीचा योग्य वापर करण्याची समज त्यांच्या मनात विकसित होत आहे का? मुलांच्या हातात मोबाइल आहे, पण हात धरून चालवणारे पालक कुठे आहेत? इंटरनेटवर हजारो मित्र आहेत, पण मनातले दुःख ऐकणारा मित्र कुठे आहे? माहितीचा महासागर आहे, पण योग्य-अयोग्य ठरवण्याची विवेकबुद्धी कुठे आहे? एक विचार करायला लावणारा प्रश्न- आपण अल्फा पिढीला आधुनिक तंत्रज्ञान देत आहोत; पण त्याचबरोबर माणुसकी, संस्कार, संवेदना आणि विवेक देत आहोत का?

प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी

पोटे 'कि' राणा

दिल्लीत प्रदूषणाने थैमान घातले, दिवाळीत आणखी प्रदूषणाने घातली भर! अशा बातम्या मोबाईलच्या डबड्यात अधून मधून झळकल्या. प्रदूषणाने सारी शहरे वंगाळ होत चालली आहे. प्रदुषणाची कारणे प्रामुख्याने शाळा, विद्यालये, महाविद्यालये येथून स्पर्धा घेऊन शिकवल्या जाते. त्यासाठी आखीव कागद, विशिष्ट पकडे(ग्रीप)ची लेखणी उर्फ पेन अशा थाटात, इतक्या शब्दात, तीतक्या ओळीत किंवा तेवढ्या वाक्यात निबंध, लेख, प्रबंध लिहून आणाव्यात, अशा काही जाहिरती समाज माध्यमातून मिरवताना पुन्हा त्याच मोबाईलच्या डबड्यापुढे तोंड घालण्याची सवय कबूल करावी आपला हा गुण आहे.

पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील असामान्य बदलामुळे 'एल निनो आणि ला नीना' या सारखी चक्रे निर्माण झाल्याने, जगातील अनेक भागांत पर्जन्यावर परिणाम होऊन दुष्काळ पडत आहे. हे सुद्धा मी मोबाईलवर बघत असताना देशात बेधुंदपणे हजारो एकरावर असलेले शेकडो वर्षाचे जंगल औद्योगिक विकासाच्या नावाने देशातील काही उद्योजक तोडत आहे. अर्थात त्याला या देशातील जनतेने निवडून दिलेल्या सरकारची संमती असल्याशिवाय कसे काय तोडल्या जाणार? बहुदा शेतकऱ्याला किंवा सामान्य नागरिकाला शेतात अडचणीचे झाड तोडायला सरकारी जंगल विभागाच्या चकरा माराव्या लागतात. ही बाब सर्वांना कळते. पण काही बडे उद्योजक आणि काही देशाचे बडे बाबू म्हणजे प्रशासकीय अधिकारी या देशाचा कारभार पार बुडवण्याच्या नादात आहे की काय? ह्यावर काही पत्रकारांच्या डिबेट मोबाईलवर पाहत असतो. म्हणून मोबाईलचे डबड कधी खिश्यात तर कधी खिशातून हातात हिंडत राहते.

सध्या महाराष्ट्र राज्यात दिवाळीसाठी सर्व शेतकऱ्यांना पाच हजाराचे भातकं दिल्याची वार्ता वाऱ्यासारखी ह्याच मोबाईल वर मला बघून, या राज्याचे शेतकरी किती बिचारे झाले याचा कळवळा बघत होतो. पुन्हा पत्रकार शेतकऱ्यांचे म्हणणे 'चार चौघात' मिरवत होते. कुणी तर स्वाभिमानानें राज्याच्या मुख्यमंत्र्याला आपणच भातकं देऊन टाकू म्हणून पोस्टातून मनीऑर्डर केल्याचे भरपूर रिल मोबाईलवर बघत होतो. कदाचित ज्यांचे जास्त फॉलोअर किंवा व्ह्यूवजर तेवढे जास्त मानधन सुद्धा रिल तयार करणाऱ्याला मिळाले असतील ! यात मला शंका वाटत नाही. कारण रात्रीच्या झोपेतच आपला मोबाईल आराम करतो. तो पर्यंत त्याचे सर्व रिल बघून देशाटन, पंडित चर्चा बाकी संभाषण पूर्ण होण्याचा अनुभव ज्याला त्याला आहे, तसाच मला पण आहे.



दुष्काळ पडला म्हणून सरकार ने पावले उचलावी ही भूमिका लक्षात घेऊन, विदर्भातील काही गावात मुख्यमंत्र्यापासून तर इतर मंत्र्यापर्यंत सरकारी लवाजमा घेऊन काही घरी जेवायला गेले. कुणाच्या शेत धु-यावर जाऊन पाहणी केली. 'दिलासा वाटला'! पण कितीजणांना दिलासा मिळाला याचे सुद्धा रिल प्रसिद्ध झाले.

दुष्काळात सर्वांचेच कंबरडे मोडतात हो! आधीच दीन त्यात दुबळा होतो. मध्यमवर्गीय आर्थिक लुळा होतो, तर व्यापारी सुकतो. मात्र शोषक सुखावतो!! कारण त्याचेकडे संचयित धनधान्य तो वाट्टेल तसे उपयोगात आणून लुटत राहतो. बळीराजा तर शासकीय धोरणाचा बळीच गेला. त्याच्या आयुष्यात सरकार नावाची यंत्रणा फक्त मतदान काळात उगवते. नंतर तोंडाला पाने पुसणारे उपक्रम! कर्जमाफी, व्यजमुक्त मुद्दल, वाट्टेल तिथे शेतमाल विका पार, आधुनिक शेतीसाठी शिबिरे अमुक तमुक सारे काही मोबाईलवर बघुन बघून सरकार नावाची यंत्रणा पिढ्यानपिढ्या किती बनवा बनवी करीत आहे असा विचार डोक्यात घर करू लागतो.

'आपलं ठेवावं झाकून आणि दुसऱ्याच बघावं वाकून' या म्हणीचा वाक्यात उपयोग करा ! असा मराठी व्याकरणाचा रिल एकदम नजरेसमोर आला. मला ही म्हणं एकदम समजली. कारण अमरावती शहराची दिवाळी सणाला गावागावात लय चर्चा सुरू होती. मला सुद्धा एका म्हातारीचा व्हिडिओ मोबाईलवर दिसला. खूपच मजेदार राजकारणाची दशा त्या म्हातारीचे निमित्ताने 'उधाडल्या' जात आहे. राजकारण्याच्या तोंडसुखाचा गंध दरवळवणारा घटक म्हणजे समाज मध्यातील बातमीदार. सरसकट 'नॉन सर्टिफिकेट उद्योग' म्हणजे समाज मध्यातून वाट्टेल तशा गोष्टी, बातम्या, पोस्ट प्रसारित करणे होय.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारने दिलेली पाच हजाराची राशी सणावाराला तर कुणाच्या आजाराला मदतीची ठरली असावी. असा सकारात्मक भाव ठेऊ. त्याचे पडसाद अमरावती शहरातील दोन आमदारांच्या वाक्याने राज्यभर प्रसारित झाले. विषय अगदी साधा सोपा आहे. प्रत्येक घरात दिवाळी साजरी व्हावी हा प्रशस्त हेतू या मागे असावा, असा विचार करुन मी म्हातारीचा रिल पाहिला. कित्येक वर्षाचा हिशेब आणि कित्येक वर्षाची मेहरबानी त्या म्हातारीच्या बोबड्या पण मिश्किल भाषेतून अस्सल भाव तिच्या ग्रामीण बोली भाषेतून टपकत होती. हा म्हातारीचा रिल सुद्धा आमच्यात पत्रकाराने केला असावा असा माझ्या आतील पत्रकार मला सांगत होता.

म्हातारीने तिच्या मतदानाच्या हक्कात तिचा अधीकार व्यक्त केला. हा लोकशाहीचा मजबूत भाग एकीकडे विचारत घेतला पाहिजे. येथे भूतपूर्व पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा किस्सा आठवतो. कुणाचे तरी सांगण्यावरून म्हातारीने नेहरूंची कॉलर पकडून स्वातंत्र्याची पावती व लोकशाहीचा हक्क सांगणारा तो प्रसंग सर्व श्रुत असवा. खरी गंमत अशी आहे की, दोन्ही आमदार एकाच पक्षाच्या अवती भवती असताना. गरीब जनतेच्या आडोश्यातून राजकारणाची विटंबना संपूर्ण जनतेच्या नजरेत आली आणि आपण दिलेल्या मताने मजा करणारे लोकप्रतिनिधी गोरगरीबांना लाचारीची सवय लावताना एकमेकांना उधडत आहे. पत्रकार त्यांच्या वाक्याची अधोरेखित बातमी, समाज माध्यमे उडवा उडवीचे रीळ तयार करत आहे. म्हणजे जनतेच्या मतावर निवडून गेलेले हे प्रतिनिधी कुठल्या स्तरावर जनतेचा विचार करीत असतात? यावर सर्वांनी विचार करण्याची गरज आहे.

अमरावती सांस्कृतिक शहरे म्हणून पुण्यानंतर ओळखले जाणार गरीब स्वभावच शहर. त्या शहराला एक संस्कृती, शिस्त आणि काही वैशिष्ट आहे. त्याचा राजकारणाशी काही संबंध नाही असे म्हणून चालणार नाही. कारण देशाचे पहिले कृषी मंत्री, स्वतंत्र देशाचे पहिले राष्ट्र संत, स्वच्छतेचा पाहिला सार्वजनिक संदेश देणाऱ्या कर्मयोगी संताची अमरावती आहे. मात्र ती राजकरण्याने कुठल्या स्तरावर आणली आहे याचा विचार आता जेन जी करू लागली आहे.

राजकारण हे समाजकारणाचे प्रत्यक्षित असल्याची व्याख्या समाजशास्त्रात कदाचित असणार. त्यानुसार खरच आमचे प्रश्न राजकारणानिमित्ताने सुटतात की जटिल होतात. यावर सुबुद्धी असणारे विचार करतील. बुद्धी असणारे वाद विवाद करतील आणि विचार असणारे सुधारणेच्या दृष्टीने पाऊले टाकतील. जेन जी आता रेजिम चेंज करणार! म्हणजे करणार!! ही काळया दगडावरची श्वेतरेष आहे, गल्ली ते दिल्लीपर्यंत ही चर्चा सुरू आहे.

दिल्लीत प्रदूषणात वाढ होऊ नये म्हणून यंदा दिवाळीत फटाके फोडण्यावर कोर्टाने प्रतिबंध घातला. राज्यात भीमाशंकर जंगलातील वृक्षतोड लोकांच्या दबावाने थांबली. नुकत्याच तीन दिवसापूर्वी आडनदीवर जलविद्युत प्रकल्पाची उभारणीसाठी चिखलदरा परिसरात हजारो वृक्षांची तोड होण्याचे वृत्त वाचले. जगात 'एल निनो' वादळामूळ उद्भनारे दुष्काळाचे सावट आहे. यावर्षी हिवाळ्याची चाहूल दिवाळी येऊनही होत नाही. शिवाय कोरड्या दुष्काळाने होरपळत चाललेल्या गरिबीला वाली कोण? गावोगावी पिण्याच्या पाण्याची बोंब सुरू झाली व टँकर ने पाणी पुरवठ्याची व्यवस्था प्रशासनाच्या नाकी नऊ आणणार आहे. विहिरीचा उपसा काही पटीने कमी झाला त्यामुळे फळबागांची हयगळ होणार. पेपरफुटीने कलंकीत सरकारने प्रलंबित ठेवलेल्या स्पर्धा परीक्षा देणारी युवा पिढी बेरोजगीच्या ढिगाऱ्यात वाढ करीत आहे.

सरकारी नेते, अधिकारी, कर्मचारी, व्यापारी आणि उद्योजक ह्या प्रजाती देशातील आर्थिक लाभार्थी असल्याची बातमी मोबाईलवर बघत होतो तेवढ्यात पुन्हा रिल आली पोटे 'कि'राणा!! ती पूर्ण पाहण्याआधीच मोबाईल स्विच ऑफ झाला. चार्ज करून पुढे काय आहे ते बघावे म्हणून फोन चार्जिंगला लावून आहे.

तो पर्यंत विचार करीत बसलो की सरकार 'आता आले.....'

खाय ला आईने अनारसा दिला.

कबीर फादर

मो.७७९८६४५५६५.

सचिनची 'बॅटोग्राफी' उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी प्रेरणादायी!

१६ नोव्हेंबर २०१३ यादिवशी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर जगविख्यात क्रिकेटपटू भारतरत्न सन्मानित सचिन तेंडुलकर आपला २०० वा आणि शेवटचा कसोटी सामना खेळला. त्याच्या निवृत्तीला १३ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने १६ नोव्हेंबर २०२६ रोजी वानखेडे स्टेडियमवरील 'एमसीए शरद पवार क्रिकेट म्युझियम'मध्ये 'बॅटोग्राफी' (बॅट्सच्या माध्यमातून मांडलेला क्रिकेट प्रवास) नावाच्या अनोख्या वस्तुसंग्रहाचे अनावरण करण्यात आले. या 'बॅटोग्राफी' संग्रहामध्ये सचिनच्या १९७८ पासून ते २०१३ मधील शेवटच्या कसोटीपर्यंतच्या प्रवासातील निवडक २५ ऐतिहासिक बॅट्स प्रदर्शित करण्यात आल्या असून प्रत्येक बॅट ही त्याच्या कारकिर्दीतील एका गाजलेल्या ऐतिहासिक क्षणाची आठवण करून देते. १९७८ साली वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी मोठी बहीण सविता हिने काश्मीरमधून आणून दिलेली पहिली काश्मीर विलो बॅट, १९९० मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी मँचेस्टर येथे झळकावलेल्या पहिल्या कसोटी शतकाची बॅट तसेच १६ मार्च २०१२ रोजी मीरपूर येथे शतकांचे महाशतक (१०० वे आंतरराष्ट्रीय शतक) पूर्ण करणारी बॅट या ठिकाणी ठेवण्यात आली आहे. याशिवाय १९९८ मध्ये महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांनी सचिनला भेट दिलेली खास बॅट आणि २००३ च्या दक्षिण आफ्रिकेतील एकदिवसीय विश्वचषकात सचिनला 'मालिकावीर' पुरस्कार मिळवून देणारी बॅट या संग्रहात आहेत. याशिवाय या संग्रहात त्याचे पहिले हेल्मेट, रणजी ट्रॉफीची जर्सी आणि निरोपाच्या भाषणाची मूळ प्रतही येथे जतन केली गेली आहे. सचिनचा या 'बॅटोग्राफी'तून उलगडणारा खडतर आणि प्रेरणादायी प्रवास उदयोन्मुख क्रिकेटपटूंना नक्कीच ऊर्जा देईल यात शंका नाही.

प्रदीप मोरे

■ बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

रुग्णालयांमध्ये रेट बोर्ड लावणे अनिवार्य होणार! आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे आश्वासन

आमदार साजिद खान पठाण यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

रुग्णालयांमध्ये उपचारांच्या नावाखाली आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांमध्ये अनेकदा संभ्रम निर्माण होतो. उपचार, वैद्यकीय तपासण्या, शस्त्रक्रिया, औषधे आणि विविध वैद्यकीय सुविधांचे दर स्पष्टपणे उपलब्ध नसल्याने रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील प्रत्येक शासकीय व खासगी रुग्णालय, क्लिनिक आणि पॅथॉलॉजी केंद्रामध्ये उपचार व तपासण्यांचे दर दर्शविणारे रेट बोर्ड लावणे अनिवार्य करावे, अशी मागणी आमदार साजिद खान पठाण यांनी केली आहे.

त्यांच्या या मागणीला सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन यासंदर्भात आवश्यक आदेश जारी करण्याचे आश्वासन दिले आहे.

मुंबई येथे आमदार साजिद खान पठाण यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन राज्यातील आरोग्यसेवेतील पारदर्शकता आणि रुग्णांची होणारी आर्थिक गैरसोय याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया तसेच काँग्रेस प्रदेश अल्पसंख्याक विभागाचे ऑर्गनायझिंग इन्चार्ज उपस्थित होते.



खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल झाल्यानंतर रुग्णांना अनेकदा विविध तपासण्या, औषधे, वॉर्डचे शुल्क, डॉक्टरांची फी, शस्त्रक्रिया आणि इतर वैद्यकीय सुविधांसाठी किती खर्च येणार, याची स्पष्ट माहिती मिळत नाही. उपचार सुरू झाल्यानंतर वेगवेगळ्या बाबींच्या नावाखाली आकारण्यात येणाऱ्या शुल्कामुळे अंतिम बिलाचा आकडा वाढतो. परिणामी सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो.

रुग्णालयांकडून आकारण्यात येणारे दर सर्वसामान्यांना सहज समजतील अशा पद्धतीने दर्शनी भागात उपलब्ध असणे आवश्यक आहे. रुग्णांना उपचार सुरू करण्यापूर्वी संभाव्य खर्चाची माहिती मिळाल्यास त्यांना आर्थिक नियोजन करता येईल. तसेच विविध रुग्णालयांमधील दरांची तुलना करणेही शक्य होईल. यासाठी प्रत्येक रुग्णालयात अद्ययावत आणि स्पष्ट दरपत्रक लावण्याची व्यवस्था शासनाने बंधनकारक करावी, अशी आग्रही भूमिका आमदार पठाण यांनी आरोग्यमंत्र्यांसमोर मांडली.

शासनस्तरावर लवकरच निर्णयाची अपेक्षा

आमदार साजिद खान पठाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक भूमिका घेतली. यासंदर्भात लवकरच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल. त्यानंतर राज्यातील शासकीय व खासगी रुग्णालयांसह क्लिनिक आणि पॅथॉलॉजी केंद्रांमध्ये रेट बोर्ड लावण्याबाबत आवश्यक आदेश जारी करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

बोगस डॉक्टरांविरोधात राज्यव्यापी मोहीम राबविण्याची मागणी

दरम्यान, वैध वैद्यकीय पदवी आणि आवश्यक नोंदणी नसतानाही डॉक्टर म्हणून रुग्णांवर उपचार करणाऱ्या बोगस डॉक्टरांचा प्रश्नही आमदार पठाण यांनी आरोग्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिला. अशा बोगस डॉक्टरांमुळे रुग्णांच्या आरोग्याशी गंभीर स्वरूपाचा खेळ होण्याची शक्यता असून, त्यांच्या अनधिकृत वैद्यकीय व्यवसायावर कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील बोगस डॉक्टरांची माहिती संकलित करून त्यांच्याविरोधात राज्यव्यापी विशेष मोहीम राबवावी. संबंधितांची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

पीडीकेव्हीची राष्ट्रीय स्तरावर गरुडझेप; 'अ' श्रेणीची अधिस्वीकृती!

■ प्रतिनिधी | अकोला ■

■ कृषी शिक्षण, संशोधन आणि बीजोत्पादनातील कामगिरीवर शिक्कामोर्तब
■ चार वर्षांत २९५ संशोधन शिफारशी, बियाणे उत्पादनात चारपट वाढ

कृषी शिक्षण, संशोधन, बीजोत्पादन आणि शेतकरी हितार्थ विस्तार कार्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर मानाचा तुरा रोवला आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद (आयसीएआर), नवी दिल्लीच्या राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाने विद्यापीठाला 'अ' श्रेणीची अधिस्वीकृती प्रदान केली आहे. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या मंडळाच्या ४४ व्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे कृषी शिक्षण, संशोधन आणि शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्याच्या विद्यापीठाच्या प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

आयसीएआरचे उपसचिव (कृषी शिक्षण) राजेश कुमार झा यांनी यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. या अधिस्वीकृतीमध्ये विद्यापीठासह अकोला येथील पदव्युत्तर शिक्षण संस्था, कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तसेच नागपूर आणि सोनापूर (गडचिरोली) येथील कृषी महाविद्यालयांमधील अधिसूचनेत नमूद अभ्यासक्रमांचाही समावेश आहे.

कुलगुरू कर्नल कमांडंट प्रा. (डॉ.) शरद रामराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने मागील काही वर्षात कृषी शिक्षणाचे आधुनिकीकरण, संशोधनाचा विस्तार, दर्जेदार बियाण्यांचे उत्पादन आणि शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला. याच प्रयत्नांचे फलित म्हणून विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावरील 'अ' श्रेणीचे मानांकन मिळाले आहे.

या यशात शिक्षण संचालक तथा अधिष्ठाता डॉ. देवानंद पंचभाई, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने, विविध महाविद्यालयांचे अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता, आयसीएआर नोडल सेल, कुलसचिव प्रीती रोडगे, नियंत्रक डॉ. हेमंत ठाकरे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, कामगार, विद्यार्थी आणि शेतकरी बांधवांचे योगदान असल्याचे विद्यापीठाने नमूद केले आहे.

जबाबदारी आता अधिक वाढली : कुलगुरू डॉ. गडाख



सप्टेंबर २०२२ मध्ये कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर कृषी शिक्षणाचे आधुनिकीकरण, संशोधनाचा विस्तार, दर्जेदार बियाण्यांची उपलब्धता आणि अभिनव विस्तार प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्यावर विद्यापीठाने भर दिला. अत्यल्प मनुष्यबळ असतानाही सर्व अधिकारी, कर्मचारी, शास्त्रज्ञ आणि विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे 'अ' श्रेणीचे मानांकन मिळविणे शक्य झाले. या यशामुळे विद्यापीठाची जबाबदारी अधिक वाढली असून शिक्षणाची गुणवत्ता, संशोधनाची उपयुक्तता आणि शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या सेवांचा दर्जा सातत्याने उंचावून हे मानांकन टिकविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. शरद गडाख यांनी केले.

संशोधन शिफारशींमध्ये ६४ टक्क्यांची वाढ

विद्यापीठाच्या अलीकडील कामगिरीत संशोधन क्षेत्रातील प्रगती विशेष उल्लेखनीय आहे. २०२२-२३ ते २०२५-२६ या चार वर्षांत तब्बल २९५ संशोधन शिफारशी देण्यात आल्या. यामध्ये पीक उत्पादन व संलग्न विषयांतील २४७, तर कृषी अभियांत्रिकी क्षेत्रातील ४८ शिफारशींचा समावेश आहे. वार्षिक संशोधन शिफारशींची संख्या ५८ वरून ९५ पर्यंत पोहोचली असून त्यात सुमारे ६४ टक्क्यांची वाढ झाली आहे.

बियाणे उत्पादनात चारपट वाढ

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने मोठी झेप घेतली आहे. २०२२-२३ मध्ये ७ हजार ६७१ क्विंटल असलेले वार्षिक बीजोत्पादन २०२५-२६ मध्ये ३३ हजार ६३४ क्विंटलपर्यंत पोहोचले आहे. क्षेत्रही १ हजार ८८७ हेक्टरवरून ३ हजार ३२३ हेक्टरपर्यंत वाढविण्यात आले. सुमारे ८०० हेक्टर वापरात नसलेली जमीनही बीजोत्पादनासाठी उपयोगात आणण्यात आली. फळपिकांच्या कलमांचे आणि रोपांचे उत्पादन २.८५ लाखांवरून ४.१६ लाखांपर्यंत वाढले आहे.

ॲग्रोटेकमधून नऊ लाख शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान

विद्यापीठाच्या राज्यस्तरीय ॲग्रोटेक कृषी प्रदर्शनाला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. २०२५ मधील प्रदर्शनाला सुमारे नऊ लाख शेतकऱ्यांनी भेट दिली. शिवार फेरीत २५ एकरांवर २२८ पीकवाण आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. तसेच हॉर्टिकल्चर डेच्या माध्यमातून सुमारे २५ हजार शेतकऱ्यांना आधुनिक उद्यानिकी तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. विदर्भभर बियाणे, रोपे आणि कृषी निविष्ठांची उपलब्धता वाढविण्यासाठी २९ विक्री केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

एज्यु एक्स्पो-२०२६ चा थाटात समारोप

'ना नफा ना तोटा' तत्वावरील अशा आयोजनाची समाजाला गरज – आयुक्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिक्षण क्षेत्रातील बदलती आव्हाने, विद्यार्थ्यांच्या भवितव्याची गरज आणि पालकांच्या अपेक्षा लक्षात घेता 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर आयोजित होणाऱ्या एज्यु-एक्सपोसारख्या उपक्रमांची आज समाजाला नितांत आवश्यकता आहे. शैक्षणिक आणि सामाजिक बांधिलकीची अस्सल जाणीव ठेवून एज्यु-एक्सपो २०२६ च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची आणि उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारा शैक्षणिक महा-एक्सपो अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आणि अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन



अमरावती महानगरपालिका च्या आयुक्त, (आय. ए. एस.) सौम्या शर्मा चांडक यांनी केले.

अकोल्यातील आरडीजी महाविद्यालय परिसरात आयोजित तीन दिवसीय एज्यु-एक्सपो २०२६ च्या समारोपप्रसंगी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर एज्यु-एक्सपो २०२६ आयोजन समितीचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्राला नवी ऊर्जा, नवी दिशा आणि समृद्धी प्रदान करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला योग्य मार्गदर्शन मिळवून देणारा हा उपक्रम अकोल्यात आयोजित होणे ही ऐतिहासिक आणि अभिमानास्पद घटना आहे, असेही त्यांनी नमूद केले.

'एज्यु एक्स्पो-२०२६' मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासह कारिअर मार्गदर्शन, वैज्ञानिक दृष्टीकोनाची व्यापक ज्ञान चळवळ, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सीनियर के.जी. ते पदवी व पदवीत्तर विद्यार्थ्यांसाठी भविष्याची बांधणी करणारा अकोल्यातील हा ऐतिहासिक उपक्रम ठरल्याची भावना सुजाण अकोलेकर, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एज्यु एक्स्पो आयोजन समितीचे सदस्य तथा भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन नंदकिशोर डंबाळे, जया भारती-इंगोले आणि आकांक्षा गोमासे यांनी तर आभार प्रदर्शन एज्यु एक्स्पो-२०२६ आयोजन समितीचे सदस्य तथा प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे यांनी केले.

अकोलेकरांना २० नाटकांची मेजवानी; राज्य मराठी नाट्य स्पर्धा २१ नोव्हेंबरपासून

अकोला : सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ६५ वी राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २१ नोव्हेंबर ते १९ डिसेंबरदरम्यान आयोजिण्यात आली असून, प्रमिलाताई ओक नाट्यगृहात रोज सायंकाळी ७ वा. याप्रमाणे एकूण २० नाट्यप्रयोग होतील.

या नाट्यमहोत्सवाची सुरुवात शनिवार, दिनांक २१ नोव्हेंबर रोजी श्याम पेठकर लिखित आणि मिलिंद इंगळे दिग्दर्शित माऊली बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या 'टिंगल टिंगल' या नाटकाने होणार आहे. त्यानंतर रविवार, दि. २२ नोव्हेंबरला दिलीप जगताप लिखित आणि शुभम पाईकराव दिग्दर्शित स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, कोकलगाव यांचे 'हे दोघे बंधू' सादर होईल.

दि. २३ नोव्हेंबर रोजी श्रीनिवास नार्वेकर लिखित आणि स्नेहल कहाळे दिग्दर्शित श्रीमती मीनाबाई श्रीकृष्ण कहाळे चॅरिटेबल सोसायटी, अकोट यांचे 'येस माय डियर', तर मंगळवार, दि. २४ नोव्हेंबरला अमोल कुलकर्णी लिखित व अतुल मेहकरकर दिग्दर्शित श्री साईगणेश शिक्षण व सांस्कृतिक बहुउद्देशीय मंडळाचे 'आरशातल्या आरशात वारले बेवारशी' हे नाटक रंगणार आहे. बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी पूजा भाकरे लिखित आणि वर्षा कवडे दिग्दर्शित जनसखा शिक्षण युवक कल्याण समाज कल्याण व्यायाम क्रीडा संस्था, अकोला यांचे 'भ्रूण हत्या एक अभिशाप' सादर केले जाईल.

Change In Name
(Old passport No K0624284) I Have Change My Mother Name In My Passport From
SANGANI MANISHA PIYUSH
-TO-
MANISHA PIYUSH SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624284) I Have Change My Father Name In My Passport From
SANGANI PIYUSH JAISUKHLAL
-TO-
PIYUSH JAISUKHLAL SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plot, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624283) I Have Change My Name In My Passport From
SHREEYA SANGANI
-TO-
SHRRIYA PIYUSH SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg , Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624281) I Have Change My Name In My Passport From
PIYUSH SANGANI
-TO-
PIYUSH JAISUKHLAL SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624283) I Have Change My Mother Name In My Passport From
SANGANI MANISHA PIYUSH
-TO-
MANISHA PIYUSH SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg , Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624283) I Have Change My Father Name In My Passport From
SANGANI PIYUSH JAISUKHLAL
-TO-
PIYUSH JAISUKHLAL SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg , Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624284) I Have Change My Name In My Passport From
NIKKIE SANGANI
-TO-
NIKKE PIYUSH SANGANEE
My Residential Address is 4/15 Durgashreya Appartments, Ramdhan Plot, Maratha Nagar, Ramdaspeth, Umari, Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624282) I Have Change My Husband Name In My Passport From
SANGANI PIYUSH JAISUKHLAL
-TO-
PIYUSH JAISUKHLAL SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624281) I Have Change My Wife Name In My Passport From
SANGANI MANISHA PIYUSH
-TO-
MANISHA PIYUSH SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg Akola, Maharashtra, 444005

Change In Name
(Old passport No K0624282) I Have Change My Name In My Passport From
MANISHA SANGANI
-TO-
MANISHA PIYUSH SANGANEE
My Residential Address is Ganraaya, Gaddam Plots, Near Chandak Mangal Karyalaya, Mudavkar Hospital Gally, Bajirao Peshwe Marg , Akola, Maharashtra, 444005

जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, मोहम्मद शाहनवाज कुरेशी व अब्दुल समद अब्दुल रहीम दोघे रा अकोला, ता.जि. अकोला यांचे मौजे अकोला ता. जि. अकोला येथील नझुल शिट क्र ३८-ए, नझुल प्लॉट क्र २०७ मधील तेलीपुरा भागातील प्लॉट बाबतचे आधीचे खरेदीखत दि. २४.३.१९७२, दस्त क्र १९०२ हे मूळ खरेदी खत हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर पो स्टे येथे कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित आज पासुन चौदा (१४) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

आपला
शिशिर अरविंद देशपांडे
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो. ९८२३०९१३७७

जनमाध्यम प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त अकोटमध्ये रॅली; आदिवासी संस्कृतीचे घडले दर्शन!

राष्ट्रीय जनजाती गौरव दिन उत्साहात साजरा; गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

■ प्रतिनिधी | अकोट ■

जल, जंगल आणि जमिनीच्या रक्षणासाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंडाचे निशाण फडकविणारे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती तथा राष्ट्रीय जनजाती गौरव दिन अकोट शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य रॅलीतून आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा आणि एकजुटीचे दर्शन घडले. पारंपरिक वेशभूषेतील आदिवासी बांधवांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी जिजामाता चौक येथून अग्रसेन भवनपर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये युवक, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह आदिवासी समाजबांधव मोठ्या संख्येने



सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषा आणि सांस्कृतिक सादरीकरणातून आदिवासी समाजाच्या अस्मितेचे दर्शन घडले. भगवान बिरसा मुंडा यांच्या क्रांतिकारी विचारांचा जागर करीत समाजाच्या हक्क, स्वाभिमान आणि एकतेचा संदेश यावेळी देण्यात आला. अग्रसेन भवन येथे आयोजित मुख्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश भारसाकळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून खासदार अनुप धोत्रे उपस्थित होते. यावेळी आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी दिलेला लढा ऐतिहासिक असून, ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभारलेला त्यांचा संघर्ष भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वपूर्ण पर्व आहे. समाजाला संघटित करण्याची त्यांची भूमिका, अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द आणि क्रांतिकारी विचार आजही नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे, चंदन, प्रवीण ठाकरे, पांडुरंग तायडे, महेंद्र पवार, अनिल उईके, संजय भिलावेकर, शिवदासजी भारसाकळे, अजाबराव भास्कर, सुभाष सुरत्ने, अजय कासदे, रमेश केदार, प्रकाश मावसकर, लक्ष्मण भास्कर, किशोर सोलकर, संजय साळुंखे, ब्रिजेश गवते, सुलभाताई सोळंके, मंगेश सोलंके, दिलीप पवार, देवानंद मोरे, गजानन पालवे आदी उपस्थित होते. याशिवाय गावकरी, युवक, कर्मचारी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन भगवान बिरसा मुंडा जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष उमेश पवार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी देवा भारसाकळे, किसनराव सोलकर, रवी सोळंके, प्रवीण तायडे, गजानन चव्हाण, राजेश राठोड, नारायण सोलंवे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

मनरेगाच्या १९४ कामांचे पोस्टमार्टम;१९ पथके मैदानात

जिल्हाभरातील कामांची झाडाझडती, तपासणी अहवालातून अनेकांचे पितळ उघडे पडण्याची शक्यता

वर्धा/जनमाध्यम

मनरेगा म्हणजेच रोजगार हमी योजनेत 'अर्धे तुम्ही... अर्धे आम्ही' असा कारभार चालवून शासकीय निधीवर डल्ला मारणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. आर्वी पंचायत समितीतील मनरेगा गैरव्यवहाराचे प्रकरण गाजल्यानंतर आता जिल्हा प्रशासनाने संपूर्ण जिल्ह्यातील प्रलंबित कामांचे लेखापरीक्षण आणि तपासणी हाती घेतली आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत प्रलंबित असलेल्या तब्बल १९४ कामांची १९ पथकांकडून तपासणी सुरू झाली आहे. या झाडाझडतीत कोणत्या तालुक्यात कसा कारभार झाला, कुठे नियमांना हरताळ फासला आणि कुठे शासकीय निधीचा गैरवापर झाला, याचा लेखाजोखा समोर येणार आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात सिंचन विहिरी, फळबाग लागवड, वृक्षारोपण, बांबू लागवड आणि पांदण रस्त्यांसह विविध कामे करण्यात आली आहेत. मात्र, आर्वी तालुक्यात याच योजनेच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे प्रकरण उघडकीस आले. सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या स्तरावरच गैरव्यवहार झाल्याचे समोर आल्यानंतर या प्रकरणाने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा वृत्तमालिकेद्वारे पाठपुरावा झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर यांना बडतर्फ केले. याप्रकरणी आर्वी पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल झाला. पोलिसांनी प्रणाली कसर आणि तत्कालीन गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांना अटक केली होती. सध्या या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

आर्वीतील प्रकरणामुळे



मनरेगाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असतानाच प्रशासनाने आता जिल्ह्यातील अन्य कामांचीही तपासणी सुरू केली आहे. १९ पथकांच्या माध्यमातून १९४ कामांची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. कागदोपत्री दाखविलेली कामे प्रत्यक्षात झाली का, कामांचा दर्जा काय आहे, खर्च आणि काम यांचा ताळमेळ आहे का, याची तपासणी होणार आहे. त्यामुळे या मोहिमेच्या अहवालाकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

आर्वीतील प्रकरणाने मनरेगा यंत्रणेतील अनियमिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष कामांच्या ठिकाणी जाऊन पडताळणी झाल्यास अनेक बाबी उघड होण्याची शक्यता आहे. तपासणी अहवालानंतर नेमके कोण जबाबदार ठरते, याचे उत्तर मिळणार आहे.

आर्वीसाठी जिल्हास्तरीय चार पथके

१९४ कामांच्या तपासणीसाठी प्रशासनाने १९ पथकांची नियुक्ती केली आहे. प्रत्येक तालुक्यासाठी एक तालुकास्तरीय पथक, तर जिल्हास्तरावर ११ पथके तैनात करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे आर्वी तालुक्यातील कामांची तपासणी करण्यासाठी एक तालुकास्तरीय आणि चार जिल्हास्तरीय अशा एकूण पाच पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आर्वीतील पूर्वीच्या गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर या तपासणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

३१ मार्च २०२५ पर्यंत प्रलंबित असलेल्या मनरेगाच्या १९४ कामांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी एकूण १९ पथके तयार केली आहेत. तपासणीअंती सादर होणाऱ्या अहवालातून कामांची वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

-श्रीपती मोरे,
उपजिल्हाधिकारी (रोहयो), वर्धा.

पाण्यासाठी उद्या माणूसच माणसाच्या विरोधात उभा ठाकेल

दुष्काळ निवारण्यासाठी राष्ट्रसंतांचा ग्रामगीतेतील जलसंधारणाचा विचारच तारक-आ.सुमित वानखेडे

आर्वी/जनमाध्यम

तंत्रज्ञानाच्या जोरावर माणूस चंद्रावर आणि मंगळावर पोहोचला; मात्र निसर्गाचे संवर्धन करण्यात तो कमी पडत आहे. सध्याच्या भीषण दुष्काळाची तीव्रता पाहता भविष्यात पिण्याच्या पाण्यासाठी माणसाला माणसाच्या विरोधात युद्ध करण्याची वेळ येऊ शकते. ही भयावह परिस्थिती टाळायची असेल, तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील जलसंधारण आणि मनसंधारणाचा विचार आचरणात आणणे हाच खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन आ.सुमित वानखेडे यांनी केले.

आदर्श ग्राम संसद मिर्झापूर नेरी येथे दिवाळी स्नेहमिलन, दुष्काळ निवारणार्थ ग्रामस्थांशी संवाद आणि भव्य सामुदायिक प्रार्थनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सरपंच बाळाभाऊ सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली मिर्झापूर नेरीने वर्धा जिल्ह्यात प्रथम



क्रमांक पटकावत ५० लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले. या यशाबद्दल आमदारांनी ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि समर्पणाचे कौतुक केले. यावेळी सरपंच बाळाभाऊ सोनटक्के यांनी गावाच्या विकासकामांची आणि आगामी नियोजनाची माहिती दिली.

कार्यक्रमात गावातील गुरुदेव सेवा मंडळाचा वारसा जपणाऱ्या दिवंगत सेवकांना दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सामुदायिक प्रार्थनेत सहभागी होत आमदार वानखेडे यांनी खंजिरी वाजवून भजनात सहभाग घेतला. बाल गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अभियानात उत्कृष्ट कामगिरीबद्दल ग्रामविकास अधिकारी संजय यावले, उत्कृष्ट शेतकरी श्रीधर जाधव, उखंडराव भांगे, तारेश बोडखे, श्रवण सोनटक्के आणि गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ वानखेडे यांचा सत्कार करण्यात आला.

जिद्द, चिकाटी, ग्रामस्थांची साथ आणि प्रशासनाशी योग्य समन्वय यामुळेच ५० लाखांचे पारितोषिक मिळाले. हा पुरस्कार माझा नसून मेहनत घेणाऱ्या समस्त ग्रामस्थांचा आहे, अशी भावना सरपंच बाळा सोनटक्के यांनी व्यक्त केली. सरपंचांची दूरदृष्टी आणि ग्रामस्थांच्या समर्पणातून हे यश मिळाल्याचे ग्रामविकास अधिकारी संजय यावले यांनी सांगितले. प्रास्ताविक संजय यावले यांनी केले. संचालन प्रा. दर्शन चांभारे यांनी तर आभार स्मिता काळबांडे यांनी मानले.

पीक विम्याचे निकष बदलून शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला

खा.अमर काळेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

सेलू/जनमाध्यम

एकीकडे दुष्काळाने शेतकरी उद्ध्वस्त, तर दुसरीकडे पीक विम्याच्या नव्या निकषांनी भरपाईवरच घाला! नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यानंतरही शेतकऱ्यांना पुरेशी भरपाई मिळत नसल्याचा मुद्दा खा.अमर काळे यांनी उपस्थित केला आहे. शेतकरीहिताला मारक ठरणारे पीक विम्याचे नवे निकष रद्द करून पूर्वीची नुकसानभरपाई पद्धत लागू करावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना ४ नोव्हेंबर रोजी पत्र पाठवून केली आहे.प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या नुकसानभरपाई गणनेत प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोग आणि तांत्रिक उत्पादनाचा प्रत्येकी ५० टक्के आधार घेतला जात आहे. यामुळे प्रत्यक्ष शेतातील नुकसान आणि विम्याच्या गणनेत मोठी तफावत निर्माण होत असल्याचे



काळे यांनी निदर्शनास आणले.

सेलू तालुक्यात सोयाबीनचे प्रत्यक्ष सरासरी उत्पादन हेक्टरी ३.५ क्विंटल असताना मागील पाच वर्षांची सरासरी उत्पादकता १५ क्विंटल आहे. एमआरएसएसीच्या उपग्रह प्रतिमांवर आधारित तांत्रिक उत्पादनामुळे प्रत्यक्ष नुकसानीचे प्रतिबिंब भरपाईत उमटत नसल्याचा आक्षेप त्यांनी घेतला आहे.सलग २१ दिवस पावसाचा खंड, प्रतिकूल हवामान आणि प्रतिबंधित पेरणीच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांना पुरेसा विमा मिळत नसल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. मागील वर्षीही अनेकांना अपेक्षेपेक्षा कमी भरपाई मिळाल्याचा दावा त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा आधार प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगच असावा आणि जुनी पद्धत पुन्हा लागू करावी, अशी मागणी काळे यांनी केली आहे. हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

जिल्हा बँकेच्या पुनरुज्जीवनासाठी पालकमंत्री भोयर सरसावले

मुंबई/वर्धा जनमाध्यम

आर्थिक अडचणींच्या गर्तेत सापडलेल्या वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पुन्हा उभारी देण्यासाठी पालकमंत्री तथा सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेतला आहे. बँकेच्या आर्थिक अडचणी, थकीत कर्जवसुली, शेतकऱ्यांना पीककर्ज, शासनाकडील प्रलंबित प्रस्ताव आणि कर्मचाऱ्यांची कमतरता अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर सोमवारी मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. बँकेचे आर्थिक व्यवहार वाढविण्यासाठी पूर्वीप्रमाणे शासकीय व्यवहार सुरू करणे, सोनेतारण कर्ज सुविधा उपलब्ध करणे आणि पतसंस्थांची खाती बँकेत उघडण्याबाबतही चर्चा झाली.

डॉ. भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहसचिव संतोष पाटील, सहकार आयुक्त दीपक चावरे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत



मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

३१ ऑक्टोबर २०२६ अखेरच्या बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात आला. बँकेच्या जिल्ह्यात नऊ शाखा असून केवळ ६७ कर्मचारी कार्यरत आहेत. आर्थिक व्यवहार, ठेवी, कर्जवाटप, गुंतवणूक, थकीत कर्ज आणि एनपीएचा प्रश्न यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. २०२६-२७ या आर्थिक वर्षात १ हजार २४० खात्यांसाठी ८ कोटी ५० लाख रुपयांचे पीककर्ज उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी ६४० खात्यांना ६ कोटी ४९ लाख २९ हजार रुपयांचे कर्जवाटप झाले आहे. शेतकऱ्यांना खरीप आणि रब्बी हंगामात वेळेत कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी बँकेच्या अडचणी दूर करण्यावर भर देण्यात आला. शेतकरी कर्जमाफी योजनांतील पात्र खात्यांची माहिती आणि प्रलंबित प्रस्तावांचाही आढावा घेण्यात आला.

शासकीय व्यवहार पुन्हा सुरू करण्याची मागणी

जिल्हा परिषद आणि शिक्षकांच्या वेतनासह विविध शासकीय व्यवहार राष्ट्रीयीकृत बँकांकडे वळविण्यात आल्याने जिल्हा बँकेच्या आर्थिक व्यवहारांवर परिणाम झाला आहे. हे व्यवहार पुन्हा जिल्हा बँकेकडे सुरू करण्याबाबत चर्चा झाली. डिजिटल आणि मोठ्या आर्थिक व्यवहारांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा आयएफएससी कोड वापरण्याची सुविधा, सोनेतारण कर्ज योजना, पतसंस्थांची खाती उघडणे तसेच नागपूर येथील सनदी लेखापालाकडून अंकेक्षण करण्याच्या विषयांवरही विचारविनिमय झाला.

३४ पदे रिक्त; मनुष्यबळाचा गंभीर प्रश्न

बँकेच्या मंजूर आकृतिबंधानुसार १०१ पदे असताना प्रत्यक्षात ६७ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे ३४ पदे रिक्त असल्याचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला. आयटी तंत्रज्ञ आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची भरती, संगणकीय प्रणालीचे अद्ययावतीकरण आणि सीबीएस प्रणालीतील अडचणींवरही चर्चा झाली. १५ आयटी तंत्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या भरतीचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

सहकारी साखर कारखाना, सूत गिरणी आणि महात्मा कागद कारखान्याशी संबंधित कर्जव्यवहार, थकहमीचे प्रस्ताव आणि थकीत रकमेच्या वसुलीचाही आढावा घेण्यात आला. बँकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणे आणि शेतकऱ्यांचा कर्जपुरवठा सुरळीत करणे, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.



फुले विचारांचा वारसा तरुणाईने पुढे न्यावा-पालकमंत्री

माळी वैभवतर्फे ७०गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

वर्धा/जनमाध्यम

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात तरुणाईने उच्च शिक्षणासोबत सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि विवेकही जोपासला पाहिजे. हातात आधुनिक तंत्रज्ञान असताना डोक्यात महात्मा फुले यांचे पुरोगामी विचार असणे ही काळाची गरज आहे. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा फुले विचारांचा वारसा नव्या पिढीने पुढे न्यावा, असे प्रतिपादन राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

श्री.माळी वैभवतर्फे सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालयात आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रा. धनंजय सोनटक्के होते. उद्घाटन आनंदवनचे विश्वस्त सुधाकरराव कडू यांच्या हस्ते झाले. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, विकास सावरकर, डॉ. सागर गौरकर, दीपक फुलकरी, विनय डहाके, सचिन होले, डॉ. कल्याणी धाकूलकर यांची उपस्थिती होती.माळी वैभव मासिकाच्या वतीने गेल्या १३ वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येतो. यंदा दहावी, बारावी, पदवी, अभियांत्रिकी, वैद्यकीय, वास्तुकला तसेच क्रीडा क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या ७० विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.प्रांजली गायकवाड आणि रिद्धी लेकुरवाळे यांनी क्रांतिगीत सादर केले. संचालन संदीप चिचाटे यांनी केले. प्रास्ताविक वासुदेव कडुकर यांनी, तर आभार डॉ. प्रा. संदीप काळे यांनी मानले.

संघर्षातून उभी राहिली श्रीमंती, संस्कारांतून जिवंत राहिली माणुसकी-सतीश चरखा

वर्धा/जनमाध्यम

धीरूभाई अंबानी यांच्या अफाट संपत्तीची चर्चा सर्वत्र होते; मात्र पेट्रोल पंपावरून सुरू झालेला त्यांचा संघर्ष आणि जिद्दीचा प्रवास फार कमी जण जाणून घेतात. यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या व्यक्तींच्या संघर्षातूनच खऱ्या प्रेरणेचा जन्म होतो, असे प्रतिपादन जळगाव येथील प्रसिद्ध प्रेरक वक्ते सतीश चरखा यांनी केले.

स्व. रतनलालजी केला आणि स्व. कमलादेवी केला यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त माहेश्वरी नवयुवक मंडळ वर्धा आणि केला परिवाराच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विचार पुष्प' कार्यक्रमात ते बोलत होते. स्व. रतनलालजी केला यांनी प्रत्येक संस्थेला आत्मनिर्भर बनविण्यासाठी योगदान दिले. त्यांनी संपत्तीसोबतच समाजाला शिक्षण आणि संस्कारांची




अनमोल शिदोरी दिली, असेही त्यांनी सांगितले.अमरावतीचे जेसीआय राष्ट्रीय प्रशिक्षक अनिल राठी यांनी मोबाईलच्या वाढत्या वापराबाबत चिंता व्यक्त केली. कुटुंबातील संवाद वाढविण्यासाठी दिवसातून किमान एक वेळचे जेवण संपूर्ण कुटुंबाने एकत्र घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अधिवक्ता परमानंद टावरी यांनी रतनलालजी केला यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, ऋषभ जाजू यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. सतीश चरखा यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमापूर्वी केला परिवारातर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. संचालन अधिवक्ता अर्णव केला व मनीषा टावरी यांनी केले. आभार अनिल केला यांनी मानले.

अडीच महिन्यांपासून पाण्यासाठी ग्रामस्थांची वणवण

प्रशासनाच्या उदासीनतेने तीन हजार नागरिकांची पाण्यासाठी फरफट

सेलू/जनमाध्यम

सेलू तालुक्यातील सुरगावमध्ये भीषण पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले असून, गेल्या अडीच महिन्यांपासून ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. तीन प्रभागांचा समावेश असलेल्या या गावात सुमारे तीन हजार लोकसंख्या तहानलेली असताना स्थानिक प्रशासनाकडून मात्र ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



नादुरुस्त हपश्या, आटलेल्या विहिरी आणि अपुरा नळपुरवठा यामुळे नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. गावातील प्रभाग क्रमांक एकमधील हपशी नादुरुस्त असून, अनंता पाटील यांच्या घराजवळील हपशीही गेल्या पंधरा दिवसांपासून बंद आहे. याबाबत ग्रामस्थांनी ग्रामसेवकांना दोन ते तीन वेळा तोंडी सूचना दिल्या. काल दोन्ही हपश्यांच्या दुरुस्तीबाबत लेखी तक्रारही करण्यात आली. मात्र, अद्याप दुरुस्ती झालेली नाही. ग्रामसेवकांच्या दुर्लक्षामुळे पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर झाल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.गावातील पाच सार्वजनिक विहिरींची पाणीपातळी कमालीची खालावली असून, जवळून वाहणारी सूर नदीही कोरडी पडली आहे. चार ते पाच दिवसांआड होणारा नळपुरवठा गरज भागविण्यास अपुरा ठरत आहे. त्यामुळे हेमंत दाते, अष्टेकर बाई आणि वानखेडे यांच्या खासगी विहिरींवर ग्रामस्थांना अवलंबून राहावे लागत आहे. काही नागरिकांना तर पाण्यासाठी दीड ते दोन किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, दुसरीकडे रस्त्यांवर पाण्याची नासाडी आणि वाहन धुणाऱ्या वॉशिंग सेंटरमधील पाण्याचा अमर्याद वापर सुरू असल्याचे चित्र आहे. पातळीवर कारवाई होत नसेल, तर पाणी बचतीचे नियम केवळ कागदावरच आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राष्ट्रीय शिशू सप्ताहाचे आयोजन

वर्धा/जनमाध्यम

जिल्ह्यात १५ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय नवजात शिशु सप्ताह साजरा करण्यात येत असून, नवजात बालकांचे आरोग्य, सुरक्षित संगोपन आणि निरोगी भविष्य सुनिश्चित करणे हा याचा मुख्य उद्देश आहे. विशेषतः अकाली जन्मलेली, कमी वजनाची तसेच विशेष नवजात शिशु काळजी कक्षात उपचार घेतलेली बालके यांच्या आरोग्यावर या सप्ताहात विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. 'लहान बाळे, मोठी क्षमता: त्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी पाठपुरावा सेवेत गुंतवणूक करा' अशी यावर्षीच्या सप्ताहाची संकल्पना आहे. नवजात बालकांच्या आयुष्यातील पहिले २८ दिवस अत्यंत महत्त्वाचे असून, या काळात बालकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे, वेळेवर तपासणी करणे, योग्य पोषण देणे आणि आजाराची लक्षणे वेळीच ओळखणे गरजेचे आहे. सप्ताहाच्या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबवून माता व कुटुंबीयांना स्तनपानाचे महत्त्व, कांगारू मदर केअर, बालकाचे योग्य पोषण, नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण, स्वच्छता, वाढ व विकासाचे निरीक्षण तसेच धोक्याची लक्षणे ओळखण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. जोखमीच्या बालकांना गृहभेटी देऊन तपासणी व संदर्भ सेवा दिली जात आहे. तसेच, अकाली व कमी वजनाच्या बालकांच्या दृष्टी, श्रवण क्षमता आणि शारीरिक व मानसिक विकासाचे वेळेवर मूल्यांकन करण्यावर प्राधान्य दिले जात आहे. जिल्ह्यातील सर्व माता-पित्यांनी या सप्ताहाच्या निमित्ताने आपल्या बालकांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, शासकीय आरोग्य संस्थेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी केले आहे.

अभिजितने कंपनीतील नोकरी सोडून रेशीम शेतीतून मिळविले लाखांचे उत्पन्न

संपूर्ण कुटुंबाच्या कष्टाने मजुरीचा खर्च वाचवला

आष्टी शहीद/जनमाध्यम

सध्या संपूर्ण भागात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पारंपरिक पिके पूर्णपणे हातची गेली असून बळीराजा कमालीचा हवालदिल झाला आहे. अशा या संकटसमयी आष्टी तालुक्यातील माणिकवाडा येथील एका सुशिक्षित तरुणाने मात्र रेशीम शेतीच्या जोरावर दुष्काळावर यशस्वी मात केली आहे. बीएससी शिक्षण घेतलेल्या अभिजित बन्नगरे या तरुणाने नागपूर येथील कंपनीतील नोकरी सोडून थेट गावाकडे धाव घेतली आणि आई लता दिलीप बन्नगरे यांच्या नावे असलेल्या शेतीत हा यशस्वी प्रयोग करुन तीन वर्षात लाखांचे उत्पन्न मिळविले.

दुष्काळासारख्या परिस्थितीत इतर पिके पूर्णपणे वाया जातात, मात्र रेशीम शेती ही अत्यंत कमी कालावधीत मोठे उत्पन्न देणारी एकमेव शेती आहे, असे अभिजित सांगतो. हवामानातील बदलामुळे एखादा बॅच वाया गेल्यास खचून न जाता अवघ्या दीड महिन्यात पुन्हा नवीन बॅच घेता येते. यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान



टळते. गणिताचा विद्यार्थी असलेल्या अभिजितने वडिलांच्या मार्गदर्शनाखाली आईच्या नावे शेती असलेल्या शेतीत योजनेचा लाभ घेत संपूर्ण कुटुंबाच्या साथीने श्रमाचे आणि व्यवस्थापनाचे अचूक गणित मांडले. यामुळेच ३ वर्षांत ९ लाख ७८ हजारांचा टप्पा पार करणे शक्य झाले. दुष्काळाच्या काळात जिथे जगणे कठीण झाले आहे, तिथे अभिजितने थेट नवीन कार खरेदी केल्याने, सुशिक्षित तरुणांनी स्वतः शेतात राबून आधुनिक तंत्रज्ञानाची आणि रेशीम विभागाच्या मार्गदर्शनाची जोड दिल्यास काय चमत्कार घडू शकतो, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

'रेशीम रक्षति रक्षितः' म्हणजेच आपण जर रेशीम शेतीची मनापासून काळजी घेतली तर हीच रेशीम शेती आपल्या संपूर्ण कुटुंबाचे आणि भविष्याचे रक्षण करते, हा माझा स्वतःचा अनुभव आहे. शहरात जाऊन तुटपुंज्या पगारावर दुसऱ्याची चाकरी करण्यापेक्षा सुशिक्षित तरुणांनी आपल्या हक्काच्या शेतीकडे वळले पाहिजे. शेतात स्वतः कष्ट करायची तयारी ठेवा. बाहेरच्या मजुरांवर अवलंबून न राहता संपूर्ण रेशीम शेती कुटुंबाने मिळून केली. आई, वडिलांच्या दूरदृष्टीमुळे आणि रेशीम विभागाच्या रेशीम विकास अधिकारी रजनी बन्सोड, तत्कालीन क्षेत्र सहायक भैरम, तसेच क्षेत्र सहायक शुभम ताकोते या सर्वांच्या वेळोवेळी मिळालेल्या मोलाच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे मी आज हे यश मिळवू शकलो. अपयशाची भीती न बाळगता तरुणांनी स्वतः शेतात काम करून नवनवीन प्रयोगांची कास धरली, तर शेतीमधूनही आलिशान कार घेण्याचे स्वप्न नक्कीच पूर्ण होऊ शकते! असे अभिजीत बन्नगरे यांनी सांगितले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३५०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

बालकाला रुग्णवाहिकेची धडक; प्रकृती गंभीर



अमरावती/प्रतिनिधीः- घरासमोरील रस्त्याने पायी जाणाऱ्या बालकाला भरधाव रुग्णवाहिकेने धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. अपघातात बालकाच्या डोक्याला आणि पायाला दुखापत झाली. धडकेनंतर बालक बेशुद्ध पडल्याने कुटुंबीयांची धावपळ उडाली. प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात आणि त्यानंतर खासगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार करण्यात आले. ही घटना ११ नोव्हेंबर रोजी सावर्डी रोडवर घडली होती. राजू बाबुलाल कठाणे (वय ४५, रा. सावर्डी, अमरावती) यांच्या पुतण्याला या अपघातात दुखापत झाली आहे. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास बालक घरासमोरून रस्त्याने पायी जात होते. त्याचवेळी भरधाव वेगाने आलेल्या रुग्णवाहिकेने त्याला धडक दिली. रुग्णवाहिकेच्या धडकेमुळे बालक रस्त्यावर कोसळले. त्याच्या डोक्याला आणि पायाला गंभीर मार लागला. अपघातानंतर बालक बेशुद्ध पडल्याने परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली.

त्यानंतर जखमी बालकाला तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. बालकाच्या प्रकृतीबाबत कुटुंबीय चिंतेत होते. दरम्यान, अपघात घडविणाऱ्या रुग्णवाहिकेच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अपघातानंतर पाच दिवसांनी, म्हणजेच १६ नोव्हेंबर रोजी राजू कठाणे यांनी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात रुग्णवाहिका चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. या अपघातात सहभागी असलेल्या रुग्णवाहिकेची आणि चालकाची माहिती मिळविण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे.

अमरावती शहर पोलीस दलातील १४ एएसआय झाले पीएसआय!

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते पदोन्नतीचा सन्मान



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील १४ सहायक पोलीस उपनिरीक्षकांना (एएसआय) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर पदोन्नती मिळाली आहे. या पदोन्नतीनिमित्त पोलीस आयुक्तालयात विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते पदोन्नत अधिकाऱ्यांच्या खांद्यावर पदचिन्ह लावून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अधिकाऱ्यांचे कुटुंबीयही उपस्थित होते. पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांमध्ये प्रशांत वडनेरकर (पोलीस मुख्यालय), रमेश थुबोकार (राजापेठ पोलीस ठाणे), सुनील विधाते (सिटी कोतवाली), अजय गाडेकर (सीएमसी), महेंद्र थोरात, महेंद्र सुरेकर व प्रवीण खैरकर (मोटार परिवहन विभाग), मारोती पांडे (खोलापुरी गेट), दिलीप सावरकर, संजय पिंगे व विनोद वाघमारे (पोलीस मुख्यालय), राजेश गुलालकरी (सीसीटीएनएस), रविंद्र पवार (बडनेरा) आणि संजय आवनकर (नियंत्रण कक्ष) यांचा समावेश आहे. पदोन्नतीमुळे अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढ झाली असून, नव्या पदावर काम करताना कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. तसेच आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्याकडून कार्यक्षमतेने काम करून घ्यावे, असे आवाहन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी केले. त्यांनी सर्व पदोन्नत अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या. या कार्यक्रमाला पोलीस उपायुक्त शाम घुगे, प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त दिलीप वडगावकर यांच्यासह पदोन्नत अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विधवा व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील २०० महिलांची आरोग्य तपासणी!

-औषधे, किराणा व कपड्यांचे वाटप



आसेगाव पूर्णा / प्रतिनिधीः- दिवाळीच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत भूमिपुत्र फाउंडेशन व आनंदीता मदर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ५ नोव्हेंबर रोजी निवासी मूकबधिर विद्यालय, टोंगलापूर फाटा (मासोद) येथे विधवा तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील सुमारे २०० महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधांचे वाटप करण्यात आले.

यावेळी गरजू विधवा महिलांना किराणा साहित्य व कपड्यांचे वाटप करून दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात महिलांमध्ये गर्भाशयाचा व स्तनांचा कर्करोग यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असून, वेळीच तपासणी व उपचार घेणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

डॉ. प्रतीक्षा सातपुते यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आनंदीता मदर्स असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. नयना कडू होत्या. यावेळी संस्थेच्या सचिव सुवर्णा जवंजाळ, डॉ. शिव ओम कुकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

लग्नाचे आश्वासन देत तरुणीचे लैंगिक शोषण

अमरावती/प्रतिनिधीः- लग्न करण्याचे आश्वासन देऊन एका व्यक्तीने तब्बल १३ वर्षांच्या कालावधीत एका महिलेचे वारंवार शारीरिक शोषण केले. महिलेच्या तक्रारीवरून मंगरूळ चव्हाळा पोलिसांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. प्रमोद रामदास सोळंके (वय ४४, रा. ता. नांदगाव खंडेश्वर) असे आरोपीचे नाव आहे.

तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तीने लग्न करण्याचे आश्वासन देत २०१३ पासून एका महिलेशी वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले.

हा प्रकार अनेक वर्षे सुरू राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. परंतु आता आरोपीने लग्नास नकार दिला. त्यामुळे महिलेने पोलिस ठाण्यात धाव घेतली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

आरपीएफ जवानांच्या तत्परतेने महिलेला मिळाले दागिने व साहित्य

दिवाळीच्या गर्दीत जनरल डब्यात शोधली बॅग

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- रेल्वे प्रवासादरम्यान विसरलेली मौल्यवान वस्तू परत मिळणे प्रवाशांसाठी मोठा दिलासा ठरतो. असाच अनुभव धामणगाव रेल्वे स्थानकावरील एका महिला प्रवाशाला आला. दिवाळीच्या काळात रेल्वेगाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असतानाही आरपीएफ जवानांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे महिलेला २ लाख २४ हजार रुपये किमतीचे दागिने, रोख रक्कम आणि अन्य साहित्य असलेली बॅग सुखरूप परत मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ नोव्हेंबर रोजी संबंधित महिला धामणगाव रेल्वे येथील आरपीएफ ठाण्यात पोहोचली. ती अमरावती-जबलपूर एक्स्प्रेसने (गाडी क्रमांक १२१५९) अमरावतीहून धामणगाव रेल्वेकडे प्रवास करीत होती. धामणगाव स्थानकावर उतरताना गाडीच्या मागील बाजूच्या जनरल डब्यात तिची जांभळ्या रंगाची बॅग विसरली. या बॅगेत सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल आणि अन्य मौल्यवान वस्तू होत्या. महिलेची तक्रार मिळताच पोलीस जमादार संजय खंडारे यांनी एएसआय शशिकांत गजभिये आणि संजय बोरुडे यांना माहिती दिली. दोन्ही जवानांनी तातडीने संबंधित रेल्वेगाडीच्या जनरल डब्यात चढून बॅगेचा शोध सुरू केला. दिवाळीमुळे डब्यात प्रवाशांची मोठी गर्दी असल्याने शोधकार्यात अडथळे येत होते. मात्र, जवानांनी हार न मानता वर्धा रेल्वे स्थानकापर्यंत शोध सुरू ठेवला. अखेर त्यांना महिलेची हरवलेली बॅग शोधण्यात यश आले. बॅग मिळाल्यानंतर आरपीएफ जवानांनी व्हिडीओ कॉलद्वारे संबंधित महिलेला बॅग मिळाल्याची खात्री करून दिली. त्यानंतर बॅग सुरक्षितपणे धामणगाव रेल्वे स्थानकावर आणण्यात आली. तक्रारदार महिला आणि पंचांच्या उपस्थितीत बॅग उघडून त्यातील साहित्याची तपासणी करण्यात आली. बॅगेमध्ये सोन्याच्या तीन अंगठ्या, सोन्याची एक नथ, चांदीच्या पायजणांची एक जोडी, सात हजार रुपये रोख, मोबाईल, चार्जर, कपडे आणि अन्य आवश्यक साहित्य आढळून आले. या सर्व वस्तूंची एकूण किंमत सुमारे २ लाख २४ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. आरपीएफ जवानांच्या कर्तव्यदक्षतेमुळे महिलेचे मौल्यवान साहित्य सुरक्षित परत मिळाल्याने तिने जवानांचे आभार मानले.

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट शामनगर, अमरावती

(रजि. नं. ई- २७५ अम. महाराष्ट्र)

(महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग व्दारे बौध्द धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था)

नियुक्तीकरीता जाहीरात

भारतीय संविधानातील कलम ३० (१) व महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १३ जुलै, २०१६ व दिनांक १० जून, २०२२ च्या शासन निर्णयानुसार **श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट शामनगर, अमरावती (रजि.नं. ई-२७५ अम. महाराष्ट्र)** धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थेव्दारा संचालित अंशतः **अनुदानीत व १०० टक्के अनुदानीत** विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेले खालील नमुद पदे भरावयाचे आहे.

अ. क्र.	पदाचे नाव	शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता	पद संख्या	अध्यापनाचे ठिकाण	रिक्त होण्याचे कारण
१	शिक्षण सेवक (वर्ग ११ ते १२ वी)	एम.ए.(मराठी) एम.ए. (सहकार) व्दितीय श्रेणी बी.एड.	०१	मातोश्री रमाबाई आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, शामनगर, अमरावती	सेवा निवृत्तीमुळे
२	शिक्षण सेवक (वर्ग ११ ते १२ वी)	एम.ए. (इग्रजी) एम.ए. (अर्थशास्त्र) व्दितीय श्रेणी बी. एड.	०१	मातोश्री रमाबाई आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, शामनगर, अमरावती	सेवा निवृत्तीमुळे
३	शिक्षण सेवक (वर्ग ११ ते १२ वी)	एम.ए. (इग्रजी) एम.ए.(समाजशास्त्र) व्दितीय श्रेणी बी. एड.	०१	महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय, विहिगांव, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती	सेवा निवृत्तीमुळे
४	शिक्षण सेवक (वर्ग ६ ते ८ वी)	बी.एस.सी. (विज्ञान) बी.एड. (टी.ई.टी./सी.टी.ई.टी)	०१	डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, फ्रेजरपुरा, अमरावती	सेवा निवृत्तीमुळे
५	शिक्षण सेवक (वर्ग ६ ते ७ वी)	बी.ए.बी.एड. (टी.ई.टी./सी.टी.ई.टी)	०१	मातोश्री गंगादेवी लुहा विद्यालय, गौरखेडा (कुंभी), ता. अचलपूर, जि.अमरावती	निधनामुळे (अंशतः अनुदानीत)
६	कनिष्ठ लिपीक शिक्षण सेवक	बी.ए./बी.कॉम. (इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि. टायपिंग) व एम.एस.सी.आय.टी.	०२	मदन महाराज विद्यालय व कमलदिप कनिष्ठ महाविद्यालय, फुलआमला, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती	सेवा निवृत्तीमुळे
				मातोश्री गंगादेवी लुहा विद्यालय, गौरखेडा (कुंभी), ता. अचलपूर, जि.अमरावती	सेवा निवृत्तीमुळे

(१) संस्था बौध्द धार्मिक अल्पसंख्याक असल्यामुळे शासन नियमांच्या अधिन राहुन पदे भरण्यात येईल.
(२) वरील सर्व पदांच्या नियुक्तीस मा. शिक्षण उपसंचालक, अमरावती / मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) अमरावती यांची मान्यतेची अट राहील.
(३) उमेदवारास सबंधीत विषयामधील पदवीस ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे.
(४) वयोमर्यादा शासन नियमानुसार शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे राहील.
(५) मानधन / वेतनश्रेणी शासकीय नियमानुसार राहील.

करीता वरिल इच्छुक उमेदवारांनी आपले स्व-लिखित अर्ज शैक्षणिक प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रतिसह संस्थेचे कार्यालय, **श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, तक्षशिला महाविद्यालय शामनगर, अमरावती-४४६०७६ येथे गुरुवार दि.०५/१२/२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

टिप - संस्था बौध्द धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असल्यामुळे बिंदु नामावली लागू नाही.

अध्यक्ष
श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती

Government of Maharashtra
REGIONAL REFERRAL SERVICES HOSPITAL, AMRAVATI
NOTICE FOR E-TENDER
(Purchase/Refilling of LMO, Medical Gas, Oxygen, Nitrous Oxide, CO_2, PESO Licence and AMC etc.)

Regional Referral Services, Hospital, Amravati are invites online E-Tender for the period 2026-27 in two envelope system from the Primary Manufacturers or Distributors for purchase/ **Regilling of Medical Oxygen, Liquid Oxygen, Nitrous Oxide, I.P.grade and CO2, AMC, PESO licence et.**

Sr. No.	Description	E-Tender No.	Tender Fee (Rs.)	EMD Amt. (Rs.)
1.	Refilling of LMO, Medical Gas, Oxygen, Nitrous Oxide I.P. GRADE, CO2, PESO Licence and AMC etc.	E-19/RRSH/Medical Gas/2026-27	10,000	1,00,000

Interested eligible Tenderers may obtain further informationof technical specifications, required quantities and other terms and conditions applicable for procurement of above items from the tendering web site https://mahatenders.gov.in.

TENDER SCHEDULE

All bid related activities (Process) like Tender Document Download, Bid Preparation and Hash submission, bid submission and submission of EMF and other document will be governed by the time schedule given under Key Dates below :

Date of commencement of sale of Tender document/Download	:	18/11/2026
Pre bid meeting	:	23/11/2026 at 15.00 Hrs.
Last date for sale of tender document	:	01/12/2026
Closing of Bid (By Department)	:	01/12/2026 at 17.00 Hrs.
Last date and time for submission of tender	:	01/12/2026 at 17.00 Hrs.
Date and time of opening of Envelope No.1	:	02/12/2026 at 17.05 Hrs.
Address for communication	:	Office of the Medical Superintendent Regional Referal Services, Hospital Amravati, Dist. Amravati (M.S.) Pin Code-444601

Medical Superintendent
Referal Services, Hospital
Amravati

(जि.मा.का./अम/जाही/६३७/२०२६-२०२७)

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज क्र.२१९०/२०२६
Saroj Dashrath Wankhade + 2 Versus NIL
पुढील ता.०१.१२.२०२६

Applicants :-
1. **Saroj Dashrath Wankhade,** Aged about 46 yrs. Occ.- Household
2. **Sanket Dashrath Wankhade,** Aged about 25 yrs. Occ.- Education
   All R/o. Mahadevkhori Road, Diksha Dukan, Greter Kailash Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. **Nandini Dashrath Wankhade,** Aged about 20 yrs. Occ.- Education
   R/o. Water Tank, Panchasheel Nagar, Wadarpura, Amravati, Tq. & dist. Amravati

----Versus ---

Non- Applicant :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Dashrath Gowardhan Wankhade** हे दिनांक **०३.०७.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले.**Saroj Dashrath Wankhade + 2 Versus Nil** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Saroj Dashrath Wankhade + 2 Versus Nil** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१७.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

सायटेशन/जाहीरनामा
विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.६७६/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार -
१. **श्री उत्तमराव विठठलराव मडीकर**, वय ५४ वर्षे, धंदा - मजुरी
२. **श्री देवानंद विठठलराव मडीकर**, वय ५० वर्षे, धंदा - मजुरी
३. **श्री विजय विठठलराव मडीकर**, वय ४९ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.सालबर्डी, पो.पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांची आई नामे **जिजाबाई विठठलराव मडीकर** ही **दिनांक २८/०४/२०२५** रोजी **Pala,Tq. Morshi, Dist. Amravati** येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरित अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०२/११/२०२६

आदेशानुसार,
शिक्का **(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

नगर परिषद कार्यालय, अचलपूर
जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **रजनी गणेशराव राऊत**, पत्ता **जिवनपुरा, दानाखोरी**, यांनी अचलपूर नगर परिषदेच्या **वार्ड क्र.२०** संगणक मालमत्ता क्र.**ACHA0000/2781** जुना मालमत्ता क्र. **२०००००७५२** नझुल शिट क्र.**३६-ए** प्लॉट नं.**१/१** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **हर्षल सुरेश काळे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **रजनी गणेशराव राऊत** या नावाने (फेरफार घेण्याकरिता /नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरिता, खरेदी, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाव्दारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१७.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे.याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - गणपतराव काळे यांचे घर
पश्चिमेस - बोळ
दक्षिणेस - रस्ता
उत्तरेस - यातील उर्वरित भाग

शिक्का
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

नगर परिषद कार्यालय, अचलपूर
जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **सोनल अतुल दरवणे+१**, पत्ता **समरसपुरा, अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या **वार्ड क्र.२६** संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/24514** जुना मालमत्ता क्र. **२६०००२२२** नझुल शिट क्र.**१४-बी** प्लॉट नं.**१६३** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **रमेश विश्वनाथराव केवाळे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **सोनल अतुल दखणे/स्वाती राजेश रोडगे** या नावाने (फेरफार घेण्याकरिता /नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये/क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरिता,खरेदी,मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाव्दारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१७.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे.याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - ढगणगणे व भागवत यांचे घर
पश्चिमेस - गायछाप सोसायटी
दक्षिणेस - भागवंत यांचे घर
उत्तरेस - रस्ता

शिक्का
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

जाहीरनामा/सायटेशन नोटीस
वि.एस.एस.भिंगारदेव, ०७ न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०७)

कि.कि.अर्ज क्रमांक १२३८/२०२६

अर्जदार : मृण्मयी प्रवीण मानकर
वय १४ वर्षे,
रा.पुणे तर्फे अज्ञान पालनकर्ती वैशाली निशांत व्याघ्रांबरे,
रा.दत्त मंदिराजवळ, कुंभारवाडा, अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०७ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार यांची मुलगी हिचा जन्म दिनांक २९.०७.२००० राजी झाला आहे. अशी नोंद धरणेचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १५.१२.२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०७ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का
आदेशानुसार
कनिष्ठ लिपीक
०७ वे न्यायालय, कनिष्ठ स्तर,
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२७५/२०२६
प्रगती अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.०१.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Pragati Anilrao Narale, Age 46 Yrs. Occu.: Pvt.Job.
2. Yash Anilrao Narale, Age 23 Yrs. Occu.: Pvt. Job
3. Deep Anilrao Narale, Age 17 Yrs. Occu.: Education
4. Suman Ganpatrao Narale, Age 78 Yrs. Occu.: Household
   R/o Behind Sutgirni, Kailash Nagar, Sai Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Anil Ganpatrao Narale हे दिनांक 23.05.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Pragati Anilrao Narale + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Pragati Anilrao Narale + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०२८/२०२६
आशिष अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२१.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Ashish Babarao Akolkar, Age 48 Yrs. Occu.: Labour
2. Manoj Babarao Akolkar, Age 46 Yrs. Occu.: Labour
   Both R/o Galli No.5, Kalyan Nagar, Amrvati.
3. Sau.Kanchan Trishul Bobade, Age 41 Yrs. Occu.: Household
   R/o Near S.S.D.Bungalow, Amrut Vishav Vasahat, Arjun Nagar Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Pratibha Babarao Akolkar हे दिनांक 24.03.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Ashish Babarao Akolkar + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Ashish Babarao Akolkar + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ७५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अग्रीम मदत व नवीन पीककर्जासाठी अचलपूर काँग्रेस आक्रमक; उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजारांची मदत जमा करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

अचलपूर/वार्ताहर

राज्य शासनाने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत आणि कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही नवीन कर्जापासून वंचित असलेल्या बळीराजाच्या प्रश्नावर अचलपूर काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला आहे. अचलपूर शहर व ग्रामीण काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस तसेच पक्षाच्या सर्व सेलच्या वतीने अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना यासंदर्भात निवेदन सादर केले.आणि शेतकऱ्यांचे प्रश्न तात्काळ निकाली काढण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपयांचे अग्रीम अनुदान मंजूर केले आहे. मात्र, प्रशासकीय दिरंगाईमुळे अद्यापही असंख्य शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा झालेली नाही. ही मदत विनाअट आणि तातडीने वितरित करण्यात यावी, अशी आग्रही मागणी काँग्रेस पक्ष अचलपूर तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.तसेच, कर्जमाफीच्या पात्रता यादीत नाव समाविष्ट असूनही बँकांकडून 'खाते बंद (क्लोज)' असल्याची तांत्रिक कारणे पुढे करून वेळकाढूपणा केला जात असल्याचा मुद्दा ही मांडण्यात आला आहे. या प्रकारामुळे गरजू शेतकऱ्यांना आगामी हंगामासाठी नवीन पीककर्ज मिळणे कठीण झाले असून,बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. या सर्व प्रकरणांची त्वरित दखल घेऊन संबंधित शेतकऱ्यांना तात्काळ नवीन कर्ज उपलब्ध करून द्यावे,असे निवेदनात नमूद केले आहे.

हे निवेदन सादर करताना तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नामदेव तनपुरे, शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे, तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत गोरले,अमोल चिमोटे,सुनील तायडे,विशाल खानझोडे,अंकीत रोगे, विजय शिरसुध्दे, सुनील थोरात,ओम घोरे,मंगेश अतकरे,प्रमोद कांबळे,प्रदिप शेंद्रे,सुधीर वानखडे,जय घोरे,मंगेश आगाशे,प्रवीण हुड,अनिल इंगळे,संजय मसुद,दिनकर वंजारी बळीराम सपाटे ज्ञानेश्वर आगाशे,अशोक वंजारी,पंजाब मोहरे, बळीराम महाजन ,मंगेश झोड सह पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

संक्षिप्त

सार्वजनिक वाचनालयात भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी




तिवसा - येथील श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी वाचनालयातील वाचक आणि नागरिकांनी त्यांच्या देशासाठी दिलेल्या योगदानाचे व क्रांतिकारी कार्याचे स्मरण केले.या कार्यक्रमास सुमित अनासाने,दिपक धानोरकर,कुणाल गौरखेडे,ईश्वरी नेहारे, प्रतीक्षा रामटेके,उत्कर्षा रामटेके,रोशन डगवार,निलेश गावंडे,राहुल धडांगे यांच्यासह वाचनालयाचा वाचक वर्ग आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तायक्वांडो (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती - विवेकानंद ग्लोबल युनिव्हर्सिटी, जयपूर (राजस्थान) येथे ०१ ते ०५ डिसेंबर, २०२६ दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांडो (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा दीपेंद्रसिंह बिस्त, आदित्य पाटील,सुनिल,आकाश कांबळे, रायश्री कदमांची व समिर सैफी, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी महाविद्यालय, शेंदुरजना घाटचा साहिल सिंह, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मनिष चेत्तरी, कामेश थापा व यश कछवाह, पी.आर. पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट,अमरावतीचा प्रणव जाधव व महेश जाधव, एस.एन. आर्ट्स् ॲन्ड यू.के.कॉमर्स महाविद्यालय,अकोलाचा अश्विन डाखोरे, फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसदचा विधान आडे आणि नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंतचा जईद शाह याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे १९ ते २८ नोव्हेंबर,दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

पलवीतचे 'कच्चा पापड, पक्का पापड' स्पर्धेत यश



चांदुर रेल्वे - गोव्याच्या निसर्गरम्य भूमीत पणजी येथील क्रूझवर आयोजित करण्यात आलेल्या 'कच्चा पापड, पक्का पापड' या मनोरंजक स्पर्धेत पलवीतने उत्कृष्ट कामगिरी करत बक्षीस पटकावले. आपल्या कौशल्याच्या जोरावर स्पर्धेत यश मिळवत पलवीतने कुटुंबाचा अभिमान उंचावला आहे.या स्पर्धेत पलवीतने उत्साहाने सहभाग नोंदवत आपली चमक दाखवली. त्याच्या या यशामुळे कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पलवीतच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून,त्याने भविष्यातही अशाच प्रकारे विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन यशाची नवनवीन शिखरे गाठावीत, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

सैय्यद रफिक (बेकरीवाले) यांचे निधन



कुऱ्हा - येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सैय्यद रफिक सैय्यद नुर (बेकरीवाले) यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी चार मुलं, तीन मुली, स्नुषा,जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.सैय्यद रफिक यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील गावकरी व नातेवाईक उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

मेळघाटातील भोंगडू (मूंगरू) बाजारात पोलिसांकडून जनजागृता

ऑपरेशन कवचला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मेळघाट/वार्ताहर

येथील परिसरात दिवाळी सणानंतर भरणाऱ्या भोंगडू (मूंगरू) बाजाराला आदिवासी समाजबांधवांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात विशेष महत्त्व आहे. दिवाळीनिमित्त बाहेरगावी रोजगारासाठी गेलेले आदिवासी बांधव आपल्या मूळ गावी परततात. यानंतर परिसरातील आठवडी बाजारांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या बाजारांमध्ये पारंपरिक आदिवासी नृत्य, सांस्कृतिक देखावे, खरेदी-विक्री तसेच वधू-वर परिचयाचे कार्यक्रमही पार पडतात.

मात्र, कायद्याविषयी असलेल्या अज्ञानामुळे काही ठिकाणी अल्पवयीन मुला-मुलींचे पळून जाणे तसेच बालविवाहासारखे प्रकार घडण्याची शक्यता लक्षात घेता अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक निर्गतन कदम यांच्या आदेशानुसार धारणी पोलीस प्रशासनाने भोंगडू बाजाराच्या ठिकाणी विशेष पोलीस बंदोबस्तासह जनजागृती मोहीम राबविली.

ऑपरेशन कवच अंतर्गत धारणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टिटंबा व कळमखार येथे १० नोव्हेंबर, हरिसाल व सुसर्दा येथे ११ नोव्हेंबर, धारणी येथे १३ नोव्हेंबर, बिजुधावडी व बैरागड येथे १६ नोव्हेंबर, तर राणीगाव येथे १७ नोव्हेंबर रोजी भोंगडू (मूंगरू) बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.या सर्व बाजारांच्या ठिकाणी पोलीस प्रशासनाच्या वतीने विशेष स्टॉल उभारण्यात आले होते.

या जनजागृती मोहिमेदरम्यान दारू पिऊन वाहन न चालविणे, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करणे, अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) २०१२ तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ मधील कायदेशीर तरतुदी आणि उल्लंघन केल्यास होणाऱ्या परिणामांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.या मोहिमेला हरिसाल, टिटंबा, कळमखार, धारणी, राणीगाव, बिजुधावडी, बैरागड व सुसर्दा या आठ गावांतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पोलीस प्रशासनाच्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.ही मोहीम अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निर्गतन कदम,अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यामध्ये पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, सलीम चव्हाण, संध्या चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक विशाल राठोड,नारायण धांडे, शंकरलाल कास्देकर, प्रकाश गिरडकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल सतीश राठोड, गणेश घुले, सुमित सुरजुसे, अनिल बेलसरे, मनोज लढे यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सक्रिय सहभाग नोंदविला.भोंगडू बाजाराच्या पारंपरिक उत्साहाला बाधा न आणता आदिवासी बांधवांमध्ये कायदेविषयक जागृती निर्माण करण्याचा धारणी पोलिसांचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे.

धामणगाव रेल्वेत आज काँग्रेसचे भव्य शक्तिप्रदर्शन

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह दिग्गज नेत्यांची उपस्थिती

धामणगाव रेल्वे/वार्ताहर

धामणगाव रेल्वे विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आज,१८ नोव्हेंबर रोजी धामणगाव रेल्वे येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा होत असून, काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांची उपस्थिती या मेळाव्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रभारी सिरिवेल्ला प्रसाद यांच्या हस्ते होणार आहे.या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती म्हणून खा.बळवंत वानखडे, माजी मंत्री ॲड.यशोमती ठाकूर, माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख, अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष आनिरुद्ध उर्फ बाबासाहेब भाऊ देशमुख तसेच धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रा.वीरेंद्रभाऊ जगताप उपस्थित राहणार आहेत.



या मेळाव्याच्या निमित्ताने धामणगाव रेल्वे शहरासह संपूर्ण विधानसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विविध राजकीय पक्षांतील किती पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक काँग्रेसमध्ये प्रवेश करणार, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.कोणत्या पक्षाला किती मोठा राजकीय धक्का बसणार? कोणते प्रमुख राजकीय चेहरे काँग्रेसचा हात हातात घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.गेल्या काही दिवसांपासून मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, स्थानिक राजकीय समीकरणे आणि आगामी राजकीय वाटचालीच्या पार्श्वभूमीवर या मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह राज्य व जिल्हा पातळीवरील प्रमुख नेत्यांची उपस्थिती आणि संभाव्य पक्षप्रवेश यामुळे हा मेळावा काँग्रेससाठी शक्तिप्रदर्शनाची मोठी संधी मानला जात आहे.आजच्या मेळाव्यात कोणाची ताकद वाढणार आणि कोणाच्या राजकीय गणितांना धक्का बसणार, याचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे संपूर्ण धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे लक्ष या काँग्रेस मेळाव्याकडे लागले आहे.

कठोर प्रशिक्षण नियमांमुळे शिक्षकांची कोंडी

चार हजारांहून अधिक शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित

अमरावती/का.प्र.

वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी लागू करण्यात आलेल्या कठोर नियमांमुळे राज्यातील शिक्षकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. दर तासाला ऑनलाइन उपस्थिती नोंदविण्याच्या सक्तीमुळे चार हजारांहून अधिक शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. तसेच कौटुंबिक अडचणी आणि आपत्कालीन परिस्थितीतही उपस्थितीची अट कायम ठेवल्याने शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.हे प्रशिक्षण १३नोव्हेंबर पासुन सुरु झाले आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने या प्रकरणाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील एका शिक्षिकेच्या आईचे निधन झाल्यानंतर उत्तरकार्य व दशक्रियेसाठी दोन दिवसांची रजा मागण्यात आली होती. याबाबत पूर्वसूचनाही देण्यात आली होती. मात्र, दोन दिवस अनुपस्थित राहिल्याने संबंधित शिक्षिकेचे नाव उपस्थितीपत्रकातून वगळून त्यांना प्रशिक्षणातून बाद करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. परिणामी, त्यांना नव्याने शुल्क भरून प्रशिक्षणासाठी नोंदणी करावी लागणार आहे.

दरम्यान, प्रशिक्षणासाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक शिक्षकांना ऑनलाइन उपस्थिती नोंदविताना अडचणी येत आहेत. दर तासाला उपस्थितीची नोंद करण्याच्या अट्टाहासामुळे शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण करणे कठीण जात आहे. त्यामुळे उपस्थितीची अट शिथिल करून पूर्वीप्रमाणे ऑनलाइन प्रशिक्षण पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आमदार विक्रम वसंतराव काळे यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे (एससीईआरटी) केली आहे.या संदर्भात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी १६ नोव्हेंबर रोजी शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन दिले आहे.



शिक्षक संघटनेची मागणी

अपवादात्मक परिस्थितीत शिक्षकांना उपस्थितीतून सूट द्यावी, कौटुंबिक अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा आणि प्रशिक्षणाचे नियम अधिक लवचिक करावेत, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे. प्रशिक्षणाचा उद्देश शिक्षकांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे हा असताना जाचक नियमांमुळे त्यांनाच अडचणीत आणू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विदर्भातील बहिरम यात्रेला २० डिसेंबर पासून होणार प्रारंभ

अचलपूर/वार्ताहर

सध्या विदर्भात ऋणमोचन आणि बहिरम येथील यात्रेला २० डिसेंबर पासून सुरू होणार आहे. विशेष म्हणजे बहिरमच्या यात्रेला लोकसंस्कृतीत वेगळे महत्त्व आहे. ही यात्रा दीड महिन्यांची असते. आणि ही परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे. काहींच्या मते ती हजारो वर्षांपासून भरत आहे.

यात्रा किंवा जत्रा ही विविध प्रदेशाच्या संस्कृतीचा एक भाग राहिली आहे. प्रत्येक प्रदेशागणिक यात्रांचे स्वरूप, महत्त्व आणि थाटमाट वेगवेगळा आहे. त्या-त्या भागातील धार्मिक व हंगामानुसार या यात्रांचा काळ ठरलेला असतो. प्रत्येक भागातील यात्रेच्या पद्धती निरनिराळ्या असल्या तरी भाव-भक्ती एकसारखीच असते. प्रत्येक यात्रेत-जत्रेत भरपूर मनोरंजन,मिठाई,खेळण्याची



दुकाने,भिंगरीवाले, आकाश पाळणेवाले बघायला मिळतात; परंतु प्रत्येक ठिकाणचे एक खास महत्त्वही असते. पश्चिम महाराष्ट्रात खंडोबारायाच्या उत्सवात भंडाऱ्याची उधळण तर सातारा जिल्ह्यातील मांढरदेव येथील काळुबाईची यात्रा सर्विकडे प्रसिद्ध आहे आणि विदर्भात ऋणमोचन आणि बहिरम येथील यात्रेला २० डिसेंबर पासून सुरू होणार आहेत. त्यातही बहिरमच्या यात्रेला लोकसंस्कृतीत वेगळे महत्त्व आहे. देवदेवतांच्या नावाने केलेले नवस फेडण्यासाठी वा जलसे, तमाशा, कुस्त्या, लोककला यांच्यात मन रमवून घेण्यासाठी पाच-सात दिवस भरणाऱ्या यात्रा अनेक ठिकाणी आहेत. परंतु बहिरमची यात्रा दीड महिन्यांची असते आणि ही परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे.

बहिरमची यात्रा साधारण ३५० वर्षांहून अधिक काळापासून भरते. काहींच्या मते ती हजारो वर्षांपासून भरत आहे. सातपुड्याच्या कुशीत वसलेले 'बहिरम बुवा' हे लोकदैवत आहे. या ठिकाणाबाबत एक आख्यायिकाही आहे. शंकर-पार्वती प्रवास करीत असताना एकदा या ठिकाणी थांबले होते. त्यावेळी निसर्गकुशीतील हे ठिकाण पार्वतीला आवडले.पार्वतीने शंकराला येथे दरवर्षी येण्याची गळ घातली.त्यावर शंकराने माझा एक अंश नेहमीसाठीच या ठिकाणी ठेवतो,असे सांगितले. शंकराचे रुद्ररूप असलेले हे ठिकाण 'भैरवाचे ठिकाण' म्हणून ओळखले जाऊ लागले. भैरवाचा अपभ्रंश होऊन कालांतराने हे 'बहिरम' नावाने ओळखले जाऊ लागले.



या ठिकाणी शिव-पार्वतीने तीन दिवसांचा मुक्काम केला होता.त्यामुळे त्यांच्या स्नानासाठी दैवीशक्तीने खास काशीचे पाणी आणण्यात आले. त्या पाण्याचा इथला काशीतलाव प्रसिद्ध आहे.

बहिरम बुवाचे मंदिर जवळपास १२५ फूट उंचीवर आहे. त्याच्या शेजारी गणेशाची आठ ते दहा फूट उंच सुंदर मूर्ती आहे. मंदिराच्या बाहेर दगडाचा नंदी आहे. दोन-अडीच एकराच्या परिघात हा मंदिर परिसर आहे. त्यानंतरच्या खालच्या बाजूस सुमारे १०० एकरांत यात्रा भरते. बहिरमबुवाची सध्याची मूर्ती भव्य दिसत असली, तरी पायथ्याशी एक दगडाचा चौथरा आहे. त्याखाली भैरव घोड्यावर बसलेले असल्याचे मानले जाते. आधी एका सुपारीएवढा देव तयार करण्यात आला होता. त्यावर शेंदूर, लोणी लावण्यात येत होते. शेंदूर, लोणी, दूध, तुपामुळे पुढे मोठी मूर्ती तयार झाल्याचेही काहीजण सांगतात. येथे नवस फेडण्यासाठी अनेक प्रदेशांतून लोक येतात. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी परिसरातील महिला येथे पूजेसाठी येतात. गुळ, फुटाणे, रेवड्या हा या देवाचा मुख्य प्रसाद आहे. पूर्वी येथील यात्रा नागदिवाळीपासून सुरू होत असे. कालांतराने त्यात बदल होत गेला. आता सरकारी आदेशानुसार २० डिसेंबर ते ३१ जानेवारी या काळात ही यात्रा भरते.या यात्रेच्या स्वरूपात काळानुरूप बदल झाला आहे. पूर्वी सरदार मंडळी आपापल्या शक्तीचे प्रदर्शन करीत होते. घोडे-सैनिकांसह राहुट्या टाकलेल्या असत. त्यानंतरच्या काळात गावोगावचे श्रीमंत, प्रतिष्ठित नागरिक राहुट्या, तंबू, डेरे टाकून येथे मुक्काम करीत असत.मोठ्या जेवणावळी उठत. त्यात खास मातीच्या भांड्यांमध्ये शिजवलेल मटण हा महत्त्वाचा 'मेन्यू' असे. या जेवणावळीत निमंत्रणाची गरज राहायची नाही. देवाला नवस केल्याप्रमाणे शाकाहारी जेवणावळीही उठायच्या.

यात्रेचा हंगाम म्हणजे, शेतीच्या उत्पन्नाचे पैसे मिळणे सुरू होण्याचा काळ. त्यामुळे या यात्रेत आर्थिक उलाढालही मोठ्या प्रमाणात होते. पूर्वी बंड्या (बैलगाडी),दमणी, छकडे, रेंगी, शेतीची विविध औजारे, बैलबाजार, दोर अशा शेतीशी संबंधित वस्तूंची मोठी विक्री होत असे.ठिकठिकाणच्या प्रसिद्ध तयार वस्तू विक्रीसाठी येत असत. मातीची भांडी,लाकूड,बांबूच्या वस्तूंची विक्री होई. करमणुकीसाठी दंढार भरत असे. त्यानंतर तमाशांची फड रंगू लागले. परंतु कालांतराने त्यात व्हाईट प्रवृत्ती शिरल्या. लोकांदोलनानंतर तमाशे बंद झाले.आता लोककला, बाळमेळावा, शेतकरी जागृती, कृषिविषयक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.यात्रा दीर्घकाळ चालत असल्याने पूर्वीच्या सरदारांनंतर इंग्रजांचे तालुका मामलेदार यात्राकाळात तेथेच तळ ठोकून बसत होते. अमरावती जिल्हा परिषदेच्यावतीने येथे आता कृषिविषयक प्रदर्शन भरविले जाते. यात्रेतून प्रबोधनाचाही प्रयत्न केला जात आहे. यात्राकाळात एका रविवारी येथे लाख-दोन लाख भाविकांची सहज गर्दी होते. गावसंस्कृतीपासून दुरावलेले शहरी भागातील अनेकजण यात्रेला आवर्जून येतात. तंबू, राहुट्यांमध्ये मुक्काम करत येथील जेवणाची लज्जत घेतात. यात्रेत खरेदी करतात. पुढील पिढीला यात्रा कशी असते हे दाखवतात आणि परतात.३१ जानेवारी रोजी बहिरमची यात्रा संपते. पाल, तंबू, राहुट्या पडतात, त्या पुढील वर्षी परत येण्याचे वचन देतातच.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मटण पार्टीचे ड्रोन शूटिंग करणा-यावर धारदार शस्त्राने हल्ला

पाच ते सहा जणांचा हल्ला, रमाकांत गावंडे गंभीर जखमी

मोर्शी नगरपरिषदेच्या छतावरील पार्टी प्रकरणाला रक्तरंजित वळण

अमरावती/प्रतिनिधीः-
मोर्शी नगरपरिषदेच्या छतावरील कथित मटण पार्टीचे प्रकरण आता चांगलेच तापले आहे. या पार्टीचे ड्रोनद्वारे चित्रीकरण करणाऱ्या व्हिडिओ शूटरवरच धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी रात्री (दि.१७) समोर आली आहे.



जबाबानंतर गुन्हा दाखल करणार

रमाकांत गावंडे यांच्यावर शिंगोरा रोड परिसरात हल्ला झाल्याची माहिती मिळाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, पाच ते सहा जण या हल्ल्यात सहभागी होते. जखमीला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांचा जबाब नोंदविल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येईल, असे मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी सांगितले.

ड्रोन शूटिंगचा राग की अन्य कारण?

नगरपरिषदेच्या छतावरील मटण पार्टीचे चित्रीकरण केल्यामुळेच गावंडे यांच्यावर हल्ला झाला का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. पार्टीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर संबंधितांमध्ये नाराजी निर्माण झाली होती का, याचीही चर्चा सुरू आहे. मात्र, हल्ल्याचा या चित्रीकरणाशी थेट संबंध असल्याचे अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही.

शिंगोरा रोड परिसरात पाच ते सहा जणांनी रमाकांत गावंडे यांच्यावर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती असून, या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर अमरावतीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मोर्शी नगरपरिषदेच्या इमारतीच्या छतावर अधिकारी, कर्मचारी आणि नगरसेवकांनी मटण पार्टी केल्याचा ☞(पान २ वर)

चोरी गेलेला ७२ लाखांचा ऐवज सापडला

-हैदराबादवरून अल्पवयीन ताब्यात

-४७० ग्रॅम सोने, ७८० ग्रॅम चांदीचा समावेश

-नागपुरी गेट पोलिसांची मोठी कारवाई



अमरावती/प्रतिनिधीः-
तीन महिन्यांपूर्वी नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील मौलाना आझाद कॉलनीत झालेल्या चोरी प्रकरणात नागपुरी गेट पोलिसांनी हैदराबादमधून एका अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्या कडून तब्बल ७२ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सोने-चांदीचे आभूषण आणि रोख रक्कम असा हा संपूर्ण मुद्देमाल आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आज मंगळवार १७ नोव्हेंबर रोजी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते संबंधित तक्रारदाराला परत करण्यात आला.या प्रकरणात नागपुरी गेट पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता.

मौलाना आझाद कॉलनीत राहणाऱ्या मुज्तबा जैदी दुबई येथे राहत होते. मात्र आता ते शहरातील मौलाना आझाद कॉलनीत राहतात. तीन महिन्यांपूर्वी १० ऑगस्ट रोजी त्यांच्या घरी मोठी चोरी झाली होती. ४७० ग्रॅम सोने, ७८० ग्रॅम चांदी आणि रोख रक्कम चोरीला गेली होती. या प्रकरणात नागपुरी गेट पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. ☞(पान २ वर)

दर्यापूर बाजार समितीत १७ अनधिकृत हमाल?

प्रशासनाला माहितीच नाही? -बाहेरून आलेले मजूर कोण, चौकशीची मागणी

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या १७ अनधिकृत हमाल काम करत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. हे हमाल कुठून आले, त्यांची ओळख काय, याबाबत प्रशासनाकडे कोणतीही ठोस माहिती नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे स्थानिक व्यापारी, हमाल आणि शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बाजार समितीमध्ये काम करणाऱ्या हमालांची नोंदणी, ओळखपत्र आणि पोलिस पडताळणी ही प्रक्रिया असते. मात्र, हे नविन मजूर कोणत्याही नोंदणीशिवाय काम करत असल्याचा आरोप स्थानिक पातळीवर होत आहे. ते कोणत्या राज्यातून आले, याची माहितीही संबंधित यंत्रणेला नसल्याचे बोलले जात आहे. यामुळे बाजार समितीतील सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.



या मजुरांना येथील काही अडते आणि व्यापाऱ्यांकडे काम मिळत असल्याची चर्चा आहे. विशेषतः अडते व्यापारी अनिस घानीवाले यांच्याकडे हे मजूर काम करत असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. मात्र, याबाबत त्यांची बाजू अजून समोर आलेली नाही. त्यामुळे नेमके काय चालले आहे, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे.

बाजार समितीत दररोज हजारो शेतकरी आपला माल घेऊन येतात. मोठ्या प्रमाणात रोख व्यवहार, धान्य आणि वजनकाट्याचे काम चालते. अशा ठिकाणी ओळख नसलेले लोक काम करत असतील, तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची ☞(पान २ वर)

रक्ताचा तुटवडा,रक्तदान कराः डॉ. दत्ता मानवतकर

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- दसरा आणि दिवाळी या सणासुदीच्या काळात नागरिक प्रवासात आणि उत्सवात व्यस्त असल्याने रक्तदात्यांची संख्या मोठ्या प्रमाणात रोडावली आहे. परिणामी, अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात रक्ताचा गंभीर तुटवडा निर्माण झाला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून रक्तपेढ्यांमधील रक्तसाठा झपाट्याने कमी होत असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त मिळणे कठीण झाले असल्याची माहिती मेळघाट ब्लड बँकेचे संचालक डॉ. दत्ता मानवतकर यांनी दिली आहे.



सणांच्या दिवसांत सामाजिक संस्थांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या रक्तदान शिबिरांचे प्रमाणही ☞(पान २ वर)

मेळघाटात 'सिकलसेल' रुग्णांची संख्या मोठी

मेळघाटात 'सिकलसेल' आजाराच्या रुग्णांची संख्या मोठी आहे. या रुग्णांना जिवंत राहण्यासाठी दर एक ते दोन महिन्यांनी रक्ताची अत्यंत आवश्यकता असते. वेळेवर रक्तपुरवठा न झाल्यास या रुग्णांचा जीव धोक्यात येऊ शकतो, अशी भीती डॉ. मानवतकर यांनी व्यक्त केली आहे.सिकलसेल रुग्णांसोबतच प्रसूतीच्या वेळी महिलांना मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होण्याचा धोका असतो. अशा आणीबाणीच्या प्रसंगी तातडीने रक्त उपलब्ध न झाल्यास माता आणि बाळ या दोघांच्याही जीवाला गंभीर धोका निर्माण होतो. त्यामुळे सध्याचा रक्ताचा तुटवडा हा केवळ आकडेवारीचा विषय राहिला नसून, तो थेट रुग्णांचे प्राण वाचवण्याचा प्रश्न बनला असल्याचे त्यांनी नमूद केले.

या गंभीर पार्श्वभूमीवर डॉ. दत्ता मानवतकर यांनी नागरिकांना आणि तरुणांना पुढे येण्याचे आणि रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.

टोल चुकविण्याच्या नादात ट्रकची कार ला धडक

नांदगाव पेठ टोलनाक्या जवळ अपघात

नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-
टोलचा भुर्दंड वाचविण्याच्या प्रयत्नात गावातील रस्त्याचा वापर करणाऱ्या राखेच्या ट्रकने टोलनाक्याजवळ नागपूरहून अमरावतीकडे जाणाऱ्या कारला जोरदार धडक दिली. मंगळवारी (दि.१७) सकाळी १० वाजताच्या सुमारास घडलेल्या या अपघातात कारमधील दोघे जण किरकोळ जखमी झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक एमएच ३० एबी २०३० हा टोल वाचविण्याच्या उद्देशाने नांदगाव पेठ गावातील रस्त्याने टोलनाक्याजवळ आला. टोलनाक्याच्या बाजूने वळण घेत असताना नागपूरहून अमरावतीकडे जाणाऱ्या कार क्रमांक एमएच ३० बीडब्ल्यू ६४८६ ला ट्रकने जोरदार धडक दिली. ट्रक आणि कारचा अपघात पाहून घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.☞(पान २ वर)



शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

पीक कर्जाच्या विवंचनेतून उचलले टोकाचे पाऊल



चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-
तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथील एका ४९ वर्षीय शेतकऱ्याने सोमवारी (दि.१६) मध्यरात्रीनंतर आमला विश्वेश्वर येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना १७ नोव्हेंबर रोजी पहाटे उघडकीस आली आहे. रवींद्र केशवराव देवळे (वय ४९) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार,मृतक शेतकरी रवींद्र देवळे यांच्याकडे अवघे एक हेक्टर शेती असून, त्यांच्यावर सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एक लाखाचे पीक कर्ज होते. शेतीतून कुटुंबाचा खर्च भागवणे आणि कर्जाचा डोंगर ☞(पान २ वर)

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची आ.प्रवीण तायडे यांनी घेतली भेट

अमरावती-अचलपूर राज्यमार्गाच्या रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लागणार

अचलपूर/प्रतिनिधीः- मुंबई मंत्रालय येथे काल १७ नोव्हेंबर रोजी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची आ.प्रवीण तायडे यांनी भेट घेऊन अमरावती ते अचलपूर या अत्यंत महत्त्वाच्या राज्यमार्ग क्रमांक १४ अंतर्गत रुंदीकरणासह बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. अमरावती–अचलपूर हा रस्ता अचलपूर मतदारसंघाच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, या मार्गावर दररोज हजारो नागरिक, व्यापारी, विद्यार्थी व शेतकरी प्रवास करतात. त्यामुळे या रस्त्याचे दर्जेदार रुंदीकरण व बांधकाम होणे अत्यंत आवश्यक ☞(पान २ वर)



सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा शुक्रवारी मेगा क्रेडिट आउटरीच कॅम्प

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रिन" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

अमरावती/प्रतिनिधीः- अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. पंचवटी चौकातील वऱ्हाडे मंगलम येथे हे शिबीर होणार आहे.यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक पन्नम कुमार उपस्थित राहणार आहे. तसेच बँकेचे वरिष्ठ अधिकारी, एमआयडीसी असोसिएशनचे पदाधिकारी आणि जिल्हा प्रशासनातील अधिकारी उपस्थित राहणार☞(पान २ वर)

समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचारी संपावर

जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन





अमरावती/प्रतिनिधीः-
उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपामध्ये शहरातील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कर्मचारी सहभागी झाले आहेत. त्यामुळे न्यायालयीन कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कर्मचाऱ्यांनी काम बंद करून शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला बहुजन हिताय सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेने आपला पाठिंबा घोषित केला आहे. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना २००६ पासून सुधारित ☞(पान २ वर)

अतुल इंगळे यांचे निधन

अचलपूर/प्रतिनिधीः- अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेले अतुल वामनराव इंगळे यांचे १७ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे १२ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने उपजिल्हा रुग्णालय परिसरासह संपूर्ण अचलपूर शहरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अतुल इंगळे हे नेहमीप्रमाणे रुग्णालयात कर्तव्यावर असताना अचानक त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याचे समोर आले. त्यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच कुटुंबीय, मित्र आणि परिचितांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, दुपारी सुमारे १२ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.त्यांच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी, मित्रपरिवार आणि परिचितांनी त्यांच्या आकस्मिक निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.



मोर्शीत न्यायालयीन कर्मचारी संपावर!



मोर्शी/प्रतिनिधीः- 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यातील जिल्हा व दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात राज्यभरातील सुमारे ३४ ते ३५ हजार कर्मचारी तर मोर्शी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर येथील ३२ कर्मचारी सहभागी झाले आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर जिल्हा व तालुका ☞(पान २ वर)

दर्यापूर बाजार समितीत तुरीला १३,०११ रुपये प्रतिक्विंटल भाव

खल्लार/प्रतिनिधीः- कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर येथे नविन हंगामातील तुरीच्या शेतमालाची आवक सुरू झाली असून, पहिल्याच टप्प्यात तुरीला १३,०११ रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळाला आहे.

संग्रामपूर, ता. तेल्हारा, जि. बुलढाणा येथिल शेतकरी दादाराव विश्वासराव वाकोडे यांची तूर दर्यापूर येथिल चंचल ट्रेडिंग यांच्या अडतीवर विक्रीस आली होती. यावेळी झालेल्या खुल्या



लिलावात ☞(पान २ वर)

नांदगाव बाजार समितीत सोयाबीनला ७६०० भाव

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज मंगळवारी (दि.१७) सोयाबीनच्या भावात वाढ होऊन चांगल्या प्रतीच्या सोयाबीनला ७६२५ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असल्याने सोयाबीनच्या भावात तेजी आल्याचे दिसून येते. दिवाळीच्या सुट्टीनंतर बाजार समितीमध्ये शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार नियमित सुरू झाले, तेव्हा सोयाबीनला ७३०० रुपये भाव मिळाला होता. त्यानंतर भावामध्ये दररोज वाढ होऊन १७ नोव्हेंबर मंगळवार रोजी सोयाबीनचे भाव ७६२५ रुपये प्रतिक्विंटल पर्यंत पोहोचले. या वाढीव भावात व्यापाऱ्यांनी सोयाबीनची खरेदी केली. दिवाळीच्या सुट्टीनंतर १२ नोव्हेंबर पासून सोयाबीनच्या भावात सुधारणा होत गेली व या आठवड्यात सोमवारी पहिल्या दिवशी सोयाबीनला ७५०० रुपये प्रति ☞(पान २ वर)

